विषय
सं. क्र. ६२४७
REFBK-0023622
REFBK-0023622

२३६२२
३।५८२

# सुवर्णद्विपाची यात्रा

(इंडोनेशिया, न्यूझिलंड, ऑस्ट्रेलिया आणि सिंगापूर या देशांचा प्रवास)

ज. द. जोगळेकर

Travel and change of place
impart new vigour to the mind.
—Seneca

REFBK-0023622
REFBK-0023622

राष्ट्रविचार साहित्य प्रकाशन, मुंबई

वितरक
उत्कर्ष बुक सर्व्हिस, पुणे ४११ ००४

© १९८२, ज. द. जोगळेकर

प्रथमावृत्ती : ज्येष्ठं शके १९०४ / जून १९८२

प्रकाशन संयोजक : संवाद, सेनापती बापट सोसायटी
पुणे ४११ ०१६

मुद्रक : प्र. ल. सातपुते, प्रकाश प्रिंटर्स, ३५७ कसबा पेठ,
पुणे ४११ ०११

प्रकाशक : ज. द. जोगळेकर, राष्ट्रविचार साहित्य प्रकाशन,
२८ दर्यामहाल–ए, ८० लक्ष्मीबाई जगमोहनदास मार्ग
मुंबई ४०० ००६

डॉ. सौ. शोभा जोगळेकर यांस

## अनुक्रम


१. सुवर्णद्विप — १
२. न्यूझिलंड — ३६
३. ऑस्ट्रेलिया — ५८
४. सिंगापूर — ९१

२३६८८
अ. प्रवास ३/४९२
(स्थळ प्रत)

# १. सुवर्णद्विप ( इंडोनेशिया )

वीर सावरकरांचे धाकटे बंधू डॉ. ना. दा. सावरकर यांनी 'हिंदूंचा विश्वविजयी इतिहास' या नावाचा ग्रंथ सुमारे चाळीस वर्षांपूर्वी लिहिला होता. त्या ग्रंथात जावा, सुमात्रा, बाली, थायलँड, इत्यादी प्रदेशांतील हिंदूंच्या वसाहती नि तिथे झालेला हिंदू संस्कृतीचा प्रसार याची माहिती वाचल्याचे मला अंधूक स्मरते. पुढे दुसऱ्या महायुद्धातील जपानी चढाईची कथा नि नंतर जपानचा पराभव झाल्यावर डचांच्या पुनरागमनाला इंडोनेशियात झालेल्या सशस्त्र प्रतिकाराची कथा या मी वाचल्या होत्या. १९६५मध्ये इंडोनेशियात साम्यवादी पक्षाने बंड करून राज्यसत्ता ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला होता. पण तो फसला नि अखेरीस डॉ. सुकार्नो यांना सत्तात्याग करावा लागला होता. या सर्व घटनांची कथा जॉन ह्यूझच्या 'इंडोनेशिअन अपहिव्हल' या पुस्तकात मी वाचली होती. अशा प्रकारे त्या देशाविषयीची माहिती कालौघात माझ्याकडे जमा झाली होती.

इंडोनेशियातील बाली बेट हे संपूर्ण हिंदू असून लोंबोक बेटातली जवळजवळ अर्धी वस्ती हिंदू आहे. मात्र इंडोनेशिया हा इस्लामी देश समजला जातो. परंतु त्याच्या सामाजिक जीवनावर महाभारत नि रामायण या महाकाव्यांचा जो संस्कार झाला आहे तो हा देश इस्लामी होऊनही पुसला गेलेला नाही. शिवाय योग्याकर्ता–जोगजकार्ता येथे हिंदू राजवटीत हिंदू नि बौद्ध संप्रदायांची मोठी मंदिरे उभी झाली होती. तेव्हा इंडोनेशियाविषयी मनात बरेच कुतूहल होते. आणि अशा देशाला केव्हा तरी भेट द्यावी असे मनात येत असे. अर्थात ते कसे काय जमेल याची शंकाच वाटे.

पण अनेक वेळा अकल्पित घडते. तसेच या वेळेला झाले. एशिआटिक गायनेकॉलाजिक कॉन्फरन्स दर दोन वर्षांनी भरते. १९८१मध्ये ती ऑस्ट्रेलियात मेलबर्नला होती. तिला हजर राहणाऱ्या डॉक्टरांसाठी 'कॉक्स अँड किंग' या प्रवासी संस्थेने एक सहल आयोजित केली होती. या सहलीत इंडोनेशिया, न्यूझिलंड नि ऑस्ट्रेलिया या प्रदेशांचा धावता दौरा आखलेला होता. या सहलीचे माहितीपत्रक माझ्या पत्नी गायनेकॉलॉजिस्ट असल्याने त्यांच्याकडे आले. सहल इंडोनेशियातून जात असल्याने मला त्यात रस निर्माण झाला.

पण माहितीपत्रकातील कार्यक्रमात योग्याकर्ता या नगराचा अंतर्भाव नव्हता. ग्रूप ट्रॅव्हेलच्या नियमाप्रमाणे फक्त दोन थांबे विमान प्रवासात घेता येत होते. ते होते जकार्ता नि बालीमधले देनपसार. त्यानंतर देनपसारहून सिडनीमार्गे न थांबता न्यूझिलंडच्या ख्राइस्टचर्चला सरळ विमानाने जायचे होते. न्यूझिलंडमधला पुढचा प्रवास हा मोटरकोचने होता. परतीच्या प्रवासात ख्राइस्टचर्चकडून विमानाने ऑस्ट्रेलियात सिडनी येथे आल्यावर तेथून मेलबर्नपर्यंतचा प्रवास पुन्हा मोटरकोचने व्हायचा होता.

योग्याकर्ता हे जकार्ता नि बाली यांच्या दरम्यान आहे. या गावाजवळच बोरोबुडूरचा जगप्रसिद्ध बुद्ध स्तूप तसेच प्राम्बाननची हिंदू देवळे आहेत. ती पाहण्यास मी उत्सुक होतो. शेवटी आम्ही, म्हणजे मी नि डॉ. सौ. जोगळेकर आणि श्री. नि डॉ. सौ. विजयकर यांनी, असे ठरविले की, जकार्ता–योग्याकर्ता–बाली हा विमान प्रवासाचा टप्पा स्वतंत्रपणे करावयाचा नि बालीमध्ये आमच्या गटाला भेटायचे. त्याप्रमाणे 'कॉक्स अँड किंग'ने सात्रिआवी या इंडोनेशिअन टुरिस्ट एजन्सीला कळविले आणि या मधल्या प्रवासाची व्यवस्था करण्याची जबाबदारी त्या एजन्सीने घेतली. आणि हे इथेच नमूद केलेले बरे की, त्यांनी केलेली व्यवस्था शिस्तबद्ध नि व्यवस्थित निघाली.

इंडोनेशिया या नावाने ख्यात असलेल्या बेटांच्या प्रदेशाला प्राचीन भारतात सुवर्णद्विप हे नाव होते असे, डॉ. आर. सी. मुजुमदार यांनी लिहिले आहे. या बेटांना इंडोनेशिया हे नाव १८८४मध्ये जर्मन भूगोलकाराने दिले. असे म्हणतात की, या भागातल्या प्राचीन व्यापारी भाषेत यांना इंडोस नेसोस, म्हणजे इंडिअन आयलँड्ज्, असे म्हणत असत. डचांच्या राजवटीत हा प्रदेश डच ईस्ट इंडिज या नावाने ओळखला जात होता. या प्रदेशातील बेटांची संख्या १३,६६७ असून त्यांतील ७,६०० बेटांना नावे नाहीत, आणि १२,७०० बेटांवर कोणी वस्ती केलेली नाही. प्रमुख बेटे पुढील आहेत : सुमात्रा, जावा, बाली, कालिमांतन (बोर्निओ). सुलावेसी (सेलेबस), टिमोर आणि वेस्ट इरिअन (वेस्ट न्यू गिनि). सुमात्राच्या उत्तरेच्या टोकापासून ते पूर्वेकडच्या वेस्ट इरिअनपर्यंतचे अंतर ३,५०० मैल आहे. या सर्व प्रदेशाची लोकसंख्या सुमारे १४ कोटी आहे, आणि सर्वांत मोठी वस्ती जावामध्ये आहे. इंडोनेशियात ९० प्रतिशत लोक इस्लामपंथीय आहेत, ५ प्रतिशत ख्रिस्ती आहेत नि बाकीचे हिंदू, बौद्ध, कन्फ्युशिअन, इत्यादी संप्रदायांचे आहेत. लोकांचा भूताखेतांवर विश्वास असून आदतीवर, म्हणजे

स्थानिक रिवाजांवर समाजजीवन अजूनही अवलंबून आहे. इंडोनेशिअन समाजाचे पुढील तीन वर्ग करतात: ज्याचे हिंदुकरण झाले आहे असा जावा नि बाली यांमधला भातशेती करणारा पहिला वर्ग. लोकसंख्येचा अर्धा भाग या वर्गात जमा होतो; वांशिकदृष्टया एकवंशीय नसणारा नि किनाऱ्याकडे वस्ती करणारा कर्मठ इस्लामी गट हा दुसरा वर्ग; आणि रानटी टोळयांचा तिसरा वर्ग.

प्रदेश विशाल असल्याने तो बहुभाषिक असणे अपरिहार्य आहे. जावा-मधल्या भाषेविषयी रेबा लुइसने आपल्या 'इंडोनेशिया : ट्रबल्ड पॅरेडाइज' या ग्रंथात लिहिले आहे, "योग्याकर्ताच्या सुलतानाची एक राजकन्या एकदा मला म्हणाली की, तुला जावानीज बोलता आले असते तर बरे झाले असते. मला भाषा इंडोनेशिया आवडत नाही. ती कानाला कठोर लागते. जावानीज संस्कृत कुलोत्पन्न असल्याने ती श्रुतिमनोहर आहे. माझ्यापुरती जावानीज केवळ भाषा नाही, तर ती जीवनप्रणाली आहे. त्या भाषेतून आमचे सामाजिक जीवन व्यक्त होते. माझी मोलकरीण जेव्हा माझ्याशी बोलते तेव्हा ती हाय जावानीजचा उपयोग करते, तर मी तिला लो जावानीजमध्ये उत्तर देते. मी वडिलांशी हाय जावानीजमध्ये बोलले तर ते मला लो जावानीजमध्ये उत्तर देतील. फक्त वय नि स्थान या बाबतीत समान पातळीवर असलेले लोक मिडल जावानीजमध्ये बोलतात."

पण आता 'भाषा इंडोनेशिया' ही राष्ट्रभाषा झाली आहे. ती ध्वन्यनुसारी (फोनेटिक) असून तिच्यासाठी लॅटिन लिपीचा वापर होतो. मलाया नि इंडोनेशिया या प्रदेशांतील व्यापारी वर्गात तिचा वापर असे. जपानी लोकांनी इंडोनेशिया व्यापल्यावर डच भाषेच्या वापरावर बंदी घातली. जपानी भाषेचा वापर शक्य नव्हता. तेव्हा त्यांनी भाषा इंडोने-शियाला प्रोत्साहन दिले. त्याचा निरनिराळ्या बेटांत राहणाऱ्या लोकांत एकात्मता निर्माण करण्यास उपयोग झाला. तत्पूर्वी लोक जावानीज, बालीनीज, सुमात्रन, इत्यादी भाषा बोलत. भाषा इंडोनेशियात अरेबिक, संस्कृत, जावानीज, उर्दू, डच, पोर्तुगीज, इंग्रजी शब्दांचा वापर होतो.

इंडोनेशिअन राष्ट्रभाषेचा प्रयोग यशस्वी होत आहे असे पाहिल्यावर रेबा लुइस सांगते की, मलायाच्या शासनाने अरेबिक लिपीचा त्याग करून लॅटिन लिपीचा स्वीकार केला; आणि भाषा इंडोनेशिया यामध्ये जे शब्द स्वीकारण्यात आले ते आपल्या भाषेसाठी स्वीकारून इंडोनेशियन भाषा–

शिक्षकांना आपल्याकडे कामाला ठेवले. आता १९७२मध्ये इंडोनेशिया नि मलेशिया यांच्यांत शब्दांचे एकच स्पेलिंग ठेवण्याविषयी मतैक्य झाले. त्यामुळे वैचारिक दळणवळण सोपे झाले आहे नि साहित्याची देवाण-घेवाण अधिक मुक्तपणे होण्याला सहाय्य झाले आहे.

इंडोनेशिया हा प्रदेश फार प्राचीन असून काही तज्ज्ञांच्या मते प्राचीन संस्कृतीचा उगम जावा बेटात झाला आहे. १८९१मध्ये जावा बेटात मनुष्याची जी कवटी नि हाडे सापडली त्यावरून पाच लक्ष वर्षांपूर्वी येथे मानवी वस्ती असावी असा तर्क करण्यात येतो. दुसऱ्या शतकापासून भारतीय व्यापारी नि ब्राह्मण यांनी जावा नि सुमात्रा या बेटांत वसाहतीला सुरवात केली. हिंदू धर्माचा प्रचार या प्रदेशात या ब्राह्मणांनी केला असे 'एन्सायक्लोपेडिया ब्रिटानिका (१९७२)'मध्ये म्हटले आहे. पुढे तिथे हिंदू राज्ये स्थापन झाली. श्रीविजय हे सुमात्रामधले सर्वांत बलिष्ठ नि प्रख्यात राज्य होते. सातव्या शतकापासून ते तेराव्या शतकापर्यंत हे राज्य टिकले. जावामधल्या हिंदू राज्याचे नाव माडजापाहिट. त्याचा काळ तेराव्या शतकापासून ते सोळाव्या शतकापर्यंत समजला जातो. या राज्याविषयी लुई फिशर 'द स्टोरी ऑफ इंडोनेशिया' या ग्रंथात लिहितात की, इंडोनेशियाच्या प्राचीन स्वातंत्र्याच्या काळातले माडजापाहिट युग हे तेजस्वी नाव आहे, आणि सामाजिक संस्था व्यापाराच्या वस्तू नि रस्ते यांना हे नाव अभिमानाने देण्यात येते, या राज्याचा गाडजा माडा हा विख्यात पंतप्रधान होऊन गेला. त्यानेच या राज्याचे वैभव वाढविले. योग्याकर्तामधल्या विद्यापीठाला त्याचे नाव दिलेले आहे. बाराव्या शतकात इस्लामचा या प्रदेशात चंचुप्रवेश झाला आणि अखेरीस त्याने जावा नि सुमात्रा यांतून हिंदू धर्माला खो दिला.

या प्रदेशाकडे येणारे पोर्तुगीज हे पहिले युरोपीय लोक होत. त्यांनी १५११-मध्ये मल्लाका काबीज करून पुढें या भूमीत पाय रोवले. त्यांच्यानंतर डच आले, आणि इंडोनेशियाच्या भूभागावर त्यांनी आपले वर्चस्व जमवले. सिंगापूरचा निर्माता रॅफेल याने १८१०मध्ये नेपोलिअनविरुद्धच्या युद्धातले एक उपांग म्हणून या प्रदेशाचा ताबा घेतला. पण पुढे सिलोनच्या बदल्यात ब्रिटिशांनी हा प्रदेश डचांना परत केला. तेव्हापासून डचांचे राजकीय प्रभुत्व या भूभागावर सुरू झाले. काही वेळेला डचांची वागणूक फारच अमानुष होती. त्याची कल्पना चवथा गव्हर्नर जनरल कोएन याच्या पुढील उद्गारां-वरून येईल. "युरोपमध्ये एखाद्या माणसाला आपल्या गुराढोरांशी वाटेल

तसे वर्तन ठेवता येणार नाही. पण इथे एखादा धनी आपल्या नोकरांशी मनमानेल तसे वागतो." १९४२मध्ये जपानी लोकांनी इंडोनेशियाला पादाक्रांत केले. पुढे १९४५मध्ये त्यांचा पराभव झाल्यावर डॉ. सुकार्नो नि महंमद हाटा यांनी स्वातंत्र्ययुद्ध घोषित केले. हे युद्ध तीन वर्षे चालले. १९४९मध्ये डचांनी इंडोनेशियाचे स्वातंत्र्य मान्य केले. अशी आहे या असंख्य बेटांच्या प्रदेशाची कथा.

जकार्ताला जायला आम्ही दसऱ्याच्या दिवशी, म्हणजे ८ ऑक्टोबर १९८१ या दिवशी, सकाळी सिंगापूर एअरलाईन्सच्या विमानाने निघालो. दहाच्या सुमारास विमानाने भूमी सोडली. पाहता पाहता मुंबई लहान होऊन घरे ठिपक्यासारखी दिसू लागली. नंतर विमान खाडीवरून गेले. थोड्या वेळाने डोंगरांची रांग दिसली. नंतर समुद्र दृष्टिपथात आला. काही समयाने पांढऱ्या ढगांची गर्दी होऊन खाली शुभ्र वस्त्राचे आच्छादन पसरले आहे असा भास झाला. या वेळी विमान एक्केचाळीस हजार फुटांवरून ताशी सातशे मैलांच्या वेगाने जात असल्याची माहिती कॅप्टनने दिली. तासाभराने जेवणाच्या थाळ्या आल्या. भोजनानंतर अर्ध्या तासाने भोवतालीही ढगांची गर्दी होऊन विमान हादरू लागले. ही परिस्थिती दहा मिनिटे राहिली. एक वाजण्याच्या सुमारास ढगांचे आवरण कमी होऊन खाली निळे जलाशय दिसू लागले. पण पुन्हा शुभ्र मेघांचे लोट येऊन खालचा भाग अदृश्य झाला, नि क्षितिजाकडे हिमाच्छादित डोंगर आहेत असा भास झाला.

दोननंतर वातावरण मोकळे होऊन उजव्या हाताला किनारा दिसू लागला. सिंगापूर अर्ध्या तासाच्या वाटेवर आहे अशी कॅप्टनने माहिती दिली. आता विमान उंची सोडू लागले. या वेळी शुभ्र तरल ढगांतून ते गेले. मग खाली हिरवीगार वने, त्यांच्या भोवतालचा नागमोडी समुद्र, त्याच्यातल्या होड्या, क्षितिजाकडच्या पांढऱ्या-काळसर ढगावर पडलेल्या सूर्याच्या प्रभेने त्यांच्यावर आलेले सोनेरी पट्टे, तसेच ढगांच्या चित्रविचित्र आकृत्या – हा सगळा देखावा मनोज्ञ होता. आता विमानाने भूमीकडे झेप घेतली आणि थोड्याच समयात ते तिच्यावर धावू लागले. या वेळी २-४६ वाजले होते. पण सिंगापूरच्या घड्याळात ४-५० झाले होते.

सिंगापूरचा विमानतळ याच वर्षी तयार झाला असून तो प्रशस्त आहे. चालण्याचे श्रम टाळण्यासाठी भूमीसपाट एस्कॅलेटर्स आहेत. जवळच दूर-ध्वनीची व्यवस्था आढळली. तिथे लिहिले होते : 'फ्री कॉल, कर्टसी,

सिंगापूर टेलिफोन्स ' आवारात काही ड्युटी – फ्री शॉप्स होती. त्याशिवाय इतर दुकानेही होती. त्यात चॉकलेट, पुस्तके, घड्याळे, कॅमेरे, इत्यादी गोष्टी उपलब्ध होत्या. पण ही दुकाने केवळ चिनी लोकांचीच दिसली.

सिंगापूरचा विश्राम दीड तासाचा होता. साडेसहा वाजता आरक्षकाच्या कक्षातून जाण्याची सूचना मिळाली. आठ वाजता विमानात बसलो. शेजारी कॅथे पॅसिफिकचे विमान होते. विमानतळावरचे लाल, पिवळे, निळे दिवे लुकलुकत होते. सूर्य अस्ताला गेल्याने मावळती लालबूंद झाली. विमान उडाले त्या वेळी साडेआठचा सुमार झाला होता. काही क्षण खाली छोटी जहाजे दिसली. आता विमान ३९ हजार फुटांवरून ताशी ५३० मैलांच्या वेगाने जात असल्याचे कॅप्टनने सांगितले. मग अजिबात अंधार झाला. तारे चमकू लागले, थोड्या वेळाने फराळ आला. पावणेदहाच्या सुमारास विमान उतरू लागले. भोवताली डोंगराची माळ दिसली. त्यावर घरे असून त्यात दिवे पाजळत होते. विमानातून बाहेर आलो तेव्हा १० वाजले होते. मात्र जकार्ताच्या विमानतळावरचे घड्याळ ९–३० झाल्याचे सांगत होते.

इमिग्रेशनचा कक्ष ओलांडून कस्टमच्या कक्षात आलो तेव्हा तिथले अधिकारी लष्करी वेषातले दिसले. आमच्या गटाचे स्वागत करण्यासाठी कॉक्स अँड किंगचा स्थानिक प्रतिनिधी हजर असेल असे आम्हाला मुंबईत सांगण्यात आले होते. तो कुठे आहे याची टेहेळणी केली तेव्हा प्रारंभी कोणीच दिसले नाही. पण एवढ्यात एक जण आमचेकडे आला नि तुम्ही ' जिनिक ग्रूप ' आहात काय अशी त्याने पृच्छा केली. त्याच्या म्हणण्याचा अर्थबोध होईना. पण त्याच्या हातातल्या कागदावर आमची नावे दिसल्याने आम्ही तेच आहोत असे सांगितले. 'गायनिक' या शब्दाऐवजी तो 'जिनिक' म्हणाल्याने काही क्षण घोटाळा झाला. कस्टमच्या रांगेतून जाताना माझ्या ध्यानात आले की विमानात दिलेला फॉर्म भरण्याचे राहून गेले होते. तो भरण्यात थोडा वेळ गेला. त्यातच ' ट्रान्झिट पॅसेंजर ' असूनही आम्हाला बॅगा उघडाव्या लागल्या. त्याची तपासणी संपल्यावर बाहेर आलो. मग यात्रिआवीच्या एजंटने आम्हाला नि सामानाला बसमध्ये चढविले. मग ती बस ' हॉटेल सारी पॅसिफिक 'कडे धावू लागली.

कोणत्याही नवीन शहराविषयी आपल्या मनात पूर्वकल्पना असतात. गावाबद्दलची वाचलेली माहिती जुनी असल्याची जाणीव असूनही आपल्या मनातल्या पूर्वकल्पना डोके बाहेर काढू लागतात. आजही माझे असेच झाले.

रेबा लुईसचे पुस्तक वीस वर्षांपूर्वीचे आहे. जकार्ताला आल्यावर तिची प्रारंभी कशी तारांबळ उडाली याचे त्या पुस्तकात तिने वर्णन केले आहे. हॉटेलकडे तिला कृष्ण नि अर्जुन या नावांच्या बेटजॅकमधून – सायकल रिक्षाने जावे लागले होते. बेटजॅक आपल्या सायकल रिक्षापेक्षा निराळी असते. यात प्रवासी पुढे बसतो नि रिक्षावाला पाठीमागून पॅडल मारतो. त्यावेळी जकार्तात ४०,००० बेटजॅक होत्या. रिक्षातून जाताना गाव बेशिस्त नि ऱ्हासाच्या मार्गावर आहे असे तिला वाटले. गावातल्या कालव्यातील पाण्याला दुर्गंधी येत होती. त्यातल्या पाण्याचा वापर गरीब लोक सर्व गोष्टींसाठी करीत होते. मात्र ती ज्या हॉटेलात उतरली ते उत्तम होते असे तिने लिहिले होते. 'सारी पॅसिफिक'कडे जाण्यासाठी बसमध्ये मी बसलो असताना साहजिकच जकार्ताच्या या शब्दचित्राचे मला स्मरण झाले.

परंतु बस धावू लागली आणि काही क्षणांत मला आश्चर्याचा धक्का बसला. जकार्तातले राजपथ विशाल असून त्यांच्यावरची प्रकाशव्यवस्था अद्ययावत होती. या पथांची आखणी युरोपीय नगरांतल्या राजपथांप्रमाणेच केलेली आढळली. आणि त्यांच्यावरची वाहनांची रहदारी शिस्तबद्ध होती. जालन थामरिन या राजपथाच्या बाजूला टोलेजंग इमारती होत्या. काही खाजगी कंपन्यांच्या होत्या. काही सरकारी होत्या. एका सरकारी इमारतीवर 'दीर्घायू अभ्रिके' – सैन्य चिरायू हो – असे लिहिलेले होते. शिवाय हॉटेल शेरेटॉन, प्रेसिडेंट, इत्यादी गगनचुंबी इमारतींची हॉटेले त्यांच्यावरच्या रंगीत दिव्यांच्या पाट्यांवरून आपले अस्तित्व जाहीर करीत होती. थामरिन पथावरच 'सारी पॅसिफिक' हे हॉटेल आहे. त्यात प्रवेश केल्यावर आपण मुंबईच्या 'ताज'मध्येच शिरत आहोत असा भास झाला. खोली उत्तम असून त्यातली व्यवस्था छान होती. इथल्या टेबलावर बायबल होते नि ते गिडिऑन्सनी ठेवले आहे असे म्हटले होते. युरोपीय प्रवाशयांच्या सोयीसाठी ही व्यवस्था असावी. हिंदुस्थानातला हिंदू जेथे वाऱ्यावर सोडलेला आहे तेथे परदेशात त्याला कोण विचारणार ? या खोलीच्या खिडकीतून समोरची एक छोटी गल्ली दिसे. त्यात छोटी-मोठी घरे होती. त्यांतल्या दोन दुमजली घरांवर 'सिनार मेदान' नि 'रमाह मकान' अशा पाट्या होत्या. ती लहान हॉटेले होती असे समजले.

जकार्ताचे पूर्वीचे नाव जयाकर्ता होते. त्याच्या सुलतानाने डचांना एक संरक्षित गाव बांधण्याची परवानगी दिली. डचांनी तसे गाव बांधले. ड

लोक बटेव्हिया नावाच्या जर्मन टोळीचे वंशज. म्हणून या गावाला त्यांनी बटेव्हिया हे नाव दिले. पुढे या गावाचा तळ करून त्यांनी समग्र प्रदेशावर आपले वर्चस्व बसविले. अशी आहे या राजधानीची पूर्वकथा.


आमच्या प्रवासाच्या आखलेल्या कार्यक्रमानुसार 'मिनिएचर इंडोनेशिया' ही मोठी सहल दुपारी निघणार होती. तेव्हा आमचा सकाळचा वेळ मोकळा होता. या वेळात शहरातून हिंडता आले तर पाहावे तसेच योग्याकर्ताला जाण्याची व्यवस्था पक्की करावी म्हणून आम्ही सात्रिआवीच्या सहल कार्यालयाकडे आलो. ते एकमजली नि छोटे होते. त्याच्या समोरचा रस्ता मोठा होता. मध्यभागी झाडांची रांग होती. तसेच अधूनमधून छोट्या वाटिका होत्या. त्यामुळे तो आपोआपच एकमार्गी झाला होता. रस्त्याच्या पलीकडे उच अमदानीत बांधलेले एक चर्च होते.

पदपथाच्या एका बाजूला दोन-चाकी छोटी गाडी होती, त्यावर चहा नि कॉफीची भांडी असून खाली लहान शेगडी होती. त्याशिवाय पाव, चिनी शेवया, भात, नि सरबत हे पदार्थही होतेच. तसेच जुन्या पद्धतीचे कपडे घातलेला वयस्क इसम कावड घेऊन जात होता. त्यात खाद्यपदार्थ होते. कोणाला काही हवे असल्यास तो वसईच्या भाजीवाल्याप्रमाणे कावड खाली उतरवून वस्तू देत होता. झाडूवाल्याच्या खांद्यावर मोठी टोपली असून रस्त्यावरचा कचरा तो त्यात गोळा करीत होता. एकंदरीत नव्या जकार्तातले रस्ते सुबक नि स्वच्छ होते.

सात्रिआवीच्या कार्यालयापासून थोड्या अंतरावर 'इंडोनेशिअन वॉटर स्पोर्ट्स् फेडरेशन'ची विस्तृत पसरलेली इमारत होती, नि त्याच्या पलीकडे फोटोकॉपीचे दुकान होते. कार्यालयाबाहेर उभे राहिले की, रस्त्यावरच्या रहदारीची कल्पना येते. असंख्य तीन – चाकी गाड्या धावत होत्या नि त्या वजाजनिर्मित होत्या. तसेच होंडा, सुझुकी, व्हेस्पा इत्यादी जातींच्या मोटर-सायकली पळत होत्या. शिवाय मोटरींची गर्दी होतीच.

जकार्ताच्या राजपथावरून हिंडताना सर्वांत लक्ष वेधून घेणारी वास्तू म्हणजे मर्डेका (स्वातंत्र्य) चौकातला १३७ मीटर उंचीचा राष्ट्रीय स्तंभ. त्यासाठी वापरलेला पाषाण शुभ्र रंगाचा असून तो इटलीतून आणलेला आहे. स्तंभाच्या टोकावर असणारी ज्वाला सोन्याची असून तिचे वजन ३५ किलोग्रॅम आहे. त्याच्या पायथ्याशी हिस्टॉरिकल म्युझिअम असून त्यात इंडोनेशियाच्या इतिहासाची चित्रे तसेच स्वातंत्र्ययुद्धाची माहिती देणाऱ्या

गोष्टी आहेत. मर्डेका चौकाच्या आसमंतातच नवीन रचनेची इस्तिकलाल मशीद उभी होत आहे. आग्नेय आशियातील ती सर्वांत मोठी मशीद आहे.



जाकार्तामधील मर्डेका चौकातील राष्ट्रीय स्तंभ

पण येथेच नमूद करणे आवश्यक आहे की, इंडोनेशिया हे निधर्मी राज्य असल्याचा उल्लेख ' गरूडा एअरवेज 'च्या माहिती पुस्तकात केलेला आहे. याच भागात आणखी एक स्मारक आहे. ते म्हणजे डिपोनेगोरा या एका महान स्वातंत्र्यवीराचे. १८२५ मध्ये त्याने डचांविरुद्ध गनिमीयुद्ध सुरू केले. पण पाच वर्षांच्या युद्धाच्या अखेरीस त्याचा पराभव झाला. त्याने उभारलेला लाल–पांढऱ्या रंगाचा ध्वज आता राष्ट्रीय ध्वज झाला आहे, असे रेबा लुईसने म्हटले आहे.

ॲनकोल ड्रिमलँड पार्क ही मोठी बाग असून मध्यभागी एक विस्तीर्ण सरोवर आहे. या बागेसाठी ५० हेक्टर जमिनीचा वापर केला असून त्यात नारळ, पोफळी यांची झाडे, तसेच इतर मोठ्या वृक्षांची वने आहेत.

सरोवरात नौकाविहाराची सोय आहे. बाजूला हॉटेले नि मोटेले आहेत. बाग समुद्राजवळ असल्याने एक मोठे हॉटेल समुद्राला लागून आहे. अत्यंत शांत नि स्वच्छ जागा आहे. मध्यभागी एका बाजूला छोटी इमारत आहे. त्यात एक मत्स्यालय असून त्यात निरनिराळ्या जातींचे मासे ठेवलेले आहेत. मध्यभागी मोकळ्या जागी ५० फूट लांबीचा व्हेल माशाचा सांगाडा आहे. बाहेर एक छोटी पाटी होती नि त्यावर 'गेल समुद्र' असे शब्द लिहिलेले होते. मुलांच्या करमणुकीसाठी सहा डॉल्फिन माश्यांचे रोज सकाळी खेळ केले जातात. पेटलेल्या चक्रातून उड्या मारणे, उंच उडी मारून शिक्षकाचा मुका घेणे, शेपटीवर फुग्यांना नाचवणे, नि शेवटी पाण्याबाहेर उडवणे, इत्यादी खेळ या डॉल्फिन माश्यांकडून करून घेतले जातात. पण सर्वांत महत्त्वाचा खेळ म्हणजे डॉल्फिनची गणितातली प्रगती. प्रथम फळ्यावर २+२=४ असे लिहितात. ते डॉल्फिनना परत हातांनी लिहिल्यासारखे दाखवतात. नंतर त्यांना सूचना करताच ते बाजूला ठेवलेल्या बोर्डाकडे जाऊन त्यावरील घंटा वाजवतात. जर बेरीज चार असेल तर चार वेळा उडी मारून घंटा वाजवतात. असा चार वेळा त्यांनी प्रयोग केला. फक्त एकदा त्यांची फसगत झाली.

इथे प्रेक्षकांत एक अरब स्त्री होती. तिच्या अंगावर काळा डगला होता. पण तिने तोंडावर बुरखा घेतला नव्हता. रेबा लुईसने लिहिले आहे, "बुरखा घालून एखादी अरब बाई जर इंडोनेशियात कुठे आढळली तर तिची इतकी चेष्टा केली जाईल की, तिला घराचा रस्ता धरावा लागेल." इंडोनेशिया जरी इस्लामी असला तरी कोणीही बुरखा घालत नाहीत. ही गोष्ट जकार्ता नि योग्याकर्ता येथील छोट्या वास्तव्यात आम्हाला दिसली.

'सुंडा केलापा हार्बर' हे जकार्तातले सर्वांत जुने बंदर. जावामधल्या आपल्या व्यापारासाठी पोर्तुगिजांनी त्याचा प्रथम वापर केला. पुढे डचांनी आपल्या राजकीय आक्रमणाला येथूनच प्रारंभ केला. आता तेथे शिडांची मोठी जहाजे नांगरलेली होती. इंडोनेशिया हा बेटांचा प्रदेश असल्याने त्या बेटांतली व्यापारी नि इतर वाहतूक करण्यासाठी या जहाजांचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. बंदराच्या पलीकडे जुनी वस्ती असून तिथली घरे बहुतेक एकमजली होती. इकडचा सगळा भाग कमालीचा स्वच्छ होता.

गाईडच्या सांगण्याप्रमाणे—आणि हे सांगताना ती मिस्किलपणे हसली—इंडोनेशियातल्या व्यापारावर चिनी नि भारतीय लोकांचे वर्चस्व आहे.

प्रितम स्टोअर्स, अरोरा स्टोअर्स, विष्णू टेलर्स, रामायण फॅशन शॉप, दत्ता मुव्ही, जयप्रभा अॅड्व्हर्टाइझिंग एजन्सी या रस्त्यावरून जाताना दिसणाऱ्या पाट्यांवरून त्याची अल्प कल्पना येऊ शकते. विष्णू टेलर्सचे मालक मोठे व्यापारी नि उद्योगपती आहेत. हिंदुस्थानातील त्यांच्या कुटुंबियांशी आमच्या गटातले डॉ. ठाकूर यांचा परिचय असल्याने, त्यांनी आम्हाला रात्री भोजन दिले.

इथेच एका गोष्टीचा निर्देश करणे आवश्यक आहे. इंडोनेशियात चिनी लोकसंख्या सुमारे तीस लाखांपर्यंत जाईल. १९६५च्या उठावाच्या शमनानंतर जी नवीन राजवट आली तिने चिनी भाषेच्या शाळांवर बंदी घातली आहे. आता ज्या चिनी लोकांना आपल्या मुलांचे शिक्षण चिनी भाषेत व्हावे असे वाटते नि त्यासाठी खर्च करण्याची ऐपत असते ते लोक आपली मुले हाँगकाँगला शिक्षणासाठी पाठवतात.

सुंडा केलापा बंदराकडून परत येताना आपण जुन्या भागातून येतो. डचांच्या अमदानीत हा मोठा व्यापारी विभाग होता. तिथल्या इमारती जुन्या पद्धतीच्या डच रचनेच्या असून त्यात आजही डच बँका नि व्यापारी पेढ्या यांची कार्यालये आहेत. रस्ते मात्र लहान आहेत नि तिकडे येताना डचांनी प्रारंभी बांधलेला जुना सेतू ओलांडावा लागतो. जालन सुरबाया अँटिक मार्केट हे वाटेवरच्या एका छोट्या गल्लीत आहे. तिथे पितळ, लाकूड, ब्राँझ, चामडे, यांच्यापासून बनविलेल्या अनेक वस्तू विकत मिळतात.

बटिक बॉडिकारी हा सरकारी मालकीचा कारखाना आहे. तिकडे जाताना आपल्याला जुन्या शहराच्या भागातून जावे लागते. त्यातले रस्ते लहान असून त्यावरून एका वेळी एक बस जाऊ शकत होती. या रस्त्यांवर छोट्या घोडागाड्या, बेट्जॅक यांची गर्दीची वाहतूक होती. अत्यंत स्वस्त वस्तूंचे मार्केट एका रस्त्यालगतच होते. त्यात भाज्या, अंडी, नारळ, धान्य आणि मासे उघड्यावर विक्रीसाठी ठेवले होते. हा कारखाना अशाच आडरस्त्याला आहे. त्यात गाऊन, बायकांचे कपडे, पडदे, टेबल क्लॉथ, बेड कव्हर, वॉल डेकोरेशन्स, इत्यादी अनेक गोष्टी तयार होतात. हे काम हाताने केले जाते. आणि शिक्षण आईकडून मुलीला असे परंपरागत मिळते. येथे वापरण्यात येणारा रंग जर्मनीहून येतो, नि कापड जपानहून येते. पूर्वी झाडांपासून रंग तयार करण्यात येत असत. आजही लग्नाच्या कपड्यांसाठी वापरण्यात

येणारा रंग हा पूर्वीप्रमाणे झाडापासून तयार करण्यात येतो. बटिकची डिझाइने गरम मेणाने करतात. ते काम तज्ज्ञ अशा वयस्क बायका करताना दिसल्या.

कारखान्याचा एक मोठा हॉल होता. त्यात सात-आठ विभाग असून प्रत्येकात दोन-तीन बायका काम करीत होत्या. त्याच्या पलीकडच्या जागेत पुरुष काम करीत होते. बाहेर दोन मोठे हौद होते नि त्यांत कापडाला रंग चढविण्याचे काम केले जाते. हौदाला लागून पण थोड्या अंतरावर प्रदर्शनाचा हॉल होता. त्यात बटिकचे सर्व प्रकारचे कपडे नि कापड होते. तसेच रंग-चित्रे (पेंटिंग्ज) रेड्याच्या हाडापासून तयार केलेल्या लहान सुबक वस्तू मांडलेल्या होत्या. जकार्तात खूप उन्ह असल्याने या प्रदर्शनाच्या हॉलमध्ये मोफत कोक देण्याची व्यवस्था केलेली होती.

राष्ट्रवादाच्या प्रभावामुळे प्रत्येक देशात स्वतःच्या परंपरेबद्दल पुनर्जागृती होत आहे. इंडोनेशिया तिला अपवाद नाही. त्या देशाने आपले सांस्कृतिक वैशिष्टय दाखविण्यासाठी तीनशे एकर भूमीत एक उद्यान केलें असून त्यात इंडोनेशियातील सत्तावीस प्रांतांत जी विभिन्न प्रकारची घरे आहेत तशी येथे बांधली आहेत. रोमेनियाची राजधानी बुखारेस्ट येथे व्हिलेज म्युझियम आहे. त्याच धर्तीचे हे उद्यान—टामन मिनी इंडोनेशिया इंडाह—आहे. ते जकार्ता शहराच्या बाहेर नि विमानतळाच्या थोडे जवळ आहे. या उद्यानाची कल्पना प्रेसिडेंट सुहार्तो यांच्या पत्नीची. प्रथम या कल्पनेला विरोध झाला. पण असे प्रदर्शन आकर्षक ठरेल ही श्रीमती सुहार्तो यांची धारणा बरोबर ठरली.

तिकडे जाताना वाटेत मोठा घुमट असलेला कन्वेंशन हॉल, आशिआई स्पर्धेसाठी बांधलेला स्पोर्टस् स्टेडिअम, वगैरे दिसतात. हा स्टेडिअम रशियाने बांधून दिला असे ह्यूझने म्हटले आहे. डॉ. सुकार्नो यांना प्रचंड वास्तू बांधण्याची हौस होती. शेवटी तिचा अतिरेक झाला. या संबंधात विनोद म्हणून असे सांगतात की, मोठ्या गावी सुकार्नो गेले की, तिथले तंत्रज्ञ गायब होत असत. कारण ते जवळपास असले तर अशक्य गोष्टी बांधण्याचे काम त्यांच्याकडे सोपवण्यात येत असे. विशाल पथावरून कोच धावत असताना एक चौक आला. त्यात एक स्तंभ आहे. त्यावर उड्डाण करणाऱ्या हनुमानाची मूर्ती आहे. साहजिकच पळत्या कोचमधूनच जमेल तसा त्याचा फोटो घेतला.

आता रस्ता अधिक विस्तृत झाला. त्यावरून पथ बदलीसाठी काही ठिकाणी पूल दिसले. मार्गावर केळी, नारळी, पोफळी, यांच्या खूप बागा होत्या. त्यामुळे हा सगळा प्रदेश हिरवागर्द दिसतो. रस्त्याच्या कडेला अधून-मधून उपाहाराची छोटी दुकाने आढळतात. तेथे स्वस्त पदार्थ मिळतात नि बरेच लोक दुपारचे भोजन तिथेच करतात. केळवनातली घरे लहान होती. काही झोपड्याच होत्या. मात्र सर्व भाग कमालीचा स्वच्छ होता. भिकारीही दोन-पाच दिसले. गम्मत म्हणजे खोदलेले रस्ते दिसलेच नाहीत. तसेच एक मोठे कारंजे दिसले. पण त्यात कोणी अंघोळ करीत नव्हते. उद्यानात पोहोचायला अर्धा तास लागला.

उद्यानात शिरताना प्रारंभी म्युझिअम लागतो. त्याची रचना बरीचशी मंदिरासारखीच वाटते. म्युझिअममध्ये इंडोनेशियाच्या वैशिष्टयपूर्ण, म्हणजे कपडे, कोरीव काम, चित्रे, वगैरे गोष्टींचा संग्रह आहे. प्रवेश द्वारापाशी दहा फूट उंचीचे विक्राळ चेहेऱ्याचे द्वारपाल आहेत. गाईडच्या सांगण्याप्रमाणे ते भूताखेतांना हाकलतात. थोडे अधिक आत गेल्यावर एक मोठा जलाशय दिसतो. त्यात जावा, सुमात्रा, बाली, इत्यादी बेटे दाखवलेली आहेत.

प्रारंभीचा विभाग संप्रदायांचा होता. त्यात मशीद, चर्च, नि बोरोबुडूरचा स्तूप दाखविलेला होता. नंतर हिंदू मंदिर लागले. त्यात सांप्रदायिक चर्चेसाठी मोठा मंडप केलेला होता. सुलावेसी – सेलेबस – बेटात एका कुटुंबाची तीन घरे असतात. त्यातल्या मधल्या घरात गुराची शिंगे एकावर एक रचलेली असतात. शिंगांच्या संख्येवरून घरातील किती माणसे मृत्यू पावली हे कळते. इथेच बाहेरच्या अंगणात हरिणाच्या शिकारीचा प्रसंग मोठ्या पुतळ्यांच्या साहाय्याने दाखविला आहे. टिमोर बेटातले घर छान होते. त्यात छोटा बोगदा होता. कालिमांतन (बोर्निओ)मधल्या प्रचंड मोठ्या घरात वीस कुटुंबे राहतील इतक्या सोयी असतात. त्याच प्रदेशातले ओंडके बाजूला रचलेले असून त्यांची लांबी तीस-चाळीस फूट असावी नि ते दोनशे वर्षांचे जुने होते.

'इरिअन जाया,' म्हणजे 'वेस्टर्न पार्ट ऑफ न्यू गिनी'. यातील घरे अत्यंत रानटी अवस्थेतील होती. वाहत्या पाण्यापासून बचाव करण्यासाठी ती बांबूच्या खांबाबर उभी केलेली होती. बाजूच्या जलाशयात नाव असून त्यात पंधरा नावाडी होते आणि दुसऱ्या बाजूला सुसरी दाखविलेल्या होत्या. या बेटातल्या टोळी प्रमुखाचे घर लक्षात राहते. कारण मध्यभागी त्याची

झोपडी असते. त्याच्या शेजारी त्याच्या आवडत्या तरुण पत्नीची झोपडी असते. नंतर डुक्करखाना येतो. मग स्वयंपाकघर नि पलीकडे नावडतीची झोपडी.

मालुकस बेटातल्या घराला मनोरा असतो. उत्तर सुमात्रातील घरे चित्रविचित्र प्रकारे रंगवलेली असतात. पश्चिम सुमात्रात मुलीचा बाप जावई विकत घेतो. आणि त्याला घर बांधून देतो. त्याचा नमुना येथे आहे. दक्षिण सुमात्रातील घरे तरंगती होती. या सर्व प्रदेशांची नि घरांची वरील यादी नि वर्णन वानगी म्हणून आहे. सगळ्यांचे वर्णन शक्य नाही. किंबहुना आम्ही सगळे उद्यान पाहूही शकलो नाही. इंडोनेशियाचे बोधवाक्य 'बिन्नेका टुंगल इका'–विविधतेत एकात्मता–हे आहे. हे उद्यान पाहिल्यावर त्याचे महत्त्व नि आवश्यकता पटते.

'घर, बायको नि गाणारा पक्षी म्हणजेच खरे सौख्य' ही जावामधली म्हण सांगून ह्यूज पुढे लिहितात की, बहुतेक घरकुलांच्या बाहेर एक खांब असतो आणि त्यावर पिंजरा असतो. त्यात एक पक्षी असतो, नि तो आनंदाने गात असतो. यावरून आपल्याला जावामधल्या लोकांचे पक्षीप्रेम नि तिथल्या चित्रविचित्र पक्ष्यांची कल्पना करता येते. या उद्यानातच एका बाजूला पक्ष्यांचे नमुनेदार संग्रहालय आहे. त्यात किती तरी जातींचे पक्षी ठेवलेले होते. चित्रविचित्र रंगांचे पोपट होते, गरूड होते; गरूडाचे नाव होते कासुरी, कस्तुरी राजा हा बदामी नि पिवळटसर पांढऱ्या रंगाचा एक छोटा पक्षी होता. त्याचे वैशिष्टच म्हणजे हवेत फेकलेली अळी तो पकडत असे. तिथल्या गाईडने त्याचे प्रात्यक्षिक दाखविले नि आमच्यापैकी अनेकांनी त्याचे फोटो घेतले. कायम स्मरणात राहील असा हा पक्षीखाना होता.

सहल संपल्यावर इंडोनेशियातील फळफळावळ दाखविण्यासाठी वाटेवरच्या एका मार्केटमध्ये आम्हाला गाईडने नेले. इथे दोन फूट लांबीचा पपई होता. लंगड्यासारखा दिसणारा आंबा होता. सफरचंदाचा रंग जांभळा होता, तर गुलाबी रंगाचा पेरू होता. स्थानिक किवी हे फळ चिक्कूच्या आकाराचे नि आत लिचीसारखे होते. चवीला मात्र थोडे आंबट होते. स्थानिक सिगरेटविषयी मला कुतुहल होते. तेव्हा गाईडच्या मदतीने मी ती घेतली. तिचे नाव क्लोव्ह सिगरेट होते, आणि ती कडक असून तिला लवंगेचा स्वाद होता.

योग्याकर्ता हे जावा संस्कृतीचे केंद्र समजले जाते. प्राचीन माटारम

राज्याची ती राजधानी होती. १९४५ ते १९४९ या काळातल्या डचां-विरुद्धच्या स्वातंत्र्ययुद्धात तिला राजधानीचे स्थान मिळाले होते. आणि येथूनच देशभर सशस्त्र संघर्ष चालविला गेला. बोरोबुडूरचा प्रसिद्ध बौद्ध स्तूप नि प्रांबानन येथील मंदिरे ही योग्याकर्ताच्या जवळ असल्याने या गावाला धावती भेट देण्याचे आम्ही ठरविल्याचा उल्लेख प्रारंभी केला आहे.

पहाटे साडेतीन वाजता सात्रिआवीच्या प्रतिनिधीचा दूरध्वनी आला की, मी चार वाजता हॉटेलवर येत आहे. आम्ही तत्पूर्वीच तयार होतो. मग हॉटेलने बांधून दिलेली न्याहारी बॅगेत टाकली नि सामान घेऊन खाली आलो. साडेचार वाजल्यानंतर आम्ही विमानतळाकडे निघालो. इंडोनेशियात अंतर्गत विमान प्रवासासाठी दोन तास आधी यावे लागते. थोड्याच समयात विमानतळावर पोहोचलो. सामान रवाना केले. आणि आम्ही सिक्युरिटीच्या विभागात प्रवेश केल्यावर सात्रिआवीचा प्रतिनिधी परत गेला. सव्वा पाच वाजल्यापासून गर्दी वाढू लागली. पंधरा मिनिटांनी उजाडले. दूरवर डोंगर दिसत होता. त्यांच्यावरचे आकाश लालसर झाले. मग सूर्योदय झाला. कॅथे पॅसिफिक, चायना एअरलाइन्स, इंडोनेशिअन एअरवेज, सिंगापूर एअर लाईन्स यांची विमाने जवळ उभी होती. त्यांची उड्डाणापूर्वीची देखभाल चालली होती.

सव्वा सहाला आम्ही बसने विमानाकडे आलो. विमानात बरेच प्रवासी होते. खिडकीपाशी एक इंडोनेशिअन बसला होता. आम्हा दोघांना पाहून त्याने आपली जागा रिकामी करून तो पाठीमागे गेला. विमानात रंगीत चित्रे काढलेली होती, नि ती महाभारतातील पुरुषांची वाटली. विमान उडाल्यावर दूरवर हिरव्या गर्द झाडीची पर्वतश्रेणी नजरेत आली, नि खाली हिरवळीने भरलेले विस्तृत मैदान दिसले. आकाश निळे होते नि त्यात शुभ्र मेघ तरंगत जात होते. काही वेळाने बराच डोंगराळ प्रदेश आला आणि दूरच्या डोंगरात पांढऱ्या ढगांची गर्दी असल्याने तिथे सरोवर आहे असा भास होत होता. जवळच्या डोंगरात लहान-मोठ्या वस्त्या दिसल्या.

सातच्या सुमारास समुद्र किनारा दृष्टिपथात आला. त्याला चार-पाच नद्या मिळत होत्या. किनाऱ्यापाशी पाण्याचा रंग हिरवट होता. मात्र दूरवर तो निळा दिसत होता. किनाऱ्यालगत खेडी दिसू लागली. योग्याकर्ता जवळ येत होते. सगळा प्रदेश हिरवाचार होता. दूरवर डोंगर, आखीव शेती, टुमदार घरे, मोठे रस्ते, स्टेडिअम, केळींच्या बागा, पाईन वृक्षाची वने हे चित्र दिसत असतानाच विमानाने भूमीकडे झेप घेतली. योग्याच्या तळावर

विमान उतरलें तेव्हा सात वाजून दहा मिनिटे झाली होती. आमचे गरूडा-वरचे – इंडोनेशिअन एअरवेजचे नाव – उड्डाण संपले होते.

योग्याचा लाउंज लहान आहे. त्यातून बाहेर आलो. आवारात काही टॅक्सी, टेंपो, वगैरे वाहने दिसली. पण सात्रिआवीचा प्रतिनिधी आढळेना ! काही क्षण अस्वस्थ झालो. तो आला नाही तर स्वतंत्र वाहन करून निवडक स्थळांना भेट द्यायची असा मनाशी बेत करीत असतानाच तो आला. तेवढ्यात सामानही आले. ते कार्यालयात ठेवण्याची त्याने व्यवस्था केली, आणि आम्ही न्याहारी घ्यावी असे सुचविले. पण त्यात वेळ न दवडता लगेच निघणे बरे असे आम्ही म्हणालो. तेव्हा साडेसात वाजता आमची मिनीबस प्रांबाननच्या दिशेला निघाली.

प्रांबानन हे गाव योग्याकर्ताच्या पूर्वेला १२ किलोमिटरांवर आहे. तिकडे जाणारा रस्ता लहान होता. त्याच्या दोन्ही बाजूंना हिरवीगार शेती नि केळीची वने होती. बहुतेक शेतांत बैल दिसले. वाहतुक तुरळक होती. वाटेत लहान गावे लागत होती. सगळा प्रदेश गोवा किंवा केरळ यांचे स्मरण देत होता. मध्येच एक लहान मंदिर दिसले. अर्ध्या तासाने प्रांबानन आले. इथल्या मंदिरांविषयी रेजिनाल्ड ली मे आपल्या ' द कल्चर ऑफ साउथ-ईस्ट एशिआ ' या ग्रंथात लिहितात, " प्रांबानन या नावाने ज्ञात असलेल्या देवळांचा गट जोगजकार्ता नि सुराकर्ता यांतील मार्गावर आहे...आणि अत्यंत उपेक्षिलेल्या स्थितीत असली तरी सामान्य जनतेत त्यांच्याविषयी अत्यंत पूज्यभाव असे. " नवव्या शतकाच्या उतरार्धात माटारम राजवंशाच्या कारकिर्दीत ही मंदिरे बांधली गेली.

प्राकार खूप मोठा आहे. भोवताली लहान तट आहे. आत उद्ध्वस्त मंदिरांचे प्रस्तर एकत्र करून त्यांचे ठिकठिकाणी ढीग रचलेले आहेत. सुमारे पाउणशे पाथरवट तिथे काम करीत होते आणि त्यांच्या छिन्न्यांचे आवाज सतत ऐकू येत होते. परवारा टेंपल्सची – म्हणजे प्राकारातील छोटी मंदिरे असावीत – संख्या २२४ आहे. पण त्यांतले एकही उभे नाही. या ऱ्हास झालेल्या वास्तूच्या पुनर्बांधणीला १९३७ मध्ये प्रारंभ झाला. १९५३ मध्ये डॉ. सुकार्नोंच्या हस्ते कामाचा मुहूर्त होऊन त्याला जोर आला. मंदिरांच्या माहितीसहचा आलेख प्रवेशद्वारापाशी लावलेला आहे. गाईडच्या सांगण्याप्रमाणे ढिगांमधले प्रस्तर पुन्हा एकत्र लावून मंदिर तयार झाले की, मग ते प्राकारात योग्य जागी उभे केलें जाईल.

मध्यभागी ब्रह्मा, शिवा नि विष्णू ही तीन मंदिरे आहेत. त्यांच्यासमोर त्यांच्या वाहनांची म्हणजे हंस, नंदी, नि गरूड यांची मंदिरे आहेत. यांतले शिवाचे मंदिर चांगले दुरुस्त झाले आहे, नि त्याची उंची १३० फूट आहे. गाभाऱ्यात उभा असलेल्या शिवाचा पुतळा आहे. भोवतालच्या दगडी भिंतींवर उत्तम कोरीव काम आहे. प्रवेशद्वाराच्यावर गणपतीची मूर्ती आहे.



प्रांबाननमधील विष्णूचे मंदीर

खालच्या टेरेसवरच्या भिंतीवर रामायणाची कथा कोरलेली आहे. उजव्या बाजूच्या गाभाऱ्यात अगस्तीचा पुतळा असून त्याच्या हातांत कमंडलू नि त्रिशूळ आहेत. पाठीमागच्या भागातल्या गाभाऱ्यात गणेशाची लक्षणीय मूर्ती आहे. डाव्या भागाकडच्या गाभाऱ्यात दुर्गादेवीची मूर्ती आहे. तीही उत्तम स्थितीत आहे. या मंदिराच्या समोरच्या मंदिराला छप्पर नाही. त्यात नंदीचा मोठा पुतळा आहे. असा मोठा नंदी मी तंजावरला पाहिला होता.

शिव मंदिराच्या उत्तरेला विष्णूचे मंदिर येते. या मंदिराच्या गाभाऱ्याला लोखंडी कुंपण आहे. त्यातून मूर्ती दिसते. देवळाच्या बाहेरील भिंतींवर कोरीव काम आहे. ब्रह्माचे मंदिर हे शिव मंदिराच्या दक्षिणेला येते. त्या मंदिराचे द्वार बंद होते, आणि त्याच्या पुढील भिंतींच्या दगडावर कोरीव

काम नाही. जवळच नाटकगृह आहे. तेथे रामायणाची नृत्यकथा–रामायण बॅले – मेपासून ते ऑक्टोबरपर्यंत प्रत्येक महिन्यात चार दिवस अशी वद्य पक्षात केली जाते. या बॅलेच्या संबंधात इव्हान साउथऑलने ' इंडोनेशिया फेस टू फेस ' या ग्रंथात म्हटले आहे की, १९६१च्या जुलै महिन्यात हा खेळ संपल्यावर चार्ली चॅपलीन स्टेजवर गेला नि लोकांना आलिंगन देऊन म्हणाला, " मध्य जावात एक सांस्कृतिक अजब गोष्ट आहे.... हे नृत्य मोठे काव्य आहे. "

मंदिराच्या प्राकारातून बाहेर पडले की, एक व्यापारी पेठ आहे. त्यात सुव्हेनिअर्सपासून ते खाण्याच्या पदार्थांपर्यंत सर्व वस्तू मिळतात. त्याच्या पलीकडे आपल्याला मैलोमैलांची शेती नि संथ नदीचे पात्र दिसते. येथूनच दोन एक मैलांवर बुद्ध मंदिराचे अवशेष आहेत. ते चांडी कलासनचे असावेत. सुमारे अर्ध्या मैलाच्या परिसरात या बुद्ध मंदिराचे भग्न अवशेष पडलेले होते. मात्र त्यांना जपून ठेवण्यात येत आहे. त्यांच्यावर क्रमांक घातलेले दिसले. आतल्या मूर्ती आठ-दहा फूट उंचीच्या असाव्यात. द्वारपालाच्या मूर्ती त्याहून मोठ्या होत्या.

बुद्ध मंदिराच्या अवशेषांकडून आम्ही शैव मंदिराकडे निघालो. रस्ता डांबरी नव्हता, नि लहान होता. भोवताली मात्र केळी, नारळी यांच्या उदंड बागा लागल्या. त्रिवेंद्रमकडे जाणाऱ्या रस्त्याची या प्रवासात आठवण झाली. मंदिराच्या भोवती डोंगरमाळ होती. येथेही २४९ लहान देवळांचे अवशेष होते नि नेहमीप्रमाणे एक अजस्त्र द्वारपाल उभा होता.

योग्याकर्ताच्या सुलतानाचा राजवाडा – क्रेटॉन–गावात असून जावानीज कलेचा तो उत्तम नमुना समजला जातो. योग्यात परत जाणाऱ्या रस्त्यावर अनेक छोटी गावे लागली. त्यांतली बहुतेक घरे एकमजली होती. रस्त्यात मोटरी नि मोटर-सायकली दिसल्या, तरी सायकलचा वापर अधिक आढळला. रस्ता बराच वेळ अगदी सरळ होता. आणि त्याच्या बाजूला बांबूंची असंख्य वने दिसली. दहाच्या सुमारास क्रेटॉनच्या आसमंतात आम्ही आलो. वाटेत एक मोठे चर्च दिसले. त्यानंतर एक छोटे चर्च लागले. रस्ते बरे होते आणि रहदारी खूप होती. मात्र घोडागाडीचा वापरही बराच दिसला. एक मोठा चौक ओलांडल्यावर क्रेटॉन दिसू लागतो. त्याच्या भोवताली पांढऱ्या रंगाचा कोट आहे. जेथे प्रवेश शुल्क घेतले जाते तिथे जवळच ५० वर्षांचे वडाच्या झाडासारखे झाड होते. त्याचे नाव ' देवता ट्री ' असल्याचे समजले.

राजवाड्याच्या प्रवेशद्वारी दहा फूट उंचीचे द्वारपाल होते. त्यांचे फोटो घेण्याची उतावीळ येथे आलेल्या शेकडो पर्यटकांना लागली होती. हा राजवाडा १७५६मध्ये बांधण्यात आला. आत प्रवेश केल्यावर खूप मोठे अंगण येते. त्यात मंडप आहेत, पहिल्यात पालख्या होत्या. जन्माला आलेल्या बालकाचे भविष्य त्याला पिंजऱ्यात ठेवून पाहण्याची प्रथा आहे. तसा पिंजरा इथे होता. शिवाय लग्नासाठी लागणारी साधन सामग्री, सुंता करण्याच्या वेळी होणाऱ्या धार्मिक विधीसाठी लागणारी सामग्री येथे लावून ठेवलेली होती.

मधल्या मंडपात वापरलेला पाषाण हा चीनहून भेट म्हणून आलेला होता. त्यात राजेशाही डोल्या नि पालख्या आहेत. समाज जीवनात बाईचे स्थान कनिष्ठ असल्याने तिला पालखीत पाठीमागे बसावे लागत असे. ती जागा दाखवल्यावर गाईड म्हणाली की, आता मात्र स्त्री-पुरुषांत समानता आहे. लग्न मंडपात निरनिराळ्या प्रकारची वाद्ये आहेत. ती चिनी असावी असे वाटलें. गोल्डन पॅव्हिलिअनवर हिंदू संस्कृतीचा प्रभाव वाटतो. डायनिंग हॉलमध्ये सगळेच प्रेक्षणीय होते. इथले चषक हॉलंडमधले होते, हंड्या नि झुंबरे व्हेनिसची होती आणि पाषाण इटलीतला होता. एका लहानशा मंडपात सुलतानांच्या सहा पिढ्यांचे बायका – मुलांसमवेत फोटो होते. मंडपापासून थोड्या अंतरावर बकुळीचे झाड होते. त्याचे स्थानिक नाव होते. सावाकोची. मनःशांतीसाठी त्याचा उपयोग होतो. बाहेर जॅक फ्रूटच्या लाकडाचा मोठा ड्रम होता. त्याचा उपयोग धोक्याची सूचना देण्यासाठी होतो.

सुलतानाचे राहण्याचे ठिकाण थोडे पलीकडे होते. त्यात अजूनही त्याचे त्याच्या लहान मुलांबरोबर वास्तव्य असते. मुलांची लग्ने झाली की, ती बाहेर राहण्यास जातात. सुलतान स्वतः बहुतेक वेळ जकार्तालाच असतो. कारण आता तो मंत्री आहे. मात्र या प्रजासत्ताक राजवटीतही योग्याकर्ताचा राज्यपाल हेच त्याला स्थान आहे.

राजवाडा पाहून झाल्यावर आम्ही बोरोबुडूरकडे निघालो. रस्ता सपाट प्रदेशातून होता. पण तो सगळा प्रदेश हिरवागार होता. रहदारी फारशी नव्हती. काही वेळा बसगाड्या जाताना दिसत. त्यांना लोंबकळून लोक जात होते. या बसगाड्यांची नावे पाहिली की, रामायण नि महाभारत या महाकाव्यांचा लोकजीवनावर किती प्रभाव आहे याची कल्पना येते. एका बसचे नाव होते रामायण नि परतीच्या मार्गावर भेटलेल्या बसचे नाव होते

कुंती. असे सांगतात की, डॉ. सुकार्नो यांनी राजकीय-लिखाण करण्यासाठी भीम हे टोपण नाव घेतले होते. काही वेळा अद्ययावत टुरिस्ट बसगाड्या, मिनी बसगाड्या वा मोटरी भेटत. त्यातले बरेच प्रवासी युरोपीय होते.

बोरोबुडूरच्या वाटेवरच मेंडूट टेंपल येते. आठव्या शतकात ते बांधण्यात आले. त्याच्या प्रवेशद्वाराचे तोंड हिंदुस्थानाकडे आहे. बोरोबुडूरकडे जाणारा रस्ता थोडा वळतो त्या वळणाच्या उजव्या हाताला मोठी बाग येते. त्यात डाव्या हाताला मोठा वृक्ष आहे. तो ५० वर्षांचा असावा. वैशाख महिन्यात येथे मोठी जत्रा भरते. त्यावेळी या वृक्षाची लोक पूजा करतात.


मंदिरात प्रवेश करण्यासाठी आपल्याला सुमारे वीस-पंचवीस पायऱ्या चढाव्या लागतात. मंदिराच्या गाभाऱ्यात तीन मूर्ती आहेत. पहिली सुमारे सहा फूट उंचीची अवलोकेश्वराची; दुसरी आठ फूट उंचीची शाक्यमुनीची; नि तिसरी सहा फूट उंचीची वज्रपाणिची. मूर्तीसमोर उदबत्ती जळत होती. त्याचा सुवास दरवळला होता. बाहेर कुबेर नि तारा यांच्या मूर्ती आहेत. मंदिराच्या दगडी भिंतींवर इसापनीतीतल्या कथा कोरलेल्या आहेत. त्यांपैकी माकड नि सुसर तसेच हंस-क्षीर-न्याय या दोन कथा गाइडने दाखविल्या. येथे बुद्धाची कथा नसती तरच आश्चर्य !

मंदिराच्या बागेतून बाहेर पडले की, डाव्या हाताला नवीन बुद्धिस्ट मॉनस्ट्री आहे. एकेकाळी हिंदू संस्कृतीने किती मोठ्या प्रदेशावर आपला प्रभाव पाडला होता याची कल्पना ही सर्व मंदिरे पाहताना येते. आणि आपण पूर्वजांइतके पराक्रमी नसलो तरी त्यांच्या सांस्कृतिक पराक्रमाची स्मारके पाहू शकलो याचे विलक्षण मानसिक समाधान असते.

बोरोबुडूरकडे जाणारा रस्ता रम्य वनश्रीने नटलेला होता. दूरवर डोंगरांची माळ दिसत होती. त्यावर अत्यंत दाट झाडी होती. अधूनमधून लागणाऱ्या नद्या, बांबूची वने, केळी नि नारळी यांच्या असंख्य बागा, भाताची शेती, यांतून हा रस्ता गेलेला होता. बोरोबुडूरचा परिसर हिरव्या शालूत लपेटलेला वाटला. या निसर्गचित्रावर लुब्ध होऊन रेबा लुईसने त्याला सिंफनीची उपमा दिली आहे.

बोरोबुडूरचा स्तूप हा दोन मैलांवरून दृष्टिपथात येतो. भोवतालच्या हिरव्यागार वनश्रीतून त्याचे दगडी शिखर आकाशाकडे जाताना दिसते. विश्वरचनेची महायान बौद्धधर्माची जी कल्पना आहे त्याचे पाषाणातले हे चित्र आहे असे वॅग्नरने ' इंडोनेशिया – द आर्ट ऑफ अॅन आयलंड ग्रूप ' या

पुस्तकात वर्णन केले आहे. स्तूप ज्या टेकडीवर आहे त्याच्या अलीकडे सुमारे पाव मैल बोरोबुडूरचा मोठा बाजार येतो. त्याच्या चौकात आज दहा



बोरोबुडूरचा जगप्रसिद्ध स्तूप

लक्झरी कोच, पन्नास-एक मोटरी नि इतर वाहने उभी होती. परदेशी तसेच स्थानिक पर्यटक असंख्य होते. त्यांच्यासाठी एक रेस्ट हाऊसही तेथे आहे.

येथून आपल्याला चालत वर जावे लागते. थोडी चढण चढून गेल्यावर कार्यालय येते. तेथे प्रवेश शुल्क भरावे लागते. प्रवेशद्वारापासून सुमारे शंभर पायऱ्या चढून गेले की, टेकडीचा सपाट माथा येतो. स्तुपाच्या दोन्ही बाजूंकडे त्याच्यापेक्षा उंच असलेल्या क्रेन उभ्या होत्या. त्यांच्या साहाय्याने स्तूपामधले प्रचंड पाषाण उचलून खाली दुरुस्तीसाठी आणण्यात येत होते. मोठ्या प्रमाणावर स्तुपाची दुरुस्ती चालू असल्याने वर जाण्याच्या मार्गावर दोन्ही बाजूंनी पन्नास फुटांची जागा सोडून बाकीच्या भागाला दोराचे कुंपण घालण्यात आले होते. त्यामुळे सगळ्या भागाकडे फिरणे शक्य नव्हते.

परंतु दुरून पाहिला तरी स्तूप भव्य वाटतो. प्राचीन आशिआई शिल्प-कलेचे, कोरीव कलेचे, मूर्तिकलेचे अभ्यासक या स्तुपाबद्दल कौतुकाने लिहितात. मे त्याचे वर्णन 'वंडर टेंपल ऑफ बोरोबुडूर' असे करतात. हॅवेल यांना तो आशियाचा पार्थिनॉन वाटतो. कुमारस्वामींना शांत वातावरणात परिपक्व

झालेले फळ आहे, असे या स्तुपाबद्दल वाटते. दूर उभे राहून त्याच्या पायथ्यापासून वर नि डावीकडून उजवीकडे नजर टाकली की वरील वर्णने अतिशयोक्तीची नाहीत हे पटते.

आठव्या शतकात शैलेंद्र राजवंशाच्या काळात तो बांधला गेला. पुढे भारतीय संस्कृतीच्या प्रभावाला ओहोटी लागली .नि या स्तुपाची उपेक्षा सुरू झाली. मग जंगल नि माती यांनी त्याला गिळून टाकले. जेमतेम शिखर दिसत होते. १८३५मध्ये जंगल नि माती यांच्यातून त्याची मुक्तता झाली. १९०१पासून दुरुस्तीला प्रारंभ झाला. १९०७ ते १९११ या काळात डॉ. टि. व्ही. अर्प या पुराणवस्तूसंशोधकाने ही वास्तू बरीच सावरली. १९७४पासून दुरुस्तीच्या कामाला वेग आला असून १९८३मध्ये ते पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

स्तुपावर जाण्यासाठी पायऱ्या आहेत. त्या चढून आपण तिसऱ्या टेरेसवर जातो. इथल्या भिंतीवर बुद्ध जीवनातल्या कथा कोरलेल्या आहेत. येथून आणखी तीन टेरेस चढाव्या लागतात. आणि या प्रत्येक जागी पाषाणात निरनिराळ्या कथा कोरलेल्या आहेत. या कोरलेल्या पाषाणांची एकंदर लांबी सहा किलोमिटर्स होते. चवथ्या टेरेसनंतर गोल टेरेस येतात. त्यांच्यांत मोठ्या घंटेच्या आकाराचे स्तूप आहेत. आणि त्या प्रत्येकात बुद्धाची मूर्ती आहे. या घंटेत हात घालून बुद्ध मूर्तीला स्पर्श करता आला तर हात लावणारा पुण्य जमा करतो अशी श्रद्धा आहे. असे पुण्य आम्ही जमविले. गोल टेरेसच्या वर चढून गेले की, मुख्य स्तूप येतो. त्यावरून भोवतालच्या रम्य नि हिरव्यागर्द प्रदेशाचे निसर्गचित्र दिसते. इंडोनेशियाला गेलो तर बोरोबुडूर पाहायला जायचे असा माझा निश्चय होता. तो यशस्वी झाला याबद्दल परमेश्वराचेच ऋणी राहावयाचे. नाही तर माझ्यासारख्या सामान्य माणसाच्या जीवनात हे कसे शक्य होते ?

बोरोबुडूर पाहण्याचा आनंद लुटत असतानाच उन्हाच्या तिरपीने बेजार झालो. विलक्षण उन्ह होते. खाली आल्यावर स्तुपासमोरच्या बाजारातल्या एका दुकानात थंड पेय नि बर्फ घेतला. थोडा वेळ डोक्यावर बर्फ धरला तेव्हा बरे वाटले. बोरोबुडूर पाहण्यासाठी अशी तपश्चर्या करावी लागली. हा स्तूप पाहिल्यावर योग्यामधले महत्त्वाचे असे पाहण्याचे काही राहिले नव्हते. अर्थात दुसरी काही छोटी-मोठी स्थाने होती. पण ती पाहण्यासाठी आमच्याकडे वेळ नव्हता. संध्याकाळच्या विमानाने बालीकडे जाऊन आमच्या

डॉक्टरांच्या गटात दाखल होणे आम्हाला भाग होते.

आता आमची मिनीबस योग्याकडे निघाली. वाटेत लहान गावे लागत होती. दुपार झाल्याने ट्रक, कोच, मोटरी, मोटर सायकली यांची रहदारी वाढली होती वाटेवरची काही गावे टुमदार वाटली. त्यांपैकी मुनिसात हे होते. काही समयाने झिमझिम पाऊस पडू लागला. त्यामुळे उष्मा कमी झाला. योग्यात शिरलो तेव्हा दोन वाजले होते. येथे बऱ्याच मुलींना मी मोपेड चालवताना पाहिले. अर्थात या पूर्वीच्या गावातही सायकल नि मोपेडवर बसलेल्या मुली दिसायच्या. पण त्यांची संख्या अल्प होती.

विमानतळावर आल्यावर तिथेच ठेवलेले सामान पुढे रवाना केले. मग कर भरला. सात्रिआवीच्या प्रतिनिधीने सहलीच्या व्यवस्थेबद्दलचा तक्ता भरण्यास आम्हाला दिला. उत्तम व्यवस्था असल्याचा शेरा आम्ही त्यात लिहिला. मग त्या प्रतिनिधीने आम्हाला सांगितले की, देनपसारला कोणी तरी आम्हाला घ्यायला येईल. तो गेल्यावर लाउंज बाहेरच्या मैदानात मी आलो. नुकताच पाऊस पडून गेला होता. वातावरण थंड नि स्वच्छ होते. आकाशाचा निळा रंग परत आला होता. धावपट्टीवरचे पाणी उन्हात तळपत होते. लाउंजमध्ये पर्यटकांची गर्दी होती. आमचे उड्डाण अखेरचे होते. शेवटी आमचा क्रमांक आला.

पावणेचार वाजता विमानाने आकाशाकडे झेप घेतली. सूर्यप्रकाश लख्ख असला तरी पांढऱ्या ढगांमुळे खालचे दृश्य थोडे अस्पष्ट झाले होते. तरी नागमोडी नद्या, कापणी झालेली शेते, जमिनीचे पिवळसर चौकोन, भोवतालचे विस्तृत जंगल या गोष्टी दिसल्या. चारनंतर शांत समुद्र नजरेत आला. विमान किनाऱ्याकडून जात होते. किनाऱ्यापासून थोड्या अंतरावर डोंगराची रांग होती. आता विमान भूमीकडे वळले. तेव्हा खाली गावे दिसू लागली. पण काही क्षणाने पुन्हा समुद्र लागला. त्यात एक बेट होते. मग पुन्हा भूमी आली. त्यावर विपुल झाडीची डोंगरमाळ होती. एकाएकी शुभ्र मेघांचे लोट येऊन सर्व दिसेनासे झाले. काही मिनिटांनी विमान ढगांतून बाहेर आले नि खाली समुद्रातल्या लहान होड्या दिसू लागल्या. साडेचारनंतर विमान उतरू लागले. आणि पाहता पाहता ते धावपट्टीवर पळू लागले. बाली बेटातल्या देनपसार या गावाच्या विमानतळावर आम्ही उतरलो होतो. गरूडावरचे उड्डाण संपले होते.

इथला लाउंज लहान होता. पण पर्यटकांनी गजबजलेला होता. एका

भिंतीवर बाली बेटाचा खूप मोठा ' रिलीफ मॅप ' होता. तो पाहत उभे असताना आमची चौकशी करीत सात्रिआवीचा प्रतिनिधी आला. त्याने सामान मिनीबसमध्ये ठेवले आणि गाडी हॉटेल सानूर बीचच्या दिशेने धावू लागली. रस्ते मोठे होते. त्यांना भेदणारी दगडी ओळ होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना नारळाची उंच झाडे होती. येथेही क्षितिजापर्यंत पसरलेले हिरवेगार मैदान दिसले. रस्ता जेव्हा एका चौकात शिरला तेव्हा तेथे एक पुतळा दिसला. डचांविरुद्धच्या संघर्षात १९४५मध्ये हुतात्मा झालेल्या कोल नेगुराह राय याचा हा पुतळा होता. आता नारळी नि केळी यांची वनेच्या वने लागली. काही ठिकाणी खाडीतही छोटी घरे उभी असलेली दिसली. जुहू बीचचे स्मरण व्हावे असेच काहीसे हे दृश्य होते. आकाशाचा रंग फिकट निळा होता नि त्यात निस्तेज चंद्र दिसला. अशा या शांत वातावरणाचा आस्वाद घेत असतानाच बस सानूर बीचच्या पोर्चमध्ये येऊन थांबली.

बाली बेटाचे वर्णन हजारो मंदिरांचे बेट असे करतात. प्रत्येक घरात एक छोटे मंदिर, नि प्रत्येक खेडेगावात एक मंदिर असते. तसेच मोठी मंदिरे नि राजघराण्याची मंदिरे असतात. त्यामुळे हजारो मंदिरांचे बेट हे वर्णन यथार्थ आहे. पण बालीचे आणखीही एक वर्णन आहे. ते म्हणजे इस्लामी समुद्रातील हिंदू बेट. तेही वर्णन योग्यच आहे. कारण पूर्व जावातल्या डोंगराळ भागात थोडे हिंदू आहेत, बाली बेटाच्या पूर्वेला असणाऱ्या लोंबोक बेटातली वस्ती बरीच हिंदू आहे. पण बाली बेट हे हिंदू असून त्याच्यावरचा हिंदू संस्कृतीचा छाप गडद आहे. बालीची लोकसंख्या सुमारे वीस लाख असावी.

माडजापाहित या जावामधल्या प्रसिद्ध हिंदू साम्राज्याचा बाली एक भाग होता. पुढे इस्लामच्या आघाताखाली पंधराव्या शतकात हे साम्राज्य कोसळले. तेव्हा आपले कवी, नृत्यकार, नट, कारागीर, धर्मगुरू आणि सैनिक यांना घेऊन सरदारवर्ग बाली बेटात आश्रयाला आला. पुढे ज्या लोकांना आपला धर्म नि संस्कृती टिकवून धरावयाची होती त्यांनी तोच मार्ग स्वीकारला. अशा प्रकारे जावा–हिंदू संस्कृतीचा हे बेट बालेकिल्ला झाला. जावाचे मुस्लिम राजे बालीचा कधीच कबजा करू शकले नाहीत. त्याचप्रमाणे डचांचे वर्चस्व या बेटावर फार उशिरा बसले, आणि संपूर्ण स्वामित्व बसण्याला १९१४ साल उजाडले.

बाली लोकांचे सौंदर्य, त्यांची कलाप्रियता, शांत नि कष्टाळू स्वभाव, चोरीचपाटी या दुर्गुणांचा त्यांच्यांत असलेला अभाव नि बेटाचे नैसर्गिक

सौंदर्य यामुळे बाली बेटाचे नाव जगात सर्वश्रुत आहे. बलिन् या संस्कृत शब्दापासून या बेटाला बाली नाव मिळाले असे म्हणतात, नि बाली बेटाचा इतिहास पाहता ते नाव योग्य वाटते. बालीचे लोक कमालीचे स्वातंत्र्यप्रेमी नि देशभक्त आहेत याची कल्पना फार थोड्यांना असते. १९०४ मधली एकच कथा त्यांच्या राष्ट्रीय स्वभावाची कल्पना देते. ही कथा रेबा लुईसने आपल्या पुस्तकात तसेच हेलन येट्स्ने 'बाली : एंचांटेड आईल' या आपल्या पुस्तकात दिली आहे.

१९०४मध्ये एक चिनी जहाज सानूर किनाऱ्यापाशी खडकावर आपटून फुटले. मग त्यातला किनाऱ्याकडे लागलेला माल बाली लोकांनी घेतला. पुढे जहाजाच्या मालकाने डचांकडे नुकसान भरपाईची मागणी केली. बाली लोकांनी माल परत देतो किंवा डचांनी तक्रारीचा निकाल करावा अशी सूचना केली. पण डचांनी त्यास नकार दिला नि पुढे बालीच्या किनाऱ्याची नाकेबंदी केली. त्यानंतर दोन वर्षे छोटचा झटापटी झाल्या. शेवटी डचांनी तोफखान्यासह एक दल रवाना केले. बाली लोकांकडे तोफखान्याला उत्तर नव्हते. शेवटी राजवाड्यात बैठक होऊन जोहार करण्याचे ठरले.

दुसऱ्या दिवशी राजवाड्यावर चढाई करण्यासाठी डच दल पुढे सरकले तेव्हा त्यांना समोर उंची कपड्यांतले लहान मुलांसहचे राजकुटुंब नि दरबारी लोक दिसले. मध्यभागी सोन्याच्या पालखीत राजा बसला होता. एका बाली सैनिकाने बाबूंची बंदुक उडवल्यावर डचांनी आपल्या बंदुका चालवल्या. त्यामुळे काही माणसे मारली गेली. मग एका धर्मगुरूने खंजीर काढून भोवतालच्या बायकामुलांच्या अंगांत खुपसला. तेव्हा डच सैनिकांनी त्याला गोळी घातली. शेवटी बायकांनी डच सैनिकांकडे धाव घेतली नि आपल्या अंगावरचे दागिने त्यांच्या पायाकडे फेकून त्या म्हणाल्या, 'हे घ्या सोने' आणि डचांनी आपल्यावर गोळ्या चालवाव्या म्हणून आपली वक्षःस्थळे उघडी केली. डच सैनिकांनी त्यांना साहाय्य करण्याचा प्रयत्न केला. पण या तेजस्वी लोकांनी त्याला नकार दिला. या लढाईला पुपुटान – अखेरपर्यंतची लढत – असे नाव आहे.

बाली समाजात चार वर्ण आहेत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य नि शुद्र. शेवटच्या वर्णाची संख्या जास्त आहे. आणि आपल्याकडच्या जातिभेदाइतके तणाव नसले तरी थोड्या प्रमाणात ते आहेत. लग्ने हिंदू पद्धतीने शक्यतो जातीतच होतात. पण ती पद्धत मागे पडत आहे. मुलगा नि मुलगी लग्न करण्यासाठी

पळून गेली तर मुलीचा बाप शेजाऱ्यांच्या मदतीने त्यांना शोधून काढतो नि थोडा रागावल्याचा देखावा करतो. पण मग हिंदू मंदिरात त्या पळालेल्या जोडप्याचे लग्न साजरे होते. पण अजूनही मुलाला मुलीच्या बापाला थोडे द्रव्य द्यावे लागते. अशा प्रकारचे लग्न सुमात्रातल्या अॅटजेह प्रदेशातल्या मुस्लिम कर्मठ समाजात होत नाही. त्या प्रदेशात अशी म्हण आहे की, विहिरीला बादली आपोआप सापडत नाही. बालीमध्ये सतीची चाल होती. डचांनी ती बंद केली. तेथे कोणी राममोहन रॉय होते असे ऐकिवात नाही.

मृत्यू पावलेल्या माणसाच्या दहनाविषयी, (स्थानिक भाषेत दहनाला नाबेन म्हणतात.) बालीत एक निराळी चाल आहे. दहनाचा क्रियाविधी नि नंतरचा भोजन समारंभ यास फार खर्च लागतो. तेव्हा या विधीसाठी लागणारा पैसा जमविण्यासाठी काही वेळेला वर्षे लागतात. म्हणून मेलेल्या व्यक्तीला पुरण्यात येते. पुढे पैसे जमल्यावर प्रेत उकरून काढून त्याचे विधीयुक्त दहन होते. एखाद्या श्रीमंत माणसाच्या घरी मृत्यू झाला तर त्याच्याकडच्या धार्मिक समारंभात तो गावातल्या गरीब लोकांना सहभागी होऊ देतो नि आपल्याकडे पेटणाऱ्या चितेमध्ये गरीबांच्या कुटुंबातील व्यक्तींच्या अस्थी दहन करून देतो. एखाद्या गावात कोणीच श्रीमंत नसल्यास सारे गावच सामुदायिक चितेचा कार्यक्रम आयोजते नि त्यावर गावातील मृतांचे दहन होते.

प्रत्येक घरात देऊळ असल्याचा प्रारंभी उल्लेख केला आहे. असे देऊळ सुमारे सात फूट उंचीचे नि दोन फूट रुंदीचे असते. त्यावर लहान कोनाड्यासारख्या खोल्या असतात. मधली खोली ही मृत आईवडिलांसाठी असते. बाजूच्या आजोबा नि पणजोबांसाठी असतात. बाली लोकांचे पहिले पूर्वज पोलिनेशिअन आहेत. त्यांच्याकडून परंपरेने ही चाल या समाजात आली असावी. या छोट्या देवळात प्रतिदिनी सकाळी नि सायंकाळी भोजनाचे ताजे पदार्थ ठेवले जातात. हा कार्यक्रम आता बायकांना तापदायक वाटतो. कारण त्यांना दोन वेळा ताजे पदार्थ करावे लागतात !

इंडोनेशियात कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम जोरात हाती घेण्यात आलेला असल्याचे जकार्तामधल्या गाईडने सांगितले होते. पण देनपसारमधल्या गाईडने त्याविषयी अधिक माहिती दिली. मुलींच्या लग्नाचे वय २१ आहे नि शहरातून ते पाळले जाते. मात्र खेड्यांतून अजूनही बालविवाह होतात. बालीमधल्या प्रत्येक खेडेगावात दूरदर्शनचा सेट असतो. आणि दूरदर्शनच्या

माध्यमाचा कुटुंब नियोजनासाठी उत्तम उपयोग केला जातो. दूरदर्शनवर आठवड्याला एखादे प्रहसन, नाटक, किंवा नृत्य याच्याद्वारे संततिनियमनाचा प्रसार केला जातो. पहिल्या तीन मुलांपर्यंत शिक्षण मोफत असते. चौथ्या मुलापासून बापाला शिक्षणासाठी स्वतःचे पैसे खर्च करावे लागतात.

मुलांच्या नावाविषयी इथे निराळीच पद्धत आहे. पहिल्याला गेडे वायन पुलु – जन्माने पहिला; दुसऱ्याला नाडे; तिसऱ्याला न्योमान नेन्गाह; नि चवथ्याला केटूट असे म्हणतात. पाचव्यापासून पुन्हा पहिल्याप्रमाणे. थोडक्या म्हणजे पहिला राम, दुसरा राम, तिसरा राम, इत्यादी. अशाच प्रकारे नावाने हाक मारली जाते.

स्पेनमध्ये बुलफाईट (बैलांची झुंज) जशी लोकप्रिय आहे त्याचप्रमाणे बालीत कोंबडयांच्या झुंजी लोकप्रिय आहेत. म्हणून मी गाईडला विचारले की, कोंबडयांच्या झुंजी कुठे पाहण्यास मिळतात ? तेव्हा ती म्हणाली की, कायद्याने अशा झुंजींना बंदी घातली आहे. कारण अशा झुंजीत जुगार खेळला जाई. अशा जुगारामुळे काही वेळा कुटुंबांचा सत्यानाश होत असे. म्हणून या अनिष्ट चालीवर बंदी घालण्यात आली. तरीही गुपचुप हा खेळ खेळला जातो. पण पोलिसाला वर्दी मिळाली आणि त्याने पकडले तर काही वेळ तुरुंगाची हवा खावी लागते.

बालीचे पर्यटकाला आकर्षण वाटण्याचे एक कारण म्हणजे तेथील चोळया न घालणाऱ्या सुंदर तरुणी हे होय. आमचा कोच अनेक खेडेगावांतून गेला, पण चोळयाविरहित तरुणी फारशा दिसल्या नाहीत. म्हणून मी त्याविषयी गाईडकडे पृच्छा केली. तेव्हा तिने खुलासा केला की, पाश्चात्य पर्यटक नि फोटोग्राफर अशा बायकांचे फोटो घेत आणि ते घेताना त्यांचा उद्देश शुद्ध नसे. म्हणून इंडोनेशियाचे पहिले अध्यक्ष डॉ. सुकार्नो – जे स्वतः मोठे प्रेमी होते असे ती मिस्किलपणे हसत म्हणाली – यांनी बालीमधल्या बायकांनी चोळया घातल्या पाहिजेत असा नियम केला. तेव्हापासून मोकळया वक्षःस्थळाच्या स्त्रिया रस्त्यावर दिसत नाहीत, पण काही गावांतल्या वाहत्या ओढयांवर त्यांना चोळीशिवाय आंघोळ करताना मी पाहिले. तसेच ज्या एका तरुणाला पाहिले त्याने सगळया अंगाला साबण लावला होता. कोच जवळ येताच त्याने फक्त पंजाचा उपयोग लज्जारक्षणार्थ केला.

बालीचे देनपसार गाव लहान आहे. ती राजधानी नाही. उत्तरेकडे असणारे सिंगाराड्जा ही राजधानी आहे. बालीचा उत्तरेकडचा भाग फार

सुपीक नाही. दक्षिणेकडचा, म्हणजे देनपसार जिथे आहे तो, भाग अत्यंत सुपीक आहे. उत्तम भाताची बरीच पिके एका वर्षात काढण्याबद्दल बाली लोकांची प्रसिद्धी आहे.

गाव टुमदार आहे. रस्ते उत्तम आहेत. इथे बेट्जाक दिसत नाहीत. अशा वाहनाबद्दल बाली लोकांना नावड आहे. त्यामुळे बस, मोटरी, मोटर-सायकली, सायकली यांचा वाहन म्हणून उपयोग होतो. गावातील मुख्य चौकात दहा फूट उंचीचा मोठा पुतळा आहे. त्याचे नाव चतुर्मुख. त्याची चार दिशांना चार तोंडे आहेत. तिकडे जाताना वाटेत आपल्याला सरकारी नोकरांच्या वसाहती लागतात. त्यातील घरे छोटी व एकमजली होती. या वसाहतींची मांडणी आखलेली होती. त्यांच्यानंतर सैनिक अधिकाऱ्यांच्या वसाहती आल्या. त्याही त्याच प्रकारच्या होत्या.

देनपसारमधला म्युझिअम छोटा पण पाहण्यासारखा आहे. आम्ही गेलो तेव्हा तिथे दुरुस्ती चाललेली असल्याने तो बंद होता. त्याच्या शेजारीच एक मोठे मंदिर आहे. त्याचे वैशिष्टच हे की, त्यात स्पेशल सी कोरलचा. वापर केलेला आहे. इथला दुसरा छोटा म्युझिअम अबियान कपास हा आहे. फेब्रुआरी १९७१मध्ये त्याची स्थापना झाली. त्यातील चित्रे वेधक वाटली. सूर्याला गिळण्यास जाणारा हनुमान, अमृतमंथन, प्रेतदहन, टेरेस शेती, एक खेडेगाव, पितृयज्ञ – हे चित्र मोठे असून त्यात शेकडो माणसे दाखवलेली आहेत – ही चित्रे सुंदर होती. ' बालीनीज वुमन ' या चित्रातली स्त्री देखणी होती. केचक डान्स, मच्छिमार, कोंबड्यांची झुंज ही चित्रे बरी उतरली होती

' मॉडर्न पेंटिंग्ज ' या विभागातली चित्रे पिकॅसो परंपरेतील होती. एकाच चेहऱ्यात तरुण नि म्हातारा यांची तोंडे दाखवली होती. त्याचे आम्ही घेतलेले छायाचित्र चांगले आले. कोरीव लाकडाचा विभागही चांगला आहे. त्यात एक कोळी, सुंदर स्त्री, केळीचे झाड – त्यात फाटलेले पान, कोंब नि केळीचे फूल दाखविलेले होते –, बोचक्यासह काठी घेऊन चालणारा म्हातारा ही चित्रे चांगलीच लक्षात राहतात. विशेष म्हणजे गांधी नि टागोर यांचे छोटे अर्धपुतळे आहेत. सर्व प्रकारच्या कलांबद्दल बाली बेटाची ख्याती आहे. ती अनाठायी नाही याचे प्रत्यंतर येथे मिळते.

गावातल्या व्यापारी विभागात हिंदी व्यापाऱ्यांची दुकाने आहेत. येथे हिंडत असताना एका बोहऱ्याचे माझ्याकडे लक्ष गेले. त्याने मला दुकानात बोलावले आणि थंड पेय दिले. त्याचा जन्म देनपसारमधलाच. त्याचा बाप

येथे स्थायिक झाला होता. या बोहऱ्याचे नाव होते फिदाहुसेन. त्याची बायको बालीतली असावी असा तिच्या चेहऱ्यावरून माझा ग्रह झाला. आम्ही मुंबईकडचे आहोत असे त्याने तिला सांगितले. त्याच्याशी मी गुजरातीतून बोललो याचा त्याला अचंबा वाटला. तेव्हा मी बडोद्याकडचा आहे असा खुलासा केला. इतरांनाही थंड पेय पिण्यास बोलव असे तो म्हणाला. पण आम्हाला तितका वेळ नाही असे म्हणून मी त्याचा निरोप घेतला. भारतीय दुकानात हिंदी चित्रपटातली गाणी अधूनमधून वाजवली जात होती. इथे हिंदी चित्रपट फार लोकप्रिय दिसले आणि तरुणांना प्रसिद्ध हिंदी नट नि नटचा यांच्याविषयी खूप कुतूहल होते. त्यांच्याविषयी ते बरेच वेळा पृच्छा करीत. पण मीच अनभिज्ञ होतो !

चित्रकला, मूर्तिकला, संगीत, नृत्य, इत्यादी कलांविषयी बाली बेटाची ख्याती आहे. प्रत्येक खेडेगावात संगीत नि नृत्य यांचे गट असतात. नृत्य हे बाली जीवनाचे अविभाज्य अंग आहे. वयाच्या पाचव्या–सहाव्या वर्षापासून मुले, विशेषतः मुली, नृत्याचे शिक्षण घेण्यास सुरुवात करतात. कुठल्याही हॉटेलात सायंकाळनंतर बाली नृत्य दाखविले जात नाही असे क्वचितच घडते. नृत्याचे प्रकारही अनेक आहेत.

केचक डान्स – कपी नृत्य – हा देनपसारच्या आर्ट सेंटरवर होता. हा नृत्यप्रकार प्राचीन नाही. १९३०च्या सुमारास त्याचा प्रारंभ झाला. त्यातला कोरसचा भाग मात्र प्राचीन आहे. यात भाग घेणारे लोक गाढ तंद्रीत असतात. ते वानराची भूमिका करीत असल्याने तोंडातून केचक केचक – चक असा आवाज काढीत असतात आणि वर्तुळात उभ्याने फेर धरून किंवा भूमीवर बसून घुमत असतात. खाली बसल्यावरही मांडी घालून पाठीवर पडतात. यावेळी मध्यभागी रामायणातील सुवर्णमृगाची शिकार, सीताहरण, हनुमानाचे अशोक वनातले आगमन, युद्ध, इत्यादी कथा नृत्याच्या माध्यमातून दाखविल्या जातात. हा प्रयोग सुमारे दोन तास चालतो. पण तो नेत्रदिपक झाला असे मात्र मी म्हणणार नाही.

हॉटेल सानूर बीच गावापासून दूर पण समुद्रकिनाऱ्याला लागून आहे. समुद्रस्नान, सूर्यस्नान, किनाऱ्यावरची रपेट यासाठी ही जागा नामी आहे. इथे युरोपीय प्रवाश्यांची विशेष रहदारी दिसली. पन्नास पाउणशे पर्यटकांचे गट येत जात होते. हॉटेलात न्याहारीसाठी बुफे पद्धत होती. त्यासाठी ' तीर्त पूलसाइड ' या नावाचा लाकडी मंडप होता. त्यात टेबले नि खुर्च्या लावलेल्या

होत्या. पलीकडे समुद्रकिनारा असून त्यातील लाटांचा गंभीर मंद आवाज येत होता. उजव्या हाताला पोहण्याचा हौद होता. त्यात हौशी लोक तरंगत होते, मुले पाणी उडवत होती, तर गौरकाय युवती डुंबत होत्या. काही अंगाला सनटॅन लोशन लावून सूर्यस्नान करीत होत्या. रूळावलेल्या दृष्टीला यात काहीच नाविन्य नसते हे खरे. तरी पण मानवी स्वभावानुसार, वहुतेकांच्या नजरा निदान एकदा तरी हौदावरून फिरत होत्या.

मंडपातच एका बाजूला खाद्यपदार्थ ओळीने लावून ठेवलेले होते. एक ठिकाणी अननस, संत्री यांच्या रसांचे चषक होते. दुसरीकडे हॅम, चॉप्स, अंड्यांचे विविध प्रकार, टोस्ट, पाव, वगैरे होते. काही पदार्थांच्या भांड्यां-खाली मंद शेगड्या होत्या. शिवाय अननस, पपई नि केळी ही फळेही होती. आपला हात नि जगन्नाथ हा अलिखित नियम होता. पण त्यामुळे सर्वच माणसे पदार्थावर ताव मारतात असे नाही.

बेसाकीह गावातील अगुंग डोंगरावर बाली बेटातले सर्वांत मोठे मंदिर आहे. ' मदर टेंपल ऑफ बाली ' असे त्याचे वर्णन आहे. अकरा ऑक्टोबरला सकाळी साडेआठ वाजता तिकडे जाण्यास आम्ही निघालो. अर्थात वाटेत लागणारी मंदिरे, कलेबद्दल प्रसिद्ध गावे, इत्यादी स्थाने पाहण्याचा कार्यक्रम आजच्या सहलीत अंतर्भूत होता. प्रारंभी रस्ता लहान होता. त्याला लागूनच एकमजली घरे होती. काही घरांच्या व्हरांड्यांत छोटी दुकाने होती. मात्र घरांभोवती नारळी, केळी, पेरू, नि पपई यांच्या बागा होत्या. पंधरा मिनिटांनी हा छोटा रस्ता मागे पडला. त्यानंतर गावातला मोठा रस्ता लागला. तोही पाठीमागे राहिला. आता जवळजवळ क्षितिजापर्यंत सपाट मैदान दिसत होते. त्यातील अधूनमधून दिसणारी घरे जुन्या रचनेची होती. अर्थात आधुनिक मांडणीची काही घरे भेटत. जुन्या घरांचे एक वैशिष्ट्य दिसले. ते असे की, घराच्या अंगणात झोपडीसारखी खोली असे. तिला छप्पर असे पण भिंती नसत.

बालीतल्या दक्षिणेकडच्या काही गावांचा हस्तकलांबद्दल फार लौकिक आहे. त्यातील निवडक गावे आजच्या आमच्या प्रवासमार्गात होती. बाटु-बुलान हे गाव प्रथम लागले. इथे सुबक पाषाणाच्या मूर्ती तयार होतात. एका घरातल्या अंगणात बऱ्याच मूर्ती ठेवलेल्या होत्या. त्यांतील एक गणपतीची मूर्ती चार फूट उंचीची असावी. आम्ही प्रथम थांबलो ते चेलूक या गावात. येथे चांदी-सोन्याच्या छानदार वस्तू नि दागिने तयार होतात.

येथे एका सोनाराच्या दुकानात गेलो. चांदीचे रव्यासारखे कण मेणाच्या साहाय्याने कसे डकवले जातात नि मग त्यांना पॉलीश कसे केले जाते, वगैरेची प्रक्रिया येथे पाहिली. दुकानाच्या भिंतीवर मढवलेली चित्रे होती. त्यांतील सहा फूट लांबीचे खेडेगावाचे चित्र, कोंबड्यासह बसलेला म्हातारा ही विशेष लक्षात राहतात. याच खोलीत घडवलेले दागिने कपाटातून ठेवलेले होते. अंगणात कुटुंबाचे छोटे देऊळ होते. तिथे पितरांसाठी भोज्य पदार्थ ठेवलेले होते.

यानंतर थांबलो ते मास या गावात. लाकडी कलाकुसरीच्या वस्तूंबद्दल या गावाचा लौकिक आहे. येथे आम्ही मानीस आर्ट शॉप अँड वुड कार्व्हिंग या दुकानातून फेरी मारली. येथे पडवीत काही माणसे काम करीत होती. त्यांच्याबरोबर काही लहान मुले होती. लाकूड कोरण्याचे काम बापाकडून मुलाकडे असे परंपरागत येते. येथेच मुलांना नावे कशी मिळतात याची माहिती मिळाली. इथल्या लाकडी मूर्तीमध्ये मला थोडे निराळेपण आढळले. मूर्ती लांबट नि सडसडीत अंगाच्या असतात. मग तो मनुष्य असो वा प्राणी असो. पण या सर्व कला भारतात उच्च श्रेणीला जाऊन पोहोचलेल्या असल्याने या लाकडी वस्तू पाहताना अचंबा वाटत नाही.

उबुड गावाची प्रसिद्धी चित्रकलेबद्दल आहे. इथे ज्या घरात आम्ही गेलो तिथे टांगलेली चित्रे, त्याचप्रमाणे काढली जात असलेली चित्रे मला लक्षणीय वाटली. एका खोलीत चित्रे काढली जात होती. त्याचे प्रात्यक्षिक काम कसे चालते त्याची माहिती घेतली. प्रथम एक मुलगा पेन्सिलीने चित्र काढतो. त्याच्यावर दुसरा मुलगा चिनी शाईने संस्कार करतो. नंतर तिसरा मुलगा या चित्रात रंग भरतो. हे रंग आता परदेशातून येतात. पण पूर्वी हे रंग झाडापासून बनवण्यात येत. जसे बटिकमध्ये होत असे तसेच.

हस्तलाघवाबद्दल प्रसिद्ध असलेल्या गावांना भेटी देऊन झाल्यावर कोच 'एलेफंट केव्ह' या स्थानाकडे निघाला. एलेफंट केव्ह या नावाचा गाईडने उल्लेख केल्यावर साहजिकच मुंबईजवळच्या लेण्यांची आठवण झाली. इथले लेणे अकराव्या शतकातले आहे. पण ते जगाच्या दृष्टिआड गेले होते. १९२३मध्ये डच अमदानीत त्याचा शोध लागला. मग १९५३पासून त्याच्या दुरुस्तीला डॉ. क्राइसमन यांच्या देखरेखीखाली सुरवात झाली. लेण्याकडे जाण्यासाठी खाली खोलगट जागेकडे जावे लागते. तिकडे जाताना वाटेत दोन हौद लागतात. त्यांतले पाणी अस्वच्छ होते. लेण्याच्या बाहेर

ओसरीसारख्या तीन झोपड्या होत्या. एकात यात्रेकरू थांबतात. दुसऱ्यात प्रसाद तयार होतो. आणि तिसऱ्यात ब्राह्मणाच्या साहाय्याने धार्मिक विधी होतात. लेण्याच्या पाठीमागे देवचाफ्याचे मोठे झाड होते. त्याचीही पूजा होते. लेण्याच्या प्रवेशद्वारावरती उग्र चेहेऱ्याचा द्वारपाल आहे. त्याला भोमा म्हणतात. आत शिव नि गणेश यांच्या मूर्ती आहेत. लेणे फारसे कलात्मक वाटले नाही.

'तीर्त एंपूल' हे मोठे नावाजलेले तीर्थक्षेत्र आहे. तिकडे जाणारा रस्ता नयनरम्य अशा हिरव्यागर्द झाडीच्या डोंगरमाळेतून आहे. क्षेत्राकडे जाण्यासाठी आपल्याला एका छोट्या दरीत जावे लागते. देवळाच्या आवारात प्रवेश करण्यापूर्वी कमरेला पिवळा वा लाल रंगाचा पट्टा बांधावा लागतो. दक्षिण भारतातील देवळात ज्याप्रमाणे धोतर नेसावे लागते तसलाच हा प्रकार. आज विलक्षण गलेलठ्ठ अरब नि त्याची बायको देवळात हिंडत असताना दिसली. दोन दिवसांनंतर होणाऱ्या मोठ्या उत्सवाची जोरात तयारी चाललेली दिसली. मंदिराचे प्राकार फार मोठे होते, नि त्यात दहा-एक देवळे असावीत. एका मोठ्या मंडपात वीस–पंचवीस मृदुंग होते. सर्व ठिकाणी केळीची पाने लावली जात होती. थोड्या अंतरावर हौद होता. त्यात जिवंत झरे असून त्यातले पाणी वर येताना दिसत होते. श्रद्धाळू लोक पापक्षालनार्थ या हौदाच्या पाण्यात स्नान करतात.

प्राकारातल्या एका बाजूकडे एक लहान मूर्ती मांडली होती. तिच्यासमोर चार मुली नि एक वयस्क बाई बसल्या होत्या. त्यांच्या एका बाजूला एक ब्राह्मण बसला होता. तो काही तरी विधी त्यांच्याकडून करून घेत होता. या बायकांनी देवाला अर्पण करण्यासाठी बदके आणली होती. आधीच्या लोकांनी दिलेली बदके पलीकडे बांधून ठेवलेली होती. जवळच एक दुकानासारखी जागा होती. त्यात आणखी एक ब्राह्मण बसला होता. तो काही तरी नोंदी करीत होता. दुकानात लांब केसांची गंगावने नि नाण्यांच्या माळा लोंबत होत्या. देवाला अर्पण करण्यासाठी त्या होत्या.

देवळाच्या डाव्या हाताला मोठा डोंगर असून त्यावर दोन बंगले आहेत. ते डॉ. सुकार्नोच्या एका बायकोने स्वत:साठी बांधले होते. आता ते बंद असतात. देवळाच्या आवारातून बाहेर पडल्यावर एक बाजारपेठ येते. त्यात सर्व प्रकारची सुव्हेनिअर्स, त्याचप्रमाणे इंडोनेशियातील वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी विकत मिळतात. या दुकानांना भेट देण्यासाठी दुकानदार स्वत: किंवा

त्याची मुले पाठीशी लागतात. या बाजाराचे मला स्मरण तिथे मिळालेल्या शहाळ्यामुळे राहणार. दोन माणसांची तृषाशांती होईल इतके मुबलक पाणी त्यात होते. शिवाय जाड खोबरेही होते.

किटामानीकडे जाणारा रस्ताही हरित प्रदेशातून होता. या गावाच्या बस स्थानकाशेजारीच एक उंच टेकडी आहे. तिच्या माथ्यावर बटूर गार्डन रेस्टॉरंट आहे. या रेस्टॉरंटच्या उद्यानात उभे राहिले की, समोर बटूर डोंगर दिसतो. तो ज्वालामुखी आहे. १८२७, १९१७, १९२७, १९६३ या सालांत तो जागृत झाला होता. १९६३मध्ये त्याच्यातून बाहेर पडणाऱ्या शिलारसाला लोकांनी मंतरलेल्या कपड्यांनी अडविण्याचा प्रयत्न केला. या प्रयोगात शेकडो माणसे दगावली. ज्वालामुखीच्या पायथ्याशी बटूर नावाचेच सरोवर आहे. या सरोवराच्या पलीकडच्या काठावर बालीतल्या आदिवासींची वस्ती आहे. दूरवरचे निळसर काळे डोंगर, त्यांच्या भोवतालची हिरवीगर्द झाडी, स्वच्छ आकाश, थंड हवा, शेकडो पर्यटकांची फोटो घेण्याची गडबड— या रेस्टॉरंटच्या बाहेर उभा राहिलो असताना माझ्या मनावर उठलेले हे चित्र आहे.

किटामानीकडून आम्ही बेसाकीह या गावाकडे जाण्यास निघालो. रस्ता लहान होता. बऱ्याच ठिकाणी त्याची दुरुस्ती होत होती. शिवाय तो डांबरी नसल्याने कोचला धक्के बसत होते. त्यातच भोवतालचा प्रदेश रूक्ष म्हणता आला नाही तरी ज्याची डोळ्यांना सतत संवय झाली होती तसा हिरवाचार नव्हता. डोंगराच्या पायथ्याशी बाजार आहे. तेथूनच मंदिराकडे जाणारा रस्ता आहे. पण या रस्त्याला एकदम चढ नाही. त्यामुळे डोंगर चढताना दम लागत नाही. काही वेळाने थोडी पठारासारखी जागा येते. येथून मुख्य मंदिराकडे जाण्यासाठी मात्र बऱ्याच पायऱ्या चढाव्या लागतात. मंदिराच्या प्राकाराभोवती उंच कोट असून त्याला मोठे प्रवेशद्वार आहे. त्यातून आत गेले की, समोरच तीन-चार मोठी मंदिरे दिसतात. मंदिरात कोणालाच प्रवेश नसतो. ही मंदिरे विष्णू, शिव नि ब्रह्मा यांची आहेत. त्याशिवाय आणखीही तीन-चार मंदिरे बाजूच्या कोपऱ्यात आहेत. पॅगोडासारखी ती वाटली. नवव्या शतकात ही मंदिरे बांधली गेली. मंदिराच्या पायऱ्यांच्या डाव्या बाजूला काही खोल्या आहेत. दोन दिवसांनी होणाऱ्या उत्सवाची तिथे जय्यत तयारी चालली होती. केळ्याच्या पानांचे येथे ढीग होते. या मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश नसतो.

येथे दरवर्षी मोठा उत्सव होतो. त्या उत्सवात मुसलमान असूनही राष्ट्राध्यक्षाला भाग घ्यावा लागतो. या देवळाचे मुख्य वैशिष्टच म्हणजे येथे लहानमोठे असंख्य लोक नवसासाठी येतात. अनेकांच्या प्रकृतीला येथे आल्यावर गुण पडला आहे असे गाईड म्हणाली, तेव्हा तशी तुझी श्रद्धा आहे का असे कोणी तरी विचारल्यावर ती म्हणाली, 'मीही नवसासाठी आले होते नि मला देव पावला.' आमच्या या गाईडचे नाव नान्सी होते. तिची आई जावानीज मुसलमान होती, वडिल जपानी होते. आणि आता तिचे लग्न बाली ब्राह्मणाशी झाले आहे.

देवळातून खाली आल्यावर आमचा कोच परतीच्या मार्गाला लागला. या मार्गावरचा सगळा प्रदेश मनोज्ञ होता. बालीचे निसर्गसौंदर्य यावेळी दिसले. रस्ता डोंगरातून होता. वळणावळणावर भाताची सोपान शेती दिसत होती. डोंगरांच्या उतरणींवरच्या या सोपान पद्धतीच्या हिरव्या गर्द शेतांना स्वतः डोळ्यांनी पाहिल्याशिवाय त्यांच्या सौंदर्याची खरी कल्पना येणार नाही. डोंगरांवरून निथळणारे पाणी, सोपान शेतीत कापणीला आलेला भात, त्यावर पडलेला सूर्यप्रकाश, मंद वाऱ्यामुळे डोलणारी भाताची रोपे, त्यात काम करीत असणाऱ्या बाली युवती – मनातून न पुसले जाणारे चित्र होते.

क्लुंगकुंग हे एक वेळचे बालीमधले छोटे संस्थान होते. या संस्थानात न्यायदान उघडचावर होत असे. हमरस्त्याच्या डाव्या हाताला न्यायालय आहे. त्याच्या भोवताली खंदक असून त्यात पाणी नव्हते. एका बाजूला उंच जागी छोटा मंडप आहे. त्यात न्यायाधीश बसत असे. आरोपीसाठी गॅलरी होती. दुसरा मंडप मध्यभागी असून त्यात राजा बसत असे. या मंडपाच्या छतावर तसेच बाहेरही चित्रे काढलेली आहेत. त्यात आरोपींना निरनिराळ्या गुन्ह्यांसाठी ज्या शिक्षा मिळत त्या दाखवलेल्या आहेत. व्यभिचारी स्त्री वा पुरुष यांना मिळणाऱ्या शिक्षेचे चित्र अंगावर काटा आणणारे आहे. सर्वच शिक्षा अमानुष आहेत. गावातले लोक तटाच्या बाहेर उभे राहून न्यायदानाचे काम पहात असत. ही इमारत सोळाव्या शतकातली आहे. इथल्या गव्हर्नरला भूपती म्हणतात. हल्लीचा भूपती हॉलंडमधल्या लिडेन विद्यापीठाचा स्नातक आहे.

क्लुंगकुंगमधून साडेपाच नंतर बाहेर पडलो, नि देनपसारच्या वाटेला लागलो. संध्याकाळ होत होती. रहदारीही खूप वाढली होती. सहल संपत

आलेली असल्याने कोचमध्ये सगळे निःशब्द झाले होते. सूर्यास्त होत असतानाच आम्ही देनपसारमध्ये शिरलो. इंडोनेशियाची यात्रा संपली होती. पुढचा टप्पा होता न्यूझिलंडचा. सिडनीमार्गे दिनांक १२ ला आम्ही तिकडे जाणार होतो. त्यासाठी रात्री नऊ वाजता आंतरराष्ट्रीय विमानतळावर आलो. विमानतळ खूप मोठा आहे. आणि असंख्य पर्यटकांनी गजबजलेला होता. त्याच्या एका बाजूच्या भिंतीवर संपूर्ण जागा व्यापणारी रामायण नि महाभारत यांतल्या कथांची चित्रे काढलेली आहेत. या चित्रांकडे पाहताना मला रेबा लुईसने कथन केलेला प्रसंग आठवला. ती आणि तिचे पती मोटरने योग्याकर्ताकडे जात होते. वाटेत एक विचित्र इमारत दिसली. तिच्या अंगणात शिव, गणेश, लक्ष्मी, कृष्ण यांच्या मूर्ती इतस्ततः पडलेल्या होत्या. त्या न्याहाळत असताना एक व्यक्ती त्यांच्याजवळ आली आणि म्हणाली, 'टोपल्यात ठेवलेले हे भग्न अवशेष महान माडजापाहिट साम्राज्याचे आहेत. आजच्या या ट्राबुलान खेडेगावातूनच माडजापाहिट साम्राज्याचा पंतप्रधान गाडजाह माडा याने राज्यव्यवहार चालविला होता. यावर विश्वास ठेवणे तुम्हास कठीण जाईल.'

"म्हणजे रस्त्याच्या नकाशात दाखविलेला 'हिंदू म्युझिअम' हाच का?" लुईसने पृच्छा केली.

"होय, पण तो योग्य स्थितीत नाही. परंतु कधीतरी या भग्न अवशेषांतून आम्ही चौदाव्या शतकात जसे शहर होते तसेच उभे करू असा आम्हाला विश्वास आहे."

"म्हणजे त्या साम्राज्याच्या राजधानीचे हे अवशेष आहेत?" लुईस सांगते, "होय, हे उत्तर देताना त्याच्या आवाजात अभिमान होता."

काय गंमत आहे पहा! इस्लामी संप्रदाय स्वीकारलेल्या प्रदेशातील लोकांना आपल्या हिंदू परंपरेविषयी आत्मीयता नि अभिमान वाटतो. आणि हिंदुस्थानातल्या हिंदू परंपरेला जतन करण्याच्या प्रयत्नाला जातीय, प्रतिगामी, संकुचित अशी विशेषणे बहाल केली जातात!

●

# २. न्यूझिलंड

सिडनीकडे जाणारे विमान जंबोजेट असून ते जवळजवळ भरले होते. अकरा वाजता विमानाने आकाशाचा मार्ग धरला. साडेबारा वाजता भोजन झाले. मग चित्रपट सुरू झाला. पण दिवसभराच्या पळापळीने थकून, डोळे मिटत होते. अर्थात खुर्चीतली झोप अर्धवटच असली तरी लागत होती. साडेतीन वाजता विमानातील सेवकांची गडबड सुरू झाली. चहा आला. नंतर थोड्या वेळाने विमान उतरू लागले. चाकांनी विमानतळाची भूमी पकडली तेव्हा पहाटेचे साडेचार वाजले होते. मात्र यावेळी सिडनीत सकाळचे साडेसात झाले होते. आता प्रवाश्यांना विमानात बसून राहण्याची सूचना मिळाली. काही समयाने फवारे मारणारे आले. त्यांचे काम आटोपल्यावर आम्ही विमानतळाच्या लाउंजकडे गेलो.

न्यूझिलंडमधल्या ख्राइस्टचर्चकडे दुसऱ्या विमानाने जायचे होते. आम्ही त्यात बसलो नि थोड्या वेळाने मुंबईहून स्वतंत्रपणे आलेला डॉक्टरांचा गट आमच्या गटात दाखल झाला. आता आम्हाला एक छोटा फोल्डर देण्यात आला. न्यूझिलंडमधल्या प्रवासाची व्यवस्था न्यूमन्स कंपनीकडे होती. तिची शताब्दी नुकतीच साजरी झाली. या फोल्डरवर त्याची नोंद होती नि गेल्या शतकातल्या बग्गीचे चित्र होते. आत प्रवासयादी, न्यूझिलंडचा नकाशा नि गावाची थोडक्यात माहिती देणारे पुस्तक, इत्यादी गोष्टी होत्या.

साडेनऊ वाजता विमानाने आकाशाचा मार्ग धरला नि सिडनी शहर पाठीमागे पडले. थोड्या वेळाने विमान समुद्रावरून जाऊ लागले. खालच्या शांत निळ्या जलाशयात छोटी जहाजे दिसत होती. वर आकाशही निळे होते. पांढऱ्या ढगांचे पुंजके अधूनमधून जाताना दिसत होते. उन्ह लख्ख पडले होते. सर्व समय हेच चित्र होते. दोन तासांनंतर दूरवर जमीन दिसू लागली. मग किनारा आला. त्याला लागूनच डोंगरांची रांग होती. त्यातून नद्यांचे प्रवाह वाहत होते. काही डोंगर खूप उंच होते. आणि त्यांची शिखरे हिमाच्छादित होती. थोड्या वेळाने मोठी खोरी दिसू लागली. त्यांत बऱ्याच जागी शेती आढळली. मग एक विशाल सरोवर नजरेत आले. काही डोंगर बोडके दिसले, तर काहींच्या वरती गर्द झाडी होती. आता एक विशाल

पात्राची नदी दृष्टिपथात आली. पण तिचा प्रवाह आकुंचलेला होता. या गोष्टींची नोंद घेत असतानाच विमानाने उंची सोडण्यास सुरवात केली. आता विशाल मैदान दिसू लागले. त्यात कुरणे होती, शेते होती. कुरणात गुरे होती नि शेताला लागून टुमदार घरे होती. हे चित्र मनावर उठत आहे तोच विमानाने भूमीकडे झेप घेतली. ठीक बारा वाजता ते भूमीला टेकले. या वेळी ख्राइस्टचर्चमध्ये दोन वाजून दहा मिनिटे झाली होती.

विमानात आम्हाला एक कार्ड देण्यात आले होते. त्याच्यावर आमच्या जवळच्या पदार्थांची नोंद करावयाची होती. सर्वांकडे काहीना काही तरी मसाल्याचे पदार्थ होते. त्यामुळे या पदार्थांचे काय होणार हा विचार सर्वांना अस्वस्थ करणारा होता. सर्वच परकीय प्रवाश्यांना बॅगा उघडाव्या लागत होत्या. आमच्या रांगेत पुढे सिंगापूरच्या दोन–तीन चिनी मुली होत्या. एकीजवळ मधाची बाटली होती. कस्टमच्या अधिकाऱ्याने ती बाहेर काढली नि मग ' ही बाटली आत नेता येणार नाही. हवे असल्यास तुमच्या खर्चाने ती परत सिंगापूरला जाईल ' असे तो म्हणाला. आमच्या बॅगेत चिवडा नि लाडू होते. त्याने लाडू दाबून पाहिले नि विचारले, ' यात मांसाचे तुकडे आहेत काय ? ' हे सर्व भाजलेले नि तळलेले आहे, असा खुलासा आम्ही करताच त्याने बॅग बंद करण्यास सांगितले. यात वेळ बराच गेला. पण सर्वांचे भारतीय पदार्थांचे डबे मुक्तपणे न्यूझिलंडच्या भूमीत प्रवेश करते झाले याच्या आनंदाचे काय वर्णन करणार ?

खाद्य पदार्थ जाहीर करण्याच्या कार्डाबरोबरच आम्हाला एक माहिती-पत्रक देण्यात आले होते. त्यात हा फॉर्म का भरणे आवश्यक आहे याची माहिती होती. शिवाय न्यूझिलंडमध्ये असताना अपघात झाल्यास कोणाचाही दोष असला तरी तुम्हास नुकसान–भरपाई मिळण्याचा हक्क आहे असेही त्यात लिहिलेले होते. तसेच पोलीस खाते आपले स्वागत करीत आहे नि आपला मुक्काम सुखकारक होवो अशी इच्छा व्यक्त करून पुढे म्हटले होते की, पोलिसांची मदत लागल्यास ती लगेच मिळेल.

आम्ही न्यूझिलंडच्या साउथ आयलँडमध्ये आलो होतो. येथे आमचा मुक्काम पाच दिवसांचा होता. या पाच दिवसांत, म्हणजे १३ ऑक्टोबरपासून १७ ऑक्टोबरपर्यंत, ख्राइस्टचर्चपासून खाली दक्षिणेकडे क्विन्जटाऊनपर्यंत आम्ही कोचने प्रवास करणार होतो.

ख्राइस्टचर्चच्या विमानतळावर आमच्या स्वागतासाठी न्यूमन्स कंपनीची

प्रतिनिधी उपस्थित होती. प्रथम तिने प्रत्येक पर्यटकाला एक बॅग नि न्यूझिलंडवरचे जॉन मॅक्डरमॉट याचे पुस्तक दिले. नंतर दुसऱ्या दिवसापासून सुरू होणाऱ्या प्रवासाविषयीची माहिती दिली. तसेच न्यूझिलंडविषयी चार शब्द सांगितले. राजकीयदृष्टचा ती विरोधी पक्षाची असावी. कारण न्यूझिलंडच्या पंतप्रधानांविषयी तिचे मत कडवट दिसले. पण तरीही तिचे शेवटचे वाक्य महत्त्वाचे होते : 'आम्हाला इंग्लिश परंपरा इथे जिवंत ठेवावयाची आहे.'

आता कोच आजच्या निवासस्थानाकडे निघाला आणि ख्राइस्टचर्च हे इंग्लंडमधले मोठे खेडेगाव आहे असे वाटू लागले. घरांची रचना, रस्ते; त्यावरून जाणारी माणसे हे सर्व इंग्लंडमधल्या जीवनाचेच चित्र वाटत होते. गावात अनेक विशाल उद्याने आहेत. साहजिकच 'गार्डन सिटी' असल्याचा गावाचा अभिमान रास्त आहे. तसेच इंग्लिश लोकांपेक्षा अधिक इंग्लिश असाही या गावाचा उल्लेख होतो.

आजचा मुक्काम गेन्सबरो मोटर लॉजमध्ये होता. ही दुमजली इमारत होती. आणि प्रत्येक खोलीत चहा नि कॉफी करण्याची सोय होती. रोज दुधाची बाटली देण्यात येई. त्यामुळे केव्हाही चहा करता येत असे. बहुतेक हॉटेलांत ही सोय उपलब्ध असते. नोकरांवरच्या खर्चापेक्षा हे कमी खर्चाचे असावे. काही मोठ्या हॉटेलांत फ्रिजमध्ये मद्य, बीअर, थंड पेये ठेवलेली असतात. फक्त आपण घेतलेल्या वस्तूंची नोंद कार्डावर करून ठेवायची, म्हणजे ती बिलात दाखवली जाते.

न्यूझिलंडला फारसे प्रवासी जात नसल्याने त्या देशाविषयी आपल्याकडे कमी माहिती असते, नि जिज्ञासाही फारशी नसते. परंतु न्यूझिलंडमध्ये सुमारे साडेसहा हजार भारतीय लोक स्थाईक झाले आहेत. त्यांच्याविषयी कपिल तिवारी यांनी 'इंडिअन्स इन न्यूझिलंड' असा ग्रंथ लिहिला आहे. हा देश ऑस्ट्रेलियाच्या आग्नेय दिशेला येतो. दोन मोठ्या बेटांचा तो देश असून दक्षिण पॅसिफिक महासागरात आहे. त्याचा भूप्रदेश एक लक्ष चौरस मैलांचा असून त्याची लोकसंख्या तीस लाख आहे. त्यावरून तेथील वस्ती किती विरळ आहे ते दिसते. ख्रिताब्द ९००च्या आधीचे पोलिनेशिअन संस्कृतीचे काही अवशेष येथे मिळतात. बाराव्या शतकात काही माओरी लोक या प्रदेशात येऊन स्थाईक झाले. त्यानंतर १३५० मध्ये मोठ्या प्रमाणात माओरी लोकांनी या बेटांकडे स्थलांतर केले.

पुढे १६४२मध्ये अवेल टास्मन या डच ईस्ट इंडिया कंपनीच्या चाकराने या प्रदेशाला जहाजातून चक्कर मारली. त्यामुळेच ऑस्ट्रेलिया नि न्यूझिलंड यामधील समुद्राला टास्मन सी हे नाव मिळाले आहे. पुढे हॉलंडमधल्या झिलंड या गावावरून या भूमीला न्यूझिलंड हे नाव मिळाले पण १२७ वर्षांत तिच्याकडे कोणाचेच लक्ष गेले नाही. १७६९ मध्ये कॅप्टन कुकने या भूमीवर पाय ठेवला आणि युरोपीय माणसाच्या आगमनाची ही नांदी ठरली. १८२६-मध्ये पहिल्या न्यूझिलंड कंपनीने येथे वसाहत करण्याचा प्रयत्न केला. तो फसला. पुढे चौदा वर्षांनी दुसऱ्या कंपनीने तसाच प्रयत्न केला. तो यशस्वी ठरला. यावेळी माओरी लोकांशी एक संधी झाला. त्यानुसार न्यूझिलंड ब्रिटिश वसाहत होऊन त्याच्या इंग्रजी जीवनाचा प्रारंभ झाला. १८६०मध्ये येथे सोन्याचा शोध लागला आणि लोकांच्या झुंडी इकडे येऊन स्थाईक झाल्या. त्यातून माओरी लोकांशी संघर्ष उद्‌भवले, पण नंतर समेटाचे धोरण आखण्यात येऊन माओरी लोकांना उदारतेने वागविण्यास सुरवात झाली. आता त्या समाजाला न्यूझिलंडमध्ये समानतेचे स्थान आहे तरी त्या लोकांच्या तक्रारी आहेत नि त्यांच्याविषयीची चर्चा न्यूझिलंडच्या दूरदर्शन-वर आम्ही ऐकली.

माओरी लोकांची लोकसंख्या सुमारे २,५०,००० असून युरोपीय लोक-संख्येच्या वाढीपेक्षा तिच्या वाढीचा वेग जास्त आहे. या समाजाची अधिक वस्ती उत्तरेच्या बेटावर आहे. माओरी लोक आपल्या स्वतंत्र वस्त्यांत राहतात. आपले पृथक सामाजिक जीवन टिकविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. पण अनेक माओरी लोक शहरी जीवनात समरस होऊ लागले आहेत नि साहजिकच त्यांचे जीवन युरोपीय धर्तीचे होत आहे.

न्यूझिलंडची राजधानी वेलिंग्टन असून ती उत्तरेच्या बेटात आहे आणि तिकडचे ऑकलंड हे न्यूझिलंडमधले सर्वांत मोठे शहर येते. ख्राइस्टचर्च हे दक्षिणेकडच्या बेटात येते आणि ते इकडचे सर्वांत मोठे गाव आहे. त्याची लोकसंख्या तीन लक्ष आहे. गावातले रस्ते सरळ नि बऱ्याच प्रमाणात समांतर आहेत. मुख्य रस्ता कोलंबो स्ट्रीट आहे आणि त्या रस्त्याने आपण शहराच्या मध्यभागाकडे जाऊ शकतो. आमच्या निवासाकडून तिकडे जाताना मध्येच मद्रास स्ट्रीट लागला. हे भारतीय नाव वाचून जरा बरे वाटले. गावातून वाहणारी लहानशी ॲव्हान नदी या रस्त्यावरच भेटते. तिच्यात लोक नौकाविहार करीत होते. काही जण मासे पकडत होते. नदीच्या बाजूच्या

कोपऱ्यावर आधुनिक रचनेचा १९७२मध्ये बांधलेला टाउन हॉल आहे. त्याच्यासमोर मोठे कारंजे आहे.

ख्राइस्टचर्चमधली ७५ एकरांची 'बोटॅनिकल गार्डन' प्रसिद्ध आहे. त्यातले वृक्ष शंभर वर्षांचे असून उत्तुंग नि अवाढव्य आहेत. या गार्डनमधून अॅव्हान नदी वाहत असून तिच्यावर एक टुमदार छोटा सेतू आहे. उद्याना-तील झाडांना रंगीबेरंगी फुलांचा विलक्षण बहर आलेला होता. रंगीत फुलांनी डवरलेल्या वृक्षांचे दृश्य मोठे आकर्षक होते. त्याचे फोटो घेतले गेले नसते तरच आश्चर्य! बोटॅनिकल गार्डनला लागूनच म्युझिअम आहे. तो लहान आहे, पण त्यातल्या वस्तू लक्षणीय आहेत. प्राचीन मोठे घड्याळ, म्युझिकल बॉक्स, 'पेनी विल प्ले द पोलिफोन', १५व्या शतकातले भुसा भरलेले प्राणी, शिवाय गेंडा, हत्ती, सिंह, साळिंदर, मेंढे या गोष्टी चटकन नजरेत भरतात. तसेच रॉयल मेलकोच, बूचर्ज शॉप, पहिल्या मजल्यावरून रस्त्याकडे पाहणारी बाई, माओरी कॅनोई, जुनी घरे, जहाजे, लोहाराचे दुकान, त्यातले तप्त लोखंड लालबुंद दिसते. अशा गत जीवनाची आठवण देणाऱ्या वस्तूंच्या प्रतिकृती आहेत.

कॅथिड्रल स्क्वेअरमध्ये भव्य इमारती असून ते व्यापाराचे केंद्र आहे त्यात जॉन गॉडलीचा पुतळा आहे. त्याने ख्राइस्टचर्चची स्थापना केली जवळच कॅथिड्रल आहे. भव्यतेमुळे ते उठून दिसते. तरी पण आता नोव्हाज हॉटेलसारख्या त्यापेक्षा अधिक उत्तुंग इमारती बांधल्या जात असल्याने कॅथिड्रलची भव्यता कमी होत आहे. हा चौक व्यापारी केंद्र असूनही त्यात फारशी गर्दी नव्हती. एकंदरीत गाव सुबक, नेटके, शांत नि संपन्न वाटते. अशी गावे हिंदुस्थानात केव्हा निर्माण होतील असा प्रश्न नकळत मनाला चाटून जातो. सौंदर्याची जाणीव असणारे राज्यकर्ते जेव्हा शासनाधिष्ठित होतील तेव्हा हे घडावे!

ख्राइस्टचर्चच्या दक्षिणेकडचा भूप्रदेश काही जागी अत्यंत निसर्गरम्य असल्याने तिकडे जाणाऱ्या अनेक सहली आहेत. अशीच एक चार दिवसांची सहल आमच्या गटासाठी आयोजित करण्यात आली होती. आम्ही ख्राइस्ट-चर्चला पोहोचलो त्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे १४ ऑक्टोबरला सकाळी सहलीचा कोच आला. त्याचे नाव 'मेरी ॲन' होते. कोचच्या ड्रायव्हरचे नाव टीम असून तोच गाईड होता नि माहितीला पक्का होता. शिवाय आमच्या कडे सबंध प्रदेशाचा नकाशा नि गावांच्या माहितीचे छोटे पुस्तक होते.

सहलीची सुरवात ख्राइस्टचर्चमधल्या महत्त्वाच्या विभागांतल्या फेरीने झाली. त्यामुळे अॅव्हान नदी, विलो वृक्षांनी वेढलेली मैदाने – दोन हजार एकर जमीन मैदानांसाठी ख्राइस्टचर्चमध्ये राखून ठेवलेली आहे. यावरून इथे मैदानांना किती महत्त्व दिले जाते ते दिसते – त्यावर धावणारी लहान मोठी माणसे, रस्त्याच्या बाजूने जाणारे सायकलस्वार, ओल्ड टिचर्स ट्रेनिंग कॉलेज, कँटरबरी म्युझिअम, पब्लिक हॉस्पिटल, टाऊन हॉल, फ्लॉवर क्लॉक, जेम्स कुकचा पुतळा, आदल्या दिवशी ज्याची शताब्दी साजरी झाली ते चर्च ऑफ इंग्लंडचे कॅथिड्रल, १८८४ साली बांधलेले युनायटेड हॉटेल, सैनिक स्मारक यांच्याकडून कोच कोलंबो स्ट्रीटवर आला.

कोलंबो स्ट्रीट हा गावातला मुख्य रस्ता असून तो तीन-चार मैल सरळसोट आहे. या रस्त्याने जाताना समोरच्या डोंगरावरची वस्ती दिसते. तिकडे जाण्यापूर्वी नदीवरचा सेतू ओलांडावा लागतो. तो ओलांडताना समोरच्या देखाव्याने मला बुडापेस्टची आठवण झाली. सेतू ओलांडल्यावर एक छोटे चर्च येते. त्याला पाठीमागे टाकले की रस्ता चढाचा होतो. पूर्वी वाहतुकी-साठी बग्ग्या असताना येथे घोडे बदलण्याचे स्थानक होते. तसेच येथे पोस्ट ऑफिसही होते. डोंगराच्या माथ्याकडे जाताना वाटेत लागणारी बरीच घरे एकमजली असून टुमदार होती. टीमच्या सांगण्याप्रमाणे ही वस्ती उच्च वर्णीयांची असून येथल्या प्रत्येक घराला नव्वद हजार ते दीड लाख न्यूझिलंड डॉलर्सची किंमत द्यावी लागते. माथ्यावर रोटरी इंटरनॅशनलने १९६७मध्ये एक दगडी चौथरा बांधला आहे नि त्यावर गावाचा नकाशा आहे. येथे उभे राहिले असताना एका बाजूला अथांग पॅसिफिक महासागर नि दुसऱ्या बाजूला क्षितिजाकडे सदर्न आल्प्सची पर्वतश्रेणी यांचे दर्शन झाले. गावातला गेस्टवेक स्टेडिअमही टीमने दाखवला. तेथे १९८४मध्ये कॉमन्वेल्थ गेम्स होणार आहेत.

येथून कोच खाली हायवेकडे जाण्यास निघाला. वाटेत मॅकमिलन अॅव्हेन्यू, प्रिन्सेस मार्गरेट हॉस्पिटल, कॅश्मिर व्ह्यू कॅन्टरबरी डेअरी फार्मची इमारत, विग्रॅमने स्वत:साठी बांधलेला विमानतळ, वगैरे गोष्टी लागल्या. आता कोच हायवे क्र. १ ने कॅन्टरबरी प्लेन्सच्या मार्गाला लागला. कॅन्टरबरी प्लेन्सचे क्षेत्रफळ चार हजार चौरस मैलांचे असून त्यात 'शिप फार्मिंग' होते. न्यूझिलंड-मध्ये सहा कोटी मेंढ्या आहेत. हायवेच्या दोन्ही बाजूंना शेते नि कुरणे लागतात. त्यांच्या भोवती काही ठिकाणी झाडांची कुंपणे असतात. शेती ट्रॅक्टरने होते नि गहू नि ओट यांची पिके निघतात. शेताच्या कडेला पिवळ्या

फुलांच्या झाडांची रेलचेल होती. आज हवा थंड असून लख्ख उन्ह पडले होते. वाटेत या भागातला मोठा लष्करी तळ लागला. तो पाठीमागे पडल्यावर मग डुन्साडेल गाव आले. या प्रदेशात काही वर्षांपूर्वी फार मोठे वादळ झाले. त्यात टिंबर, पाईन, वगैरे हजारो वृक्ष जमीनदोस्त झाले. मग शासनाने या पडलेल्या वृक्षांचे ओंडके जपानला कापण्यासाठी रवाना केले, परंतु अजूनही असंख्य झाडे पडलेली दिसली. अनेक जागी नवीन झाडे लावण्यात आली आहेत. ती जेमतेम दोन-तीन फूट उंच झाली आहेत.

काही समयानंतर नव्वद मैल लांबीची राकाइआ नदी आली. तिच्यावरचा पूल १८७८मध्ये बांधण्यात आला. या नदीत सालमन मासे विपुल प्रमाणात मिळतात. नदीच्याच नावाचे गाव असून त्याची लोकसंख्या अवघी सातशे आहे. रस्ता लहान होता. पण अनेक मैल बाणासारखा सरळ जात होता. त्यामुळे कोच वेगाने नि धक्के न बसता धावू शकला. वाटेवरच मिटर गेजचा लोहमार्ग लागला. तो ओलांडला नि अॅशबर्टन आले.

हे गाव रेल्वे जंक्शन असून ख्राइस्टचर्चपासून ते ५३ मैलांवर आहे. त्याची आजची लोकसंख्या साडेचौदा हजार आहे. या भागात गहू नि बार्ली यांची उत्तम पिके निघतात. गाव रेखीव असून त्यात खूप मोटेले दिसली. इथले लाल विटांचे चर्च अत्यंत सुबक होते. गावात रहदारी कमी असल्याने ते शांत वाटले. मात्र व्हॉक्सॉल नि ब्रेडफोर्ड गाड्यांच्या मोठ्या शोरुम होत्या. हे गाव पाठीमागे पडल्यावर त्याच नावाची नदी ओलांडली. इतक्या समयानंतर प्रथम एक पक्षी दिसला. त्याच्या डोक्याजवळ नि पंखांजवळ पांढरा रंग होता.

आता हिंड्स् गाव आले. त्याची स्थापना सॅम्युएल हिंड्स्ने केली. इथल्या गवताची टीमने प्रशंसा करून ते अमेरिकेला जाते असे तो म्हणाला. येथे शेतांच्या बाजूने काढलेले लहान लहान कालवे बरेच आढळले. या विस्तीर्ण सपाट भूमीवर बऱ्याच समयानंतर आधुनिक धर्तीचे बसके घर दिसे. थोड्या समयानंतर रंगिटाटा नदी आली. ती ओलांडल्यावर विंचेस्टर गाव आले. इथे उत्तम बटाटे होतात. या गावानंतर ट्राउट माश्यांच्या निर्मितीबद्दल (हॅचरी) प्रसिद्ध असलेले ३८०० वस्तीचे टेमूका गाव आले. ते पाठीमागे पडल्यावर ३३ हजार वस्तीचे वॉशडाइक गाव येते. मोठ्या प्रमाणावर औद्योगिकरण झालेले हे गाव आहे. त्याला ओलांडले की, टिमारू हे देखणे गाव येते. कॅरोलिन बेचे हे बंदर असून त्यात छोट्या आगनावा येतात. त्यामुळे गाव समृद्ध आहे. टिमारू बॉइज हायस्कूलमध्ये ओकचे झाड आहे.

या शाळेतला विद्यार्थी जॅक लव्हलॉक याने १९३६च्या ऑलिंपिक्समध्ये १५०० मिटरची शर्यत नवीन उच्चांक निर्माण करून जिंकली. त्याबद्दल हिटलरने त्याला ओकचे एक रोपटे दिले. त्याचेच हे झाड.

आता कॅन्टरबरी प्लेन्स संपून टेकाड प्रदेश सुरू झाला. रस्ताही नागमोडी होता. यावेळी डाव्या हाताला पॅसिफिक महासागर नि उजव्या हाताला डोंगरावरची शेते नि कुरणे होती. त्यात मेंढ्या नि गाई चरत होत्या. रस्त्याच्या कडेला विलो झाडांची रांग अधूनमधून लागत होती. पॅरिओरा गावापासून रस्ता महासागराच्या किनाऱ्याने गेला. पुढील निवडणुकीच्या प्रचारासाठी जिम सुल्टन या कामगार उमेदवाराच्या छायाचित्राचे मोठे पोस्टर वाटेत लावलेले दिसले. पुढे लागलेले सेंट अँड्र्यूज गाव मोठे असून लोहमार्ग त्याच्या बाजूने गेला होता. इथे काही कुरणांत डुकरे होती. शेते कापलेली असल्याने नि काही शेते नांगरलेली असल्याने जमीन पिवळसर आढळली. यावेळी आकाश निळे असून त्यात काही ठिकाणी शुभ्र मेघ तरंगताना दिसले. रस्त्यावर रहदारी कमी होती. एखादी मोटर जाताना दिसे. थोड्या वेळाने टेकड्यांचे उंच डोंगर झाले. मात्र त्यांच्यावरही हिरवीगार कुरणे होती. त्यात असंख्य मेंढ्या चरताना दिसल्या. मधेच एखादी दफनभूमी आढळते. टिंबर, पाईन वगैरे झाडांची वने सतत लागत होती.

ग्लेनेव्ही गाव मागे पडल्यावर वाइटाकी नदी आली. ती दीडशे मैल लांब आहे. तिच्या पाण्यावर चार विद्युत केंद्रे बांधली गेली आहेत. त्यामुळे पात्रात पाणी कमी असावे. ही नदी ओलांडल्यावर सुमारे वीस मिनिटांनी ओआमारू गाव आले. त्याची वस्ती सुमारे चौदा हजार आहे. इथल्या टूई या मिल्क-बारमध्ये जनसंपर्क तंत्राचा उत्तम धडा देणारी पुढील सूचना होती : 'थँक यू. इफ यू आर सॅटिस्फाईड टेल अदर्स. इफ नॉट टेल अस.' इथले ब्रायटन हॉटेल शंभर वर्षांचे जुने आहे, नि नॅशनल बँकेची इमारत जुन्या रचनेची होती.

ओआमारू दोन गोष्टींसाठी प्रसिद्ध आहे. इथला संगमरवरी दगड हाताच्या करवतीने कापता येतो. परंतु कालौघात तो टणक बनतो. न्यूझिलंड-मधल्या अनेक जुन्या नि नामांकित इमारती या दगडात बांधलेल्या आहेत. शीतपेटीच्या सहाय्याने येथून मांस पाठविण्याचा १८८२मधला पहिला प्रयत्न यशस्वी झाला. ही त्याची दुसरी ख्याती. शीतपेटीच्या प्रयत्नाचे बरेच श्रेय थॉमस ब्रायडॉनकडे जाते. त्याचा पुतळा वाटेत एका उंच डोंगरावर दिसतो.

या वेळी किनाऱ्यापासून शंभर फुटांवर असणाऱ्या नागमोडी रस्त्याने कोच जात होता. काही समयाने रस्ता डोंगरात शिरला. सूर्य पश्चिमेला कलू लागला होता. दूरवर डोंगरमाळ होती. वाटेत छोटचा नद्या नि ओढे लागले. भोवतालचा प्रदेश हरिततृणांनी नटला होता. मोठे विलोभनीय दृश्य होते नि ते बराच समय टिकले. आता नऊशे वस्तीचे पामर्स्टन गाव आले. येथेच वाटेत बदकांचे फार्म पाहिले. हे गाव पाठीमागे टाकल्यावर काही समयाने वाईकौआयटी गाव लागले. व्हेलिंग स्टेशन म्हणून त्याची प्रसिद्धी आहे. या गावातून बाहेर पडल्यावर छोटी नदी आली. मग 'ब्ल्यूस्किन बे' दिसू लागला. येथपासूनचा पुढचा सगळा प्रवास हा एका उत्तम लँडस्केपमधून होत आहे असे वाटले. रस्ता डोंगरमाळेतून चढता नि वळणावळणांचा होता. त्यामुळे तो उपसागर दृष्टिपथात येई आणि थोडयाच समयात दृष्टिआड जाई. हळूहळू कोच डोंगरमाथ्याकडे आला. दूरवर पॅसिफिक महासागर दिसू लागला. इथे उपसागराचा किनारा बराचसा नागमोडी होता नि त्याच्या किनाऱ्यावर टुमदार छोटी घरे होती. वातावरण नि:शब्द होते. कुठलेही वाहन धावताना दिसत नव्हते. उपसागराच्या आतल्या भागात छोटचा नावा होत्या तर तोंडापाशी मोठी जहाजे होती. जलाशयाचा रंग निळसर काळा होता. आणि त्याच्यावर अस्तास जाणाऱ्या सूर्याची प्रभा पडून तो चित्रविचित्रपणे चमकत होता.

या घाटाच्या रस्त्याने जात असताना टीमने दूरच्या डोंगरमाथ्यावर असणाऱ्या एका वाडयाकडे लक्ष वेधले. त्याचे नाव लॅर्नाख कॅसल होते. विल्यम लॅर्नाख ऑस्ट्रेलिअन होता. पण डुनेडिनमध्ये स्थाईक झाला. तो बँकर; उद्योगपती नि राजकारणी होता. इथली बँक ऑफ न्यू साउथ वेल्स त्याने स्थापन केली. त्याची पहिली पत्नी फ्रेंच राजघराण्यातली होती. तिच्यासाठी त्याने हा वाडा बांधला. त्या कामासाठी त्याने इंग्लंड नि इटलीमधून कुशल कारागीर आणले आणि युरोपमधून टाइल्स, काचा, लाकूड, उत्तम विटा नि प्रस्तर आणले. पहिल्या बायकोच्या मृत्यूनंतर त्याने दुसरे लग्न केले. तिच्या पश्चात त्याने तिसरे लग्न केले. अशी गावगप्पा होती की, त्याच्या ज्येष्ठ मुलाचा नि या बाईचा संबंध होता. त्यामुळे किंवा आर्थिक अडचणी-मुळे लॅर्नाखने आत्महत्या केली.

हा कॅसल मागे टाकून रस्त्याने वळण घेतले नि घाटमाथा आला. मग समोरच्या खोऱ्यातले डुनेडिन गाव दृष्टिपथात आले. एडिंबरा ही स्कॉटलंडची

राजधानी आहे. डुनेडिनचे वर्णन 'एडिंबरा ऑफ द साउथ' असे करतात. १८४८मध्ये स्कॉटिश लोकांनी त्याची स्थापना केली. आज त्याची वस्ती सव्वा लाख आहे. स्वित्झर्लंडमधल्या देखण्या गावासारखे हे गाव सुंदर असून डोंगराच्या कुशीत वसलेले आहे. आखीव रस्ते, सुबक घरे, उत्तम इमारती यांनी गाव नटलेला आहे. ओटॅगो हे डुनेडिनचे बंदर आहे. गावातल्या विद्यापीठाचे नाव ओटॅगोच आहे. विद्यापीठाची स्थापना १८६८मध्ये झाली. त्याची इमारत केंब्रिज विद्यापीठातल्या इमारतीसारखी काळ्या दगडातली आहे. गावात कॅडबरी चॉकलेट, वुलन मिल्स, आगगाडीच्या डब्यांचा कारखाना असे अनेक उद्योग आहेत.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी स्थापन झालेल्या कोर्टाची इमारत, १९०४ मधले रेल्वे स्टेशन, उंच मनोरा असलेले चर्च, ओटॅगो अर्ली सेटलर्स म्युझिअम, वॉर मेमोरिअल, क्रिकेट, रग्बी, इत्यादी खेळांसाठीचा स्टेडिअम, मोआना स्विमिंग पूल या प्रेक्षणीय गोष्टी आहेत. प्रिन्सेस स्ट्रीटवर पिवळ्या रंगाच्या ट्रॉली बसेस धावताना दिसल्या.

आजचा मुक्काम पॅसिफिक पार्क मोटर इनमध्ये होता. तिथे जाणारा रस्ता घाटासारखा होता. आणि त्याच्या बाजूला शानदार घरे होती. आणि प्रत्येक घराच्या पुढे रंगीबेरंगी फुलांनी बहरलेल्या झाडांची वाटिका होती. जिथे घरे नव्हती तिथे दाट वृक्षांची झाडी होती. इनकडे जाणारा रस्ता जिथे वळला तिथेच साउथ पोलला गेलेल्या अॅडमिरल बिर्डचा छोटा पुतळा होता.

गावाच्या मध्यवर्ती भागाकडे जाण्यासाठी जसा नागमोडी मोठा रस्ता होता, तसेच त्या रस्त्यातून मधूनच डोंगरावर येण्यासाठी पायवाटा होत्या. दगडी पायऱ्यांनी त्या पायवाटा बांधल्या होत्या. खाली गावात जायचे नि या पायवाटांनी परत वर यायचे हे थोडे थकवणारे होते. परंतु विलक्षण थंड हवा, क्षितिजाला टेकलेला सूर्य, बहरलेल्या फुलांचा सुवास, स्वच्छ रस्ते, दूरवर दिसणारा महासागर, गर्दीच्या रहदारीचा अभाव यामुळे मनाला आल्हाद वाटून थकवा पळून गेला. दुकाने साडेपाच वाजताच बंद झाली होती. पण खोलीत चहा नि कॉफी तसेच दूरदर्शन यांची व्यवस्था केलेली असल्याने फारशी अडचण झाली नाही. एकंदरीत गाव फार छान आहे. तेव्हा इथे येण्यासाठी पर्यटकांची रांग लागते यात आश्चर्य नाही.

सकाळी पावणेनवाला डुनेडिन सुटले. आणि दक्षिणेकडचा पुढील प्रवास

सुरू झाला. आजच्या प्रवासाचा टप्पा होता टे अॅनॉपर्यंत. प्रारंभी उन्ह स्वच्छ होते. पण हळूहळू ढगाळले नि स्वेटर घालण्याइतका गारवा वाढला. सुमारे वीस-एक मिनिटांनी टाएरी नदी लागली. ती ओलांडल्यावर एक सरोवर आले. त्याची खोली ५२ फूट होती असे टीम म्हणाला. काही वेळाने डोंगराळ प्रदेश लागला. त्यातले काही डोंगर बोडके होते. झाडांची पाने पडलेली होती. मात्र लहान लहान टेकड्यांवर कुरणे केलेली होती. आणि एकेक कुरणात शे-दोनशे गलेलठ्ठ मेंढ्या चरताना आढळत. आता दोन हजार वस्तीचे मिल्टन गाव आले. गाव खरोखरच मोहक वाटले. येथे पहिली वस्ती १८६१मध्ये झाली. अधूनमधून वाटेत झुळझुळ पाणी वाहणारे छोटे ओहोळ लागत होते.

आता रस्ता थोडा पश्चिमेकडे वळला. आणि काही समयाने बालकुथा गाव आले. गावाची वस्ती पाच हजारांची आहे. न्यूझिलंडमधली सर्वांत मोठी नदी कुथा या गावाकडून वाहते. गावाबाहेर टिंबरचा मोठा कारखाना होता. काही वेळ कोच पळाला नि टीमने पेगी डेल लेदर क्रॅफ्ट या दुकानापाशी कोच थांबवला. साउथ ओटॅगो प्रदेशात तयार होणाऱ्या अनेक वस्तू तसेच पर्सेस, वॅलेट्स्, बेल्ट्स् या दुकानात होत्या. गलेलठ्ठ मेंढीचे कातडे स्वस्त होते. पण वजनाचा विचार करता ते आणणे कठीण होते. काय घ्यावे नि काय घेऊ नये असा संभ्रम व्हावा इतकी इथे सुव्हेनिअर्सची रेलचेल होती. बाहेर एक विनोदी सूचनापत्र पाहिले. त्याची कॉपी विकत मिळत असल्याने ती घेतली. तिचे नाव होते 'नोटीस टू कॉलर्स' नि त्यात येणाऱ्या माणसाने किती वेळ घ्यावा हे दर्शविले होते. एकंदर चौदा वर्ग होते. त्यातील पुढील निवडक : सेल्समन – अर्धा सेकंद; बील चुकते करणारे – संबंध दिवस; ८० वर्षांवरचे श्रीमंत नातलग – सबंध दिवस; नोकरीच्या खटपटीतले नातलग – दोन सेकंद; बील नि टॅक्स कलेक्टर्स – पुढचा संपूर्ण दिवस.

या दुकानाबाहेरच्या मैदानात एका पाठोपाठ एक अशा मोटरी नि कोच येऊन त्यांची रांग लागत होती. यावरून दुकानात पर्यटकांची किती गर्दी असेल याची कल्पना येईल. यावेळी सूर्यप्रकाश चांगला होता नि आकाश गडद निळे होते. पण वारा सोसाट्याचा असून त्याला बर्फाची धार होती.

अकरा वाजता आम्ही या दुकानातून बाहेर पडलो. कोच पश्चिम दिशेकडे धावू लागला. भोवताली लहान टेकड्यांचा प्रदेश होता. त्यावर हिरवी

कुरणे होती नि त्यात मेंढयांचे कळप चरत होते. हे दृश्य जवळजवळ सतत दिवसभर दिसले. वाटेत लागलेले क्लिटन गाव जेमतेम पाचशे वस्तीचे असून ते समुद्रसपाटीपासून चारशे फूट उंचीवर होते. गोर गाव येण्यापूर्वी पाच-पन्नास वस्तीची छोटी खेडी नि लहान नद्या वाटेत अधूनमधून लागल्या.

गोर गाव मोठे आहे. त्याच्यातून प्रांतिक तसेच राष्ट्रीय राजमार्ग फुटतात. गावाची वस्ती दहा हजाराची असून भोवतालचा प्रदेश उत्कृष्ट शेतीबद्दल प्रसिद्ध आहे. येथे आलो तेव्हा दुपार होऊन गेली होती. आणि विलक्षण गार वारा सोसाट्याने वाहत होता. इथल्या गावातले विजेचे खांब सरळसोट झाडाच्या खोडांचे होते. पूर्वी इंग्लंडमध्ये नि झेकोस्लोव्हाकियात असे खांब पाहिल्याचे स्मरते. हे गाव पाठीमागे पडल्यावर बराच डोंगराळ प्रदेश लागला. म्हणून नकाशावर नजर टाकली. तेव्हा रस्ता पश्चिमेकडे जाताना उजव्या बाजूला गार्व्ही माउंटन्स, आयर माउंटन्स, लिव्हिंग्स्टन माउंटन्स, तर डाव्या हाताला टाकिटिमू माउंटन्स, कॅमेरॉन माउंटन्स अशा डोंगरांच्या माळा त्यात दाखविलेल्या आढळल्या, आणि उंच डोंगरांची शिखरे हिमाच्छादित होती. आता रस्त्याच्या बाजूने एक छोटी नदी वाहताना दिसली. थोड्या वेळाने तिच्यावरचा पूल ओलांडला. पॉपलर, पाईन, टिंबर वगैरे झाडांची रांग रस्त्याच्या कडेला होती, काही गावांतील घरे स्विडनमध्ये पाहिली तशी दिसली. म्हणजे त्यांची छपरे जमिनीच्या जवळ आलेली होती.

आता सूर्य पुन्हा तळपू लागला. उन्ह जाणवू लागले. कुरणांतून गाईंची खिल्लारे चरताना दिसू लागली. शेतांतून ट्रॅक्टर आढळले. थोड्या वेळाने रिव्हर्सडेल गाव आले. यावेळी वाऱ्याला विलक्षण जोर आला होता. गवत वाकलेले दिसे नि झाडांची पाने सळसळत होती. रस्ता भाल्यासारखा सरळ होता, नि त्यावरून एखाद दुसरा ट्रक वा मोटर उलट बाजूने जाताना क्वचित दिसे. आता गार्व्ही डोंगरमाळ जवळ आली. अधूनमधून मोठाली मैदाने लागत. त्यात दाट उत्तुंग वृक्षांची राई दिसे.

थोड्या समयाने सहाशे वस्तीचे लुम्सडेन गाव लागले. गावात लाकूड कापण्याचे दोन कारखाने आहेत नि शिप फार्मिंगवर येथे अधिक भर आहे. वाटेत लागलेली ओरेटी ही लहान नदी ओलांडल्यावर मॉसबर्न गाव आले. या गावाची व्हेनिसानबद्दल – हरिणाचे मांस – प्रसिद्धी आहे. काही समय रस्त्याच्या दोन्ही बाजूंना डोंगर होते. पण पुन्हा मोठे मैदान आले. त्यातून

जाणारी वाईऑ नदी लागली. तिच्या पलीकडची जमीन बरीच ओसाड दिसली. मात्र उजव्या बाजूच्या जमिनीचा मोठा पट्टा लागवडीखाली आलेला होता.

लेक टे ॲनॉच्या दिशेने कोच पळत होता. थोड्या समयाने ते सरोवर दृष्टिपथात आले. न्यूझिलंडच्या दक्षिण बेटातले हे सर्वांत मोठे सरोवर आहे. ते साडेतीनशे मैल लांब असून त्याची खोली काही ठिकाणी नऊशे फूट आहे. स्वित्झर्लंडमधले लेक जीनिवा किंवा हंगेरीतले लेक बॅलॅटोन यांच्या सारखेच हे सरोवर वाटले. पाण्यात उतरणारी दोन छोटी विमाने, एक मोठी नाव, दोन लाँचेस, छोट्या होड्या सरोवरात तरंगत होत्या. वादळी वारा असल्याने सरोवराची सहल रद्द झालेली होती. सरोवराच्या किनाऱ्यावरच्या होड्या निर्मनुष्य होत्या. सरोवराच्या पूर्व किनाऱ्याने रस्ता जातो, नि त्यांच्या पलीकडे अनेक मोटेले होती. पण येथेही रहदारी नव्हतीच. बहुतेक दुकाने बंद झाली होती. त्यामुळे गावात शुकशुकाट होता. सरोवराच्या पलीकडच्या किनाऱ्यावर डोंगराची रांग होती.

टे ॲनॉमध्ये आमचा मुक्काम फ्यार्ड लँड मोटर लॉजमध्ये होता. मनालीच्या टुरिस्ट बंगल्याची आठवण व्हावी इतके साम्य मला इथे आढळले. खोली भूमीलगत होती आणि रस्त्याकडची भिंत काचेची होती. पडदा दूर केला की, क्षितिजापर्यंतचे दृश्य दिसे. आकाश गडद निळे असून त्यात पांढुरके ढग इतस्ततः तरंगत होते. संध्याकाळ झाली तसा डोंगरमाथा काळसर झाला. वेगवान वाऱ्यामुळे छोट्या झाडांच्या फांद्या वाकत होत्या, नि त्यांच्या पानांचा आवाज होत होता. तीच गोष्ट गवताची होती.

मोटेलच्या अंगणाला लागून रस्ता होता नि त्याच्या पलीकडे विस्तीर्ण कुरणे होती. त्यात मेंढ्या चरत होत्या. दूरवरचे डोंगर हिमाच्छादित होते, नि त्याच्यावर काळी छटा असलेले शुभ्र मेघ तरंगत होते. थोड्या समयाने सूर्य अस्ताला गेला. आता डोंगरमाथ्यावरचे हिम कोणते नि शुभ्र मेघ कोणते याविषयी संभ्रम वाटू लागला. डोंगर काळे झाले. निःशब्द वातावरण होते. फक्त वाऱ्याच्या वेगाने होणारा आवाज या निःशब्दतेचा भंग करीत होता. हळूहळू मेंढ्या एक ठिकाणी जमू लागल्या. तरीही दूरवरच्या घरांतले दिवे अजून लागले नव्हते. मला उगीचच कुतूहल वाटले. आणि मग अधून मधून पडदा दूर करून त्या घरांकडे मी पाहत होतो. रात्री नऊनंतर तिथे दिवे लागले. ते चकाकत्या ठिपक्यांसारखे दिसत होते.

आजच्या प्रवासाचा टप्पा मिलफोर्ड साउंडकडून क्विन्जटाऊनपर्यंत होता. सकाळी साडेआठ वाजता आम्ही मिलफोर्ड साउंडकडे जाण्यास निघालो. आज वारा पडला होता. टे अॅनॉपासून मिलफोर्ड ७५ मैल दूर आहे. काही समय रस्ता सरोवराच्या बाजूने जातो. कोचने थोडे अंतर कापले नि एकाएकी ढग येऊन हवेत गारवा आला नि सायंकाळ झाल्याचा भास झाला. थोड्या वेळाने टे अॅनॉ डाउन्स आले. येथे सरोवरातच एक बेट होते. आता रस्ता नागमोडी झाला. या सर्व भोवतालच्या प्रदेशात बर्च पॉपलर, पाईन, टिंबर, वगैरे वृक्षांची अरण्ये होती. काही वेळा रस्त्याच्या दोन्ही बाजूंना गर्द वृक्षराजी येत असे. त्यामुळे संध्याकाळ झाल्याचा भास होई. डाउन्सच्या पुढे वीज पुरवठा अजून गेलेला नाही त्यामुळे डिझेलवर चालणाऱ्या यंत्रातून वीज निर्माण केली जाते आता डाव्या हाताला एलिंग्टन नदी लागली. काश्मीरमधल्या पेहेलगामचे स्मरण देणारे हे निसर्ग-चित्र होते.

आता रस्त्याच्या दोन्ही बाजूंना प्रचंड उत्तुंग वृक्षांची रांग लागली. झाडी इतकी दाट होती की, सूर्यकिरणांना प्रवेश करताना अडचण व्हावी. काही वेळाने नदी रस्त्यापासून दूर गेली नि रस्त्याच्या बाजूला मोठे मैदान आले. मैदानाच्या पलीकडे अजस्र डोंगरमाळ होती. त्यावरून काही ठिकाणी धबधब्यासारखे पाणी कोसळत होते. पुन्हा रस्ता दोन्ही बाजूंना गर्द झाडी असलेल्या प्रदेशात शिरला. त्यातून बाहेर आल्यावर नदी रस्त्याच्या बाजूकडे आली. याच भागात रस्ता दुरुस्ती करणाऱ्या लोकांसाठी एक छोटी वसाहत बांधलेली दिसली. नदीच्या पलीकडे दूरवरच्या डोंगरमाथ्यावर खूप हिम पडलेले होते.

आता कॅसकेड क्रिक हे स्थान आले. सर्व वाहनांसाठी हा विश्रामाचा थांबा होता. नदीचे पाणी अत्यंत थंड होते. स्थळ नि नदीप्रवाह या दोघांनी ऋषिकेशची आठवण दिली. वारा जोरात होता. इथे नौकाविहाराला परवानगी नव्हती. काही समयाने पहिले सरोवर लागले. त्याचे नाव लेक गुन. त्याचा शोध १८६८मध्ये लागला. नंतर फर्गस सरोवर आले. त्याचा शोध १८८९ मध्ये लागला. त्याच्या पाण्याचा रंग पोपटी होता. इथे मला लेक डिस्ट्रिक्टची आठवण झाली. खरोखरच नयनरम्य असा निसर्गाचा देखावा होता.

थोड्या वेळाने रस्ता हॉलीफोर्ड खोऱ्यात शिरला. येथील दऱ्या धुक्याने ऱ्या होत्या. हवा विलक्षण थंड होती. खोऱ्यातूनच नदी वाहत होती.

तिचे अधूनमधून दर्शन होत असे. उंच वृक्ष नि उत्तुंग पर्वत यांचे सान्निध्य सतत राहिले. या उंच पर्वतांच्या अंगावरून असंख्य छोटे छोटे ओहोळ वेगाने खाली कोसळत होते. आता आठ हजार फूट उंचीचा माउंट ख्रिस्तिना नजरेत आला. काही वेळाने नदीचे पात्र वाटेत आले. त्यावरचा पूल ओलांडला. मग नदी डाव्या हाताकडे गेली. पुढे एक मोठा फलक दिसला. त्यावर सूचना होती की, अॅव्हेलांच – बर्फाचे कोसळणारे कडे – गेट्स् पुढे आहेत. ते बंद असल्यास तुम्हास पुढे जाता येणार नाही.

आता फॉल्स क्रिक लागली. त्यानंतर कोसळलेले बर्फाचे कडे रस्त्याच्या बाजूला पडलेले आढळले. हे दृश्य बरेच वेळा दिसले. थोडचा समयाने स्टुडंट पीक आले. ओटॅगो युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी हे शिखर सर केले होते. या वेळी भोवतालचा सगळा प्रदेश हिममय होता. आता होमर टनेल आला. असा बोगदा करावा ही हेन्री होमरची कल्पना होती. १९३५मध्ये बेकार लोकांना काम म्हणून ही योजना हाती घेण्यात आली. पुढे युद्ध सुरू झाल्यावर हे काम स्थगित करण्यात आले. युद्धानंतर पुन्हा त्या कामाला सुरवात झाली नि १९५२मध्ये बोगदा पूर्ण झाला. इथले निसर्गदृश्य अत्यंत रमणीय होते. आणि बर्फाचा कडा कोसळण्याची शक्यता कमी असल्याने येथे टिमने कोच थांबवून सर्वांना फोटो घेण्याची मुभा दिली. या पूर्वी कोच थांबवण्यास त्याने नकार दिला होता. होमर बोगदा एकमार्गी आहे. म्हणजे पंचवीस मिनिटे त्याच्या एका बाजूने वाहने जातात. नंतर पंचवीस मिनिटे विरुद्ध बाजूने ती येतात. बोगदा एक मैल लांबीचा असावा.

त्यातून बाहेर आल्यावर रस्ता नागमोडी झाला. येथेही दऱ्या धुक्याने भरल्या होत्या. पर्वतांच्या अंगावरून पाण्याचे शुभ्र ओहोळ खाली येत होते, नि रस्त्याच्या कडेला कोसळलेल्या हिमाचे मोठे खडक पडलेले होते. साडेदहाच्या सुमाराला चॅझम नावाची छोटी दरी आली. तिथे पोहोचण्यासाठी शंभर फूट खाली जिन्याने जावे लागते. नंतर पुन्हा थोडा चढ येतो. तो पार केला की, नदीचा उगम नि त्याचा प्रचंड घोंघावणारा प्रवाह दिसतो. ही दरी नि भोवतालचा प्रदेश हा क्लेडो खोऱ्याचा भाग आहे.

अकराच्या सुमारास आम्ही मिलफोर्ड साउंडच्या तोंडाशी आलो. आणि या सामुद्रधुनीमधल्या जलविहारासाठी राखून ठेवलेल्या मोठ्या लाँचमध्ये बसलो. लाँचच्या कप्तानाकडेच गाईडचे काम होते. प्रारंभी त्याने येथील प्रदेशाची माहिती दिली. तो म्हणाला की, या जलाशयाला मिलफोर्ड साउं

म्हणतात. तरी ते नाव अन्वर्थक नाही: सामुद्रधुनी ही भूमी झिजून तयार होते. फ्यार्ड हा ग्लेशिअरमुळे तयार होतो. या जलाशयाची निर्मिती ग्लेशिअरमुळे झाली. म्हणून हा मिलफोर्ड फ्यार्ड आहे.

येथे सामुद्रधुनीचे रूप मोठ्या सरोवरासारखे झाले होते. त्यात तीन-चार मोठे धक्के होते. त्याला लागून मोठ्या लाँचेस उभ्या होत्या. जलाशयाच्या दोन्ही बाजूंना प्रचंड सुळके असलेले डोंगर होते नि त्यांच्यावरून घोंघावत पाणी कोसळत होते. वर आकाश निरभ्र होते. पाण्याचा रंग पोपटी होता. डोंगर सरळसोट असूनही त्यांच्यावर दाट झाडी होती. आणि त्यातील असंख्य झाडे सरळ उभी होती. त्याचे रहस्य सांगताना कप्तान म्हणाला की, तीन-चार झाडांची मुळे परस्परांत शिरून एकमेकांना धरून ठेवतात. त्यामुळे त्या झाडांना वाढताना नि टिकून राहताना एकमेक साहाय्यक होतात. पण कोणत्याही कारणाने एक झाड कोसळले तर त्याच्याबरोबर बाकीची तीन-चार झाडेही खाली येतात किंवा मोडतात अशी मोडलेली झाडेही आम्ही पाहिली.

लाँचने काही अंतर कापले. मग उजव्या हाताला प्रथम स्टर्लिंग फॉल्स आला. या धबधब्याचे पाणी थोडे विस्ताराने पडते. पुढच्या धबधब्याचे नाव आहे बोवेन फॉल्स. त्याचे पाणी पाचशेवीस फुटांवरून कोसळते या कोसळ-णाऱ्या पाण्याच्या अगदी जवळ कप्तानाने लाँच नेली. पाण्याचा विलक्षण मोठा गंभीर आवाज होत होता नि त्याचे थंड तुषार अंगावर आले. येथून लाँच पुन्हा जलाशयाच्या मध्यभागाकडे गेली. थोडे अंतर कापल्यावर पुन्हा लाँच किनाऱ्याकडे आली. इथे तीन-चार छोटे पेन्ग्विन पक्षी बसलेले होते. त्यांचे दर्शन नि छायाचित्रे घेतल्यानंतर लाँच पुन्हा जलाशयाच्या मध्यभागा-कडे आली. इथे सील प्राणी क्रीडा करताना दिसले. आता डाव्या हाताला सुमारे मैल उंचीचा सुळका असलेले ' मित्रे पीक ' नावाचे शिखर दिसले. या भागात पाणी खूप उसळू लागले. इथे पाण्याला खूप खोली असल्याने येथपर्यंत मोठी जहाजे येतात. क्विन एलिझबेथ हे प्रचंड जहाज येथे आल्याचे कप्तान म्हणाला. १८५०मध्ये एका नाविक अधिकाऱ्याने या जलाशयाचा शोध घेतला नि त्याला मिल्फोर्ड हे नाव दिले.

आता लाँच परतीच्या मार्गाला लागली. डाव्या हाताकडच्या दोन डोंगरांना त्यांच्या आकारांप्रमाणे नावे मिळाली आहेत. एकाला नाव आहे सिंह. दुसऱ्याला नाव आहे हत्ती. हे सांगून कप्तान गमतीने म्हणाला की,

हा हत्ती भारतीय आहे का आफ्रिकन आहे हे मला ठाऊक नाही. प्रवास संपल्यावर लाँचमधून बाहेर पडताना मी त्याला म्हणालो, आफ्रिकन हत्ती थोडा मोठा असतो. त्याचे कानही अधिक लांब नि मोठे असतात अशी त्याने पुस्ती जोडली. म्हणजे कप्तानाचे अज्ञान विनोदापुरते होते.

आता पाण्याचा रंग काळसर झाला. उन्ह असूनही हवेत गारवा होता. यावेळी लाँच पश्चिमेच्या काठाजवळ आली. येथे असंख्य ओहोळ सुळकेदार डोंगरावरून खाली कोसळत येत होते, नि त्यांचे थंड तुषार अंगावर उडाले. सूर्यप्रकाश लख्ख असूनही उंच डोंगरांमुळे जलाशयात संध्यासमयाचा भास होत होता. उसळणारे पाणी, काळया अजस्त्र प्रस्तरांचे सुळकेदार उंचच्या उंच डोंगर, त्यांच्यावरच्या झाडांतून वाहणाऱ्या वाऱ्याचा विचित्र आवाज हे निसर्गाचे चित्र थोडे रौद्र वाटते. त्यामुळेच त्यातला नौकाविहार आल्हाद-दायक नि नेत्रसुख देणारा असला तरी तो दिवसाउजेडी करावा असेच वाटते.

मिलफोर्ड साउंडकडून परत लेक टे ॲनॉकडे आलो. परतीच्या वाटेवर काही वेळ झिमझिम पाऊस पडत होता. टे ॲनॉपाशी तो चांगलाच जोरात पडला. त्यामुळे हवा खूपच थंड झाली. दुपारी तीननंतर टे ॲनॉ सोडले. तेथपासून मॉसबर्नपर्यंतचा मार्ग कालचाच होता. मग मॉसबर्नहून रस्ता बदलून उत्तरेकडे असणाऱ्या क्विन्सटाऊनकडे जाणारा रस्ता कोचने धरला. वाटेत जॉली खिंड लागली. समुद्रसपाटीपासून ती १००० फूट उंच आहे. काश्मीर किंवा कुलू या खोऱ्यांत फिरलेल्या माणसाला हे चढउतार लक्षातसुद्धा येत नाहीत. जॉली खिंड मागे टाकल्यावर आता रस्त्याच्या दोन्ही बाजूंना शिप फार्मिंगचा प्रदेश सुरू झाला, नि भूमीची रूक्षता संपून हिरव्यागार गवताची कुरणे दिसू लागली. त्यात गलेलठ्ठ मेंढ्या – काहींचा रंग काळा होता – चरत होत्या. वाटेत लागलेले ॲथॉल गाव शिप फार्मिंगचे केंद्र आहे. इथे तीन हजार एकरांची व्यक्तिगत शेते असल्याचे टिम म्हणाला.

थोड्या वेळाने वाकाटिपू सरोवर दूरवर दिसू लागले. त्याची लांबी पन्नास मैलांची असून त्याच्या सुरवातीच्या टोकाशी किंग्स्टन गाव येते. येथून रस्ता सरोवराच्या डाव्या बाजूने गेला. रस्त्याच्या उजव्या हाताला रिमार्केबल ही पर्वतश्रेणी होती. बरेच छोटे डोंगर बोडके असून प्रदेश थोडा ओसाड वाटला. मात्र काही उंच डोंगरांची शिखरे हिमात लपेटलेली होती. इथल्या काही कुरणांमध्ये तपकिरी नि पांढऱ्या रंगाच्या गाई आढळल्या. पुन्हा हिरवळीचा प्रदेश लागला. काही समयाने क्विन्सटाऊन आले.

जॉन मॅक्डरमॉट याने न्यूझिलंडच्या प्रवासवर्णनात या गावाचे वर्णन 'व्हेकेशन टाऊन' असे केले आहे. ते योग्य आहे. न्यूझिलंडमधली सगळीच गावे टुमदार आहेत. पण मला हे गाव अधिक रेखीव नि नेटके वाटले. ते डोंगरात वसलेले आहे. गावाची स्थापना १८६०मधली. विल्यम रिस नि त्याचा एक सहकारी यांनी वाकाटिपू सरोवराच्या आसमंतातील प्रदेशाची शिप फार्मिंगसाठी निवड केली, आणि त्याने इथे आपले घर बांधले. पुढे या भागात सोने मिळते अशी वार्ता पसरताच लोकांच्या झुंडी इकडे येऊ लागल्या. तेव्हा रिसने आपला धंदा बंद केला. आणि सोन्याच्या शोधात येणाऱ्या लोकांना किरस्टनहून जहाजातून क्विन्सटाऊनला आणणे नि त्यांना सर्व प्रकारची सामुग्री पुरविणे हे काम त्याने सुरू केले. यासाठी त्याने क्विन्स आर्म्स हॉटेल सुरू केले. असा आहे या शहराचा गतेतिहास. क्विन्स आर्म्स या हॉटेलच्या जागी आता आईचार्ड हॉटेल उभे आहे. त्याच्या समोरून गावातला मुख्य रस्ता मॉल जातो.

मनोरंजनासाठी पर्यटक या गावाला विशेष करून येत असल्याने त्यांच्यासाठी लहान-मोठी आधुनिक सोयींची नि रचनेची मोटेल्स आहेत. हॉलवे ट्रॅव्हेल मोटेल हे लहानलहान घरांचे होते, तर लेकसाईड मोटेल हे तीन मजली होते नि त्याच्या खिडक्या नि रस्त्याकडच्या भिंती काचेच्या होत्या.

आजच्या वास्तव्यासाठी आम्ही हॉटेल वाकाटिपूमध्ये आलो होतो. त्याच्या पिछाडीला एक छोटा रस्ता असून तो सरोवराच्या बाजूने जातो. आमची खोली टोकाला होती. तिच्या खिडकीतून सरोवर दिसत होते. सरोवरात तीन छोटे धक्के होते नि चार मोठ्या लाँचेस, दोन-तीन छोट्या लाँचेस नि शिडाच्या होड्या तरंगत होत्या. पाण्यात थोडी बदके विहार करीत होती. ट्राउट फिशिंगसाठी धक्का नि व्यवस्था स्वतंत्र होती. मात्र जलाशयात कोणीच कुठे दिसत नव्हते.

कार पार्ककडे जाणारा रस्ता पलीकडे होता. या पार्कच्या प्रवेशद्वारावर 'सर्व्हिस बिफोर सेल्फ' असे ध्येयवाक्य दिलेले होते. त्याच्या पलीकडे जमिनीचा एक पट्टा सरोवरात गेलेला होता, नि त्यावर पाईन वृक्षांची रांग होती. अगदी पलीकडे डोंगरमाळ होती. त्याच्या माथ्यावर शुभ्र मेघ तरंगत होते. इतर गावांप्रमाणे हेही गाव स्वच्छ होते. स्थानिक लोकांनी जाड लोकरीचे कपडे घातले होते. यावरून हवा किती थंड होती याची कल्पना येईल. पक्षी उडत नव्हते. पण त्यांची चिवचिव झाडांतून ऐकू येत

होती. रस्त्यावर गर्दी नव्हती. एखादी मोटर जाताना दिसे. बऱ्याच मोटरी पदपथाजवळ उभ्या असलेल्या दिसल्या, डोंगरात घरे होती. गावाच्या एका कोपऱ्याला डोंगर आहे. त्याच्या माथ्यावर हॉटेल आहे. तिथे जाण्यासाठी केबलकारची व्यवस्था असून ते अंतर ४२७ मिटरचे आहे. येथून गावाचा सुंदर देखावा दिसतो. गावातली दुकाने दुपारी बंद होतात. पण संध्याकाळी सातला उघडतात. ती रात्री बारापर्यंत उघडी राहतात. क्विन्सटाऊन हे खरोखरच रम्य शहर आहे.

१७ ऑक्टोबर हा न्यूझिलंडमधल्या कोच सहलीचा शेवटचा दिवस होता. मागच्या तीन दिवसांत निसर्गरम्य अशा प्रदेशाचे धावते चित्र आम्ही पाहिले. हा खरोखरच अनुपम अनुभव होता. प्रत्येक देशात निसर्गरम्य स्थळे असतात. पण न्यूझिलंडमधली ही एका पाठोपाठ येणारी हरित तृणांच्या नि गर्द वृक्षराजींच्या प्रदेशातील स्थळे मनाला विलक्षण प्रसन्नता देतात.

आजच्या प्रवासाचा टप्पा क्विन्सटाऊनकडून ख्राइस्टचर्चपर्यंतचा होता. सकाळी नऊच्या सुमारास कोचने क्विन्सटाऊन सोडले. प्रवासाचा मार्ग डोंगराळ प्रदेशातून होता. डोंगर ओसाड नि बोडके वाटले. मात्र दूरच्या डोंगरांची शिखरे हिमात लपेटलेली दिसली. वाटेत नेव्हिस ब्लफ ही धोधो वाहणारी नदी लागली. पात्र मोठे असून पाण्याचा रंग पोपटी होता. तिच्यावरचा झुलता पूल १८८८मध्ये बांधला गेला. एके ठिकाणी नदी जवळजवळ दोनशे फूट खाली दिसत होती. आणि तिच्या पलीकडचे डोंगर रूक्ष होते. इथल्या प्रदेशाने मला कुलूतल्या डलहौसीकडे जाणाऱ्या रस्त्याचे स्मरण दिले.

वाटेत लागलेले महत्त्वाचे पहिले गाव क्रॉम्वेल होते. सुमारे हजार वस्तीचे आहे. सोन्याच्या स्थानिक खाणीचा शोध घेणाऱ्या हार्टली नि रैली या दोघांचे या गावात स्मारक आहे. कावारौ नि कुथा या नद्यांच्या संगमावर हे गाव उभे आहे. या गावात जलविद्युत योजनेचे काम सुरू करण्यात आले असून त्यात काम करणाऱ्या लोकांसाठी अद्ययावत घरे बांधण्यात आली आहेत.

सव्वादहानंतर दोन्ही बाजूंना नि थोडे समोरही डोंगर दिसू लागले. उजव्या हाताची माळ डंस्टन माउंटन्सची होती. त्यावर थोडी हिरवळ नि झाडी होती. उन्हाळयात ते रूक्ष होतात असे टिम म्हणाला. येथे रस्ता बांधण्याचे काम चालले असून त्यासाठी डोंगर कापण्यात येत होता. यापुढे

लागलेली डोंगरमाळ अत्यंत रूक्ष होती, आणि त्यातूनच रस्ता जात होता. वाटेत छोटया नद्या लागत होत्या. त्यांचा प्रवाह जोराचा होता. यावेळी आकाश थोडे काळ्या ढगांनी भरलेले होते. आता तीन हजार फूट उंच असलेली लिंडिस खिड आली. काल हिमवर्षाव झाला असल्याने रस्त्याच्या दोन्ही बाजूंना खूप भुसभुशीत बर्फ पडलेला होता. त्याचे चेंडू करून फेकण्याचा मोह टाळणे नि या खेळांचे फोटो न घेणं कसे शक्य होते ?

आता ओमारामा गाव आले. त्याचे वर्णन स्पोर्ट्स्मन्स पॅरेडाइज असे करण्यात येते. येथे ग्लायडिंगच्या स्पर्धा होतात. हे गाव मागे टाकले की, मॅकेंझी कंट्री नावाचा प्रदेश लागतो. मॅकेंझी नावाचा इसम इंग्लंडमध्ये होता. तो मेंढ्या चोरत असे. त्याला तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. तो दोनदा तुरुंगातून पळाला. पुढे त्याला माफी देऊन ऑस्ट्रेलियाकडे रवाना करण्यात आले. त्याने या प्रदेशात वास्तव्य केले होते. या भागातच टेकॅपो, पुकाली, नि ओहाओ ही सरोवरे येतात. त्यांच्यांतून कालवे काढण्यात येत आहेत नि जलविद्युत निर्मितीची केंद्रेही बांधण्यात येत आहेत. विद्युत निर्मितीचे काम संपले की वाहते पाणी कालव्यातून परत सरोवरात सोडण्याची योजना आहे. या सर्व बांधकामासाठी ट्वीझेल गाव वसविण्यात आले. तेथे नवीन घरे अजूनही बांधली जात आहेत.

ट्वीझेल गाव पाठीमागे पडल्यावर ढगाळलेले असूनही दूरवर काही क्षण माउंट कूक दिसला. त्याची उंची ३७६४ मिटर असून तो न्यूझिलंडमधला सर्वांत उंच डोंगर आहे. नुकतीच एक साठ वर्षांची बाई त्याच्यावर चढून आली असे टिम म्हणाला. आता टिमने आम्हाला एका स्मारकाकडे आणले. त्याच्याजवळ एक चर्च आहे नि भोवताली विस्तीर्ण सपाट प्रदेश आहे. कोली जातीचा कुत्रा मेंढ्यांची उत्तम रखवाली करतो. इकडच्या डोंगराळ प्रदेशात त्या जातीच्या कुत्र्याने हे काम उत्तम प्रकारे पार पाडले. त्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या कुत्र्याचे स्मारक लोकांनी बांधले आहे.

आता डाव्या हाताचे टेपॅको सरोवर पाठीमागे पडल्यावर बर्कस खिड आली. बर्कस नावाच्या इसमाने ही खिड १८५५मध्ये ओलांडली. म्हणून तिला त्याचे नाव मिळाले. समुद्रसपाटीपासून ती बावीसशे फूट उंच आहे. ती ओलांडल्यावर काही वेळाने फेअरली गाव आले. मग हिरवागार प्रदेश सुरू झाला. जितक्या लांबवर दृष्टी पोहोचत होती तिथपर्यंत हिरव्या गवताची कुरणे दिसत होती, आणि कुरणांतून शेकडो मेंढ्या चरत होत्या. अर्थात

ते दृश्य नेहेमीचेच होते. फेअरली गावाचे एक वैशिष्टय लक्षात राहणारे आहे. देशासाठी लढाईत कामास आलेल्या स्थानिक सैनिकांच्या नावांनी



कोली कुत्र्याचे स्मारक

गावात झाडे लावण्यात आली आहेत अशी टिमने माहिती दिली.

फेअरलीहून आम्ही प्रांतिक हायवेने जिराल्डिनकडे आलो. हे गाव १८५४-मध्ये वसले नि त्याची वस्ती बावीसशे आहे. प्रारंभी टिंबरच्या कारखान्यांमुळे या गावाची वसाहत होऊन ते भरभराटीस आले. आजच्या प्रवासात बराच वेळ वातावरण ढगाळलेले होते. ते कमी होऊन थोडे आकाश उघडले. थोडचा वेळाने हिरव्यागार टेकडयांचा प्रदेश आला. नंतर पाइन्सच्या वृक्षांनी भरलेले डोंगर लागले. ते मागे पडल्यावर विस्तीर्ण मैदान आले. त्यातील कुरणात असंख्य मेंढचा चरत होत्या. काही मेंढचा इतक्या दूर होत्या की, त्या पांढऱ्या ठिपक्यांसारख्या दिसल्या.

रांगिटाटा या छोटचा गावापाशी कोच आल्यावर येथून तो नॅशनल हायवे क्रमांक एकवर धावू लागला. आता कॅन्टरबरी प्लेन्स सुरू झाले. तीन

दिवसांपूर्वी याच मार्गाने आम्ही खाली दक्षिणेकडे गेलो होतो. आता आकाश निरभ्र होऊन सूर्यप्रकाश लख्ख पडला होता. थोड्याच समयात डोंगरही



न्यूझिलंडमधील शेळ्यांचे कुरण

दृष्टिपथाच्या बाहेर गेले. ॲशबर्टन, रोलेस्टॉन ही पहिल्या दिवशी लागलेली गावे पुन्हा दिसली. पाचच्या सुमारास कोच ख्राइस्टचर्चमध्ये शिरला. ज्या प्रदेशात आपण पाऊल ठेवू असे स्वप्नातही वाटले नव्हते त्या प्रदेशाचे धावते दर्शन घेण्याचे भाग्य मला लाभले होते. दैव म्हणतात ते हेच !

●

ग्रंथ संग्रहालय ठाणे
६२८
२३६२२

# ३. ऑस्ट्रेलिया

ख्राइस्टचर्चमधला मुक्काम १८ ऑक्टोबर या दिवशी संपला. दुपारी दोन वाजता विमानतळाकडे आलो. सव्वा तासाने आम्हाला विमानात बसण्याची सूचना मिळाली. आमच्या विमानाभोवती बरीच छोटी नि मोठी विमाने होती. आमचे विमान प्रवाश्यांनी भरले होते. आता आम्ही ख्राइस्टचर्चकडून ऑस्ट्रेलियात सिडनीकडे जाणार होतो. हा पूर्वीचाच हवाई मार्ग होता. चारच्या सुमारास विमानाने भूमी सोडली नि पाहता पाहता खालची घरे, शेते इवलीशी दिसू लागली. मग शुभ्र मेघ येऊ लागले. ते तरल होते. त्यांच्यावर सूर्याची प्रभा पडून त्यांच्यात इंद्रधनुष्यासारखे रंग तयार झालेले दिसले. दूरवरचे हिमाच्छादित डोंगर, खालची रेखीव शेते, वाकाटाकी नदी, एक मोठे सरोवर हळूहळू मागे पडले, नि विमान समुद्रावरून जाऊ लागले. थोड्या वेळाने खाली पांढऱ्या ढगांचे आच्छादन येऊन समुद्र दिसेनासा झाला. बराच वेळ ही परिस्थिती राहिली. सिडनी जसे जवळ आले तसे विमान हलू लागले. या वेळी हवामान फार बिघडलेले होते. धुकेही खूप होते. पण अखेरीस ते कमी होऊन सिडनी गाव नजरेत आले. विमानाने उंची सोडण्यास सुरवात केली आणि काही क्षणांनी ते सिडनीच्या विमानतळावर उतरले.

ऑस्ट्रेलियातही बाहेरच्या वस्तू आत आणण्यावर निर्बंध आहेत. येथेही कस्टमने दिलेला फॉर्म भरून जवळच्या खाद्य वस्तू जाहीर कराव्या लागतात. तेव्हा आम्ही थोडे अस्वस्थ होतो. परंतु न्यूझिलंडमध्ये आमच्या जवळच्या पदार्थांना हरकत घेण्यात आली नव्हती. तेव्हा इथेही तसेच होईल असे आम्हाला वाटले नि तसेच झाले. बाहेर येताना पदार्थ काय आहेत तेवढे समजावून द्यावे लागले.

सिडनीहून आम्ही मेलबर्नला कोचने जाणार होतो आणि त्या प्रवासाची व्यवस्था टूर्स ऑस्ट्रेलिया या संस्थेकडे होती. त्या संस्थेचा कोच विमानतळावर आला होता. त्या कोचने आम्ही द क्लेरमाँट इनवर मुक्कामासाठी आलो. हे हॉटेल मध्यवस्तीत होते. आणि त्याच्याभोवती लहान लहान दुकाने होती. त्यामुळे दूध, पाव, चीज, फळे, इत्यादी पदार्थ सहज उपलब्ध होते.

सिडनीला यापूर्वी आम्ही १९७१ मध्ये आलो होतो. त्यामुळे गाव अपरिचित नव्हते. पण सगळे जगच वेगाने बदलत आहे त्याला सिडनी कशी अपवाद असणार! मात्र या वेळी मला एक नवीन गोष्ट आढळली. ऑस्ट्रेलिअन लोकांत आपल्या पूर्वेतिहासाविषयी विशेष आत्मीयता निर्माण झाली आहे आणि तो इतिहास जिवंत ठेवण्यासाठी समाज नि शासन हे दोघेही प्रयत्नशील आहेत. राष्ट्रीय अहंकार तीव्र करण्यासाठी हे आवश्यक आहे. ऑस्ट्रेलिअन समाज आपल्या परंपरेविषयी ही जी जागृती दाखवत आहे त्यावरून भारतीय समाज बोध घेऊ शकतो. पण पूर्वेतिहास जतन करण्याचे काम कसे सुरू झाले हे पाहण्यापूर्वी ऑस्ट्रेलियामध्ये तो इतिहास ज्या गेल्या दोन शतकांत निर्माण झाला त्या काळावर धावती नजर प्रथम टाकली पाहिजे.

ऑस्ट्रेलियाच्या भूमीचे प्रथम दर्शन डचांना झाले. हॉलंडहून जलमार्गाने जावा बेटाकडे येताना जहाजे प्रथम केप ऑफ गुड होपला वळसा घालत आणि मग ती पूर्व दिशेकडे जात. असा विशिष्ट जलप्रवास झाल्यावर ती जहाजे उत्तरेची दिशा घेत. मग काही वेळा नावाडी चुकीने अधिक पूर्वेकडे जात असत. अशा चुकलेल्या नावाड्यांना ऑस्ट्रेलियाच्या पश्चिम किनाऱ्याचे दर्शन होत असे. त्यांनी सांगितलेल्या माहितीवरून या प्रदेशाचा शोध घेण्याचे ठरून १६४२मध्ये कॅप्टन ॲबेल टास्मन याच्याकडे ही कामगिरी देण्यात आली. पण अधिक दक्षिणेकडचा मार्ग त्याने धरल्याने त्याला ऑस्ट्रेलियाच्या भूमीचे दर्शन झाले नाही. मात्र त्याला ऑस्ट्रेलियाजवळचे एक मोठे बेट दिसले. त्या बेटाला त्याच्या सन्मानार्थ टास्मेनिया हे नाव देण्यात आले आहे.

पुढे सव्वाशे वर्षे या प्रदेशाचा शोध घेण्यासाठी काही हालचाल झाली नाही. १७७० मध्ये कॅप्टन कुकने आपल्या जलप्रवासात ऑस्ट्रेलियाच्या पूर्व किनाऱ्याचा शोध घेऊन त्याला 'न्यू साउथ वेल्स' हे नाव दिले, आणि तिथे वस्ती करता येईल असे सुचविले. पण ब्रिटनचा अमेरिकन वसाहतींशी तंटा सुरू असल्याने ही सूचना कागदावरच राहिली. पुढे अमेरिका स्वतंत्र झाली. पूर्वी ब्रिटनमधल्या तुरुंगातील गर्दी कमी करण्यासाठी कैद्यांना अमेरिकन वसाहतीत पाठविण्यात येत असे. पण तिकडचे दरवाजे बंद झाल्याने कैद्यांना ऑस्ट्रेलियाकडे पाठवावे असा विचार पुढे आला, आणि १७८७ मध्ये तो कृतीत आला. या वर्षी मे महिन्यात कॅप्टन फिलिपच्या

नेतृत्वाखाली अकरा जहाजे नि त्यावरची १५०० माणसे यांनी ऑस्ट्रेलियाकडे जाण्यासाठी प्रस्थान ठेवले. या १५०० लोकांत ७५७ कैदी होते.

२६ जानेवारी १७८८ या दिवशी सिडनी बंदरात हा काफिला येऊन दाखल झाला. आणि ऑस्ट्रेलियामध्ये युरोपीय संस्कृतीची मुहूर्तमेढ रोवली गेली. अर्थात आजच्या ऑस्ट्रेलिअन जीवनावरून त्या काळाची जराही कल्पना येणार नाही. त्यासाठी त्या काळाचे वर्णन करणारे साहित्य पाहावे लागते. प्रारंभीची दोन-तीन वर्षे अत्यंत हलाखीची गेली, आणि वसाहत टिकेल की नाही याची शंका निर्माण झाली. पण वसाहत टिकली. या काळात जीवन कसे होते याची कल्पना मार्जोरी बर्नार्डने 'अ हिस्टरी ऑफ ऑस्ट्रेलिया' या ग्रंथात दिलेल्या पुढील शब्दचित्रावरून येते : "एखाद्याने शिकार केली किंवा त्याला मासा मिळाला आणि त्याने शेजाऱ्याला भोजनाचे आमंत्रण दिले तर त्या आमंत्रणाबरोबर सूचना असे की, येताना त्याने स्वतःचा पाव आणावा. गव्हर्नराच्या बंगल्यावरच्या भोजनप्रसंगी हीच पद्धत होती. जो मनुष्य जेवायला येई तो आपल्या खिश्यातून पाव काढून टेबलावर ठेवी." अशा दैन्यातूनच आजचा समृद्ध ऑस्ट्रेलिया उभा झाला आहे.

कॅप्टन फिलिपने जेथे जहाजे नांगरली त्याला व्हायकाउंट सिडनी या आपल्या धन्याचे नाव दिले. हेच सिडनी कोव्ह. त्यावरून गावाचे सिडनी हे नाव पुढे प्रचलित झाले. ऑस्ट्रेलियातले हे सिडनी गाव सर्वांत जुने नि सर्वांत मोठे आहे. न्यू साउथ वेल्सची ती राजधानी असून तिची वस्ती तीस लाखांच्या वर आहे. जहाजांना बंदरात नांगरल्यावर कैद्यांना प्रथम कामाला लावण्यात आले. त्यांचे गट करण्यात आले, आणि सिडनी कोव्हच्या आसमंतातल्या प्रदेशातील झाडी वगैरे कापण्याचे काम त्यांच्याकडून करून घेण्यात आले. अशा प्रकारे ही भूमी निवासासाठी तयार करण्यात आली. प्रारंभी राहण्यासाठी तंबूच होते. कालौघात त्याची घरे झाली. सिडनी कोव्हच्या पश्चिमेकडचा भाग डोंगराळ असल्याने 'द-रॉक्स' हे नाव त्याला मिळाले, नि तेच कायम झाले. तेथेच हळूहळू खानावळी, कुंटणखाने, वगैरे स्थापन झाले. खलाशी लोकांना ही स्थाने आवश्यक नि स्वर्गतुल्य वाटत. भूमी खडकाळ असल्याने नीट रस्ते बांधणे कठिण झाले होते. त्यामुळे दुर्गंधी; घाण यांचे इथे साम्राज्य होते. विसाव्या शतकाच्या प्रारंभी या भागात प्लेग सुरू झाला. तेव्हा शासनाने इथली घरे पाडून ती जाळली. १९२४मध्ये हार्बर ब्रीज बांधण्यासाठी या भागातली आणखी घरे पाडण्यात आली.

१९५७मध्ये काहिल एक्सप्रेसवे तयार करताना आणखी घरे नष्ट झाली. तरीसुद्धा काही भाग वाचला. आणि आता हाच भाग नॅशनल हेरिटेज म्हणून जतन करण्याचा प्रयत्न होत आहे, आणि त्याचा अभिमान बाळगावा असे सांगण्यात येत आहे.

न्यू साउथ वेल्स शासनाने १९७०मध्ये 'सिडनी रिडेव्हलप्मेंट अॅथॉरिटी'ची स्थापना केली, नि तिच्याकडे द रॉक्स या भागाच्या पुनर्बांधणीचे काम सोपले. नवीन बांधकामाची जुन्याशी उत्तम मिळणी झाली पाहिजे या सूत्रानुसार इथले बांधकाम यापुढे होणार आहे. जुन्या इमारती नि घरे यांच्या दुरुस्तीचे कामही हीच अॅथॉरिटी पाहते. सिडनीच्या पहिल्या वस्तीचा हा भाग प्रामुख्याने ब्रॅडफिल्ड हायवे नि सिडनी कोव्ह यांच्या दरम्यान आहे. यातील एका घरावर पुढील मजकुराची पाटी होती : 'राष्ट्रीय वास्तू. यात बदल वगैरे करता येणार नाही. त्याचे जतन करावयाचे आहे.'

या विभागाची पायी सहल असते, आणि त्याची सुरवात रॉक व्हिझिटर्स सेंटरपासून सुरू होते. आम्ही मात्र या भागातून कोचने फिरलो. मार्गावर प्रथम जिऑलॉजिकल म्युझिअम लागला. नंतर नॅशनल ट्रस्ट बिल्डिंग, फायर सर्व्हिस म्युझिअम, ओल्ड ऑब्झर्व्हेटरी, १८४८मधले गॅरिसन चर्च यांच्याकडून कोच गेला. अर्गाइल टेरेसपाशी आम्ही थोडा वेळ थांबलो. इथे खडक कापून रस्ता तयार केलेला होता. आणि येथेच पलीकडे फाशी देण्याची व्यवस्था असे. नंतर १८४४मध्ये बांधलेले ओरिएंट हॉटेल, जे प्रथम घर होते नि पुढे जिथे पोलीस ठाणे आले ते सर्जन्स कोर्ट, जेथे सिडनीतला पहिला रस्ता तयार झाला तो सार्जंट मेजर्ज रो ही स्थाने दिसली. कॅडमन्ज कॉटेज हे सिडनीतले सर्वांत जुने घर आहे. ते छोटे पण दुमजली आहे. १८१६मध्ये ते बांधण्यात आले. घरासमोर लहानशी बाग आहे, नि बाहेर गॅसचा दिवा आहे. येथून आम्ही हिरो ऑफ वाटर्लू या हॉटेलकडे आलो. पूर्वी खिडक्यांवर कर द्यावा लागत असल्याने त्याच्या खिडक्या बंद असत. शिपराइट आर्म्स हॉटेल याच्याविषयी अशी गोष्ट सांगतात की, या हॉटेलातून खाडीकडे एक भुयार जात असे. जो दारू पिऊन बेहोष होई त्याला या भुयारी मार्गाने नेऊन जहाजावर चढवत नि मग खलाशी म्हणून त्याला राबवत अशा अनेक छोट्या नि पुराण्या वास्तू येथे आहेत. आणि राष्ट्रीय परंपरा जिवंत ठेवण्यासाठी ऑस्ट्रेलिअन शासन त्यांच्या जतनाच्या प्रयत्नात आहे.

सिडनी हे आधुनिक नगर झाले आहे. येथे म्युझिअम, आर्ट गॅलऱ्या

अशी प्रेक्षणीय स्थाने आहेत. उद्यानांसाठी ३६ एकर जमिनीचा वापर केलेला आहे. नि त्यातले बोटानिकल गार्डन्स प्रसिद्ध आहे. व्हिक्टोरिआ मेमोरिअल इमारत हे मोठे भांडार आहे. त्याच्यातील दुकानांच्या पाट्या प्रत्येक देशाच्या भाषेत आहेत. देवनागरी लिपीतही येथे पाटी आहे.



सिडनीचे प्रसिद्ध ऑपेरा हाऊस

सिडनीला आलेला प्रवासी दोन गोष्टी अवश्य करतो. एक म्हणजे, सिडनी ऑपेरा हाऊसला तो भेट देतो. या वास्तूसाठी जगातून आराखडे मागवण्यात आले होते. डॅनिश वास्तुशिल्पी जोर्न उटझोन याने दिलेला आराखडा मंजूर करण्यात आला. १९५९मध्ये बांधकामास सुरवात होऊन ते १९७३मध्ये पूर्ण झाले. त्या वर्षीच ऑक्टोबर महिन्यात राणी एलिझबेथच्या हस्ते या वास्तूचे उद्घाटन झाले. १९७१मध्ये मी आलो असताना तिचे बांधकाम चालू होते. आधुनिक जगातले ते एक आश्चर्य समजण्यात येते. तिथे कॉन्सर्ट्स् तसेच सभा होतात. आम्ही आत गेलो त्यावेळी सभा चालू होती. इमारतीसाठी वापलेल्या लॅमिनेटेड काचेची किंमत चौरस फुटाला १६ पाउंड होती. यावरून ही वास्तू बांधण्यासाठी किती खर्च झाला असेल याची कल्पना करता येते.

प्रवासी दुसरी गोष्ट करतो ती म्हणजे, तो सिडनी बंदराच्या जलसहलीला जातो. कॅप्टन कुक्ज कॉफी क्रूझ ही सुमारे अडीच तासांची जलसहल आहे. या सहलीत प्रवाश्यांना कॉफी नि बिस्किटे देण्यात येतात. तसेच एक गाईड जवळजवळ सबंध वेळ प्रवास मार्गावरच्या स्थळांची सविस्तर माहिती देते. सहलीसाठी दोन डेकची लाँच होती आणि प्रवासीही खूप होते. लाँचने धक्का सोडला आणि काही क्षणांत समोर सिडनी ब्रीज नि पलीकडे उजव्या हाताला ऑपेरा हाऊस दिसले. शिडाच्या छोट्या होड्या किनाऱ्यापाशी होत्या. थोड्या वेळाने गव्हर्नरांचा बंगला आला. इथे उत्तम बोटानिकल गार्डन आहे. नंतर दूरवर फोर्ट डेनिसन दिसला. गेल्या शतकात रशियाच्या आक्रमणाला तोंड देण्यासाठी तो बांधण्यात आला होता. या फोर्टचा कारागृह म्हणूनही उपयोग झाला आहे. इकडेच दुसऱ्या महायुद्धात जपानी पाणबुड्यांना प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यासाठी पाण्यात जाळ्या टाकण्यात आल्या होत्या. तरी तीन पाणबुड्या आत आल्याच. त्यांतल्या एकीत स्फोट झाला. दुसरीने स्वतःचा घात केला आणि तिसरीचे काय झाले हे कोणालाच कळले नाही.

आता जलमार्गात क्लार्क आयलँड, शार्क आयलँड अशी बेटे लागली. किनाऱ्याकडच्या डोंगराळ भागात उत्तम घरांच्या वस्त्या दिसल्या. नंतर एक मोठी जपानी आगनाव नांगरलेली दिसली. त्याच्या पलीकडे एक अमेरिकी युद्धनौका होती. दूरवर किनाऱ्याकडे असंख्य रंगीबेरंगी शिडांच्या होड्या होत्या. आता थोडा पाऊस पडू लागला. धुकेही आले. मग किनाऱ्याच्या दोन्ही बाजूंना वृक्षाच्छादित डोंगर लागले. या डोंगरांवरची घरे मलबार हीलवरच्या घरांची आठवण देत होती. किनाऱ्यापाशी काही ठिकाणी हाऊस-बोटीही होत्या. मिडिल हार्बरजवळ आल्यावर लाँच परत वळली. ब्रॅडली हेडपाशी एच. एम. ए. एस. सिडनी या युद्धनौकेचा मास्ट आहे. या जहाजाने जर्मन पाणबुडी एमडेन हिला बुडविले होते. या सहलीमुळे बंदराच्या बऱ्याच मोठ्या भागाच्या इतिहासाची नि भूगोलाची माहिती झाली.

सिडनीमध्ये पहिली वसाहत झाल्यावर कॅप्टन फिलिपने भोवतालच्या प्रदेशाचा शोध घेण्यास सुरवात केली. त्याने प्रारंभी जी नवी भूमी संपादित केली तीच पॅरॅमाटा या नावाने पुढे ख्यात झाली आहे. परंतु हे प्रयत्न तुटपुंजे होते. आणि पुढील पंचवीस वर्षे सिडनीभोवतालच्या प्रदेशात लोकवस्ती झाली. सिडनीच्या पश्चिमेकडचा ब्ल्यू माउंटन हा वस्ती पसरण्याच्या

मार्गातला अडसर ठरला होता. पण पुढे ही डोंगरमाळ ओलांडण्यात यश येऊन एक रस्ता बांधण्यात आला. मग मात्र प्रदेशाचा शोध घेण्याच्या कामाला वेग आला. आणि पश्चिमेकडच्या प्रदेशात वसाहत करण्यासाठी लोकांची रीघ लागली. अमेरिकेमध्ये गेल्या शतकात मोठ्या संख्येने लोक पश्चिम प्रदेशाकडे गेले. त्याचे वर्णन अमेरिकी इतिहासात 'सागा' म्हणून करण्यात येते. आणि 'यंग मॅन गो वेस्ट' हा शब्दप्रयोग तेथे रूढ झाला. असे मोठे स्थलांतर ऑस्ट्रेलियात झाले नाही. पण तेथील भूप्रदेशाचा शोध घेण्याचा जो प्रयत्न झाला तो छोट्या प्रमाणावरचा 'सागा'च आहे. अनेक शोधकांनी निरनिराळ्या दिशांनी शोध घेतला. यांतले दोघे होते ह्यूम नि हॉवेल. या दोघांनी भूमार्गाने नैऋत्येकडे प्रवास केला नि ते मेलबर्नच्या आसमंतात आले. आता मेलबर्नकडे जाणाऱ्या हायवेला ह्यूमचे नाव देण्यात आले आहे. आणि आमचा कोचप्रवास बराचसा या हायवेवरून झाला. सिडनी ते मेलबर्न हा आमचा प्रवास तीन टप्प्यांचा होता. पहिला टप्पा होता सिडनी ते कॅन्बरा; दुसरा टप्पा होता कॅन्बरा ते ऑल्ब्युरी; नि तिसरा टप्पा होता ऑल्ब्युरी ते मेलबर्न.

कॅन्बराकडे जाण्यासाठी २१ ऑक्टोबरला सकाळी साडेनऊला निघालो. कोचच्या ड्रायव्हरचे नाव होते टेड. सकाळी निघण्यापूर्वी आकाश निरभ्र होते, नि उन्हही लख्ख पडले होते. पण थोड्या वेळाने आकाश भरले नि झिमझिम पाऊस पडू लागला. वातावरण बरेच थंड झाले. गावातून बाहेर पडताना रेल्वे स्थानक लागले. मग टेकनिकल कॉलेज, टेलिफोन एक्सचेंज, व्हिक्टोरिया पार्क, हेलेसब्युरी, व्हेटर्नरी हॉस्पिटल, असे करत कोच फ्रिवेकडे आला. मग पारामाटा येऊन रस्ते रुंद झाले. येथे इटालिअन लोकांची वस्ती बरीच असावी. कारण ला फिआमा या नावाच्या वृत्तपत्राचा छापखाना दिसला.

आता ह्यूम हायवे सुरू झाला. रस्त्याच्या बाजूला सुंदर उपनगरे लागली. पाऊस पडून गेलेला असल्याने रस्ते स्वच्छ होते. हवेत गारवा होता. उपनगरातल्या बहुतेक घरांच्या पुढे वाटिका असे नि त्यातली झाडे चित्र-विचित्र फुलांनी डवरलेली असत. काही ठिकाणी मोठी झाडेही आढळत. रहदारी कमी होती. आकाश भरलेले असले तरी पाऊस पडत नव्हता. वाटेत एके स्पॅनिश इन लागली. मात्र घराची रचना स्पॅनिश धर्तीची नव्हती. काही ठिकाणी मोठी आवारे लागली. त्यात विक्रीसाठी मोटरी ठेवलेल्या होत्या.

एके ठिकाणी मोठी जाहिरात होती : फोर्ड नगरात आम्ही आपले स्वागत करतो. नंतर खाद्यपदार्थांचे मोठ्या प्रमाणात वितरण करणाऱ्या फ्रँकलिन सुपर मार्केटचे कार्यालय दिसले. आता वाटेत बँक्सटाऊन लागले. मग जॉर्ज रिव्हर आली. या नदीचे पाणी अती शुद्ध आहे असे टेड म्हणाला. त्यानंतर यागुना गाव आले. यागुना हा अॅबॉरिजिनल शब्द असून त्याचा अर्थ 'आज' असा आहे. आता बास हील गाव आले. त्यातल्या बास हील हॉस्पिटलची इमारत एक-मजली होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना झाडे होती. पण ती दाट नव्हती. नंतर प्रॉस्पेक्ट क्रिक लागली. तिच्यावरचा दगडी पूल डेव्हिड लेनिक या कैद्याने बांधला. ऑस्ट्रेलियात प्रारंभीच्या बऱ्याच गोष्टी कैदी वर्गाकडून बांधल्या गेल्या आहेत. तसेच बराच प्रदेश स्क्वॉटर्सनी वसाहत योग्य केला आहे.

लिव्हरपूल हे पहिले मोठे गाव लागले. ते जॉर्ज नदीवर आहे. गव्हर्नर मॅक्वायरने ब्रिटनचा भूतपूर्व पंतप्रधान लिव्हरपूल याचे नाव या गावाला दिले. सिडनी ते लिव्हरपूल हा रस्ता १८१४मध्ये तयार झाला. येथले सेंट ल्यूकचे चर्च १८२४मध्ये बांधले गेले, आणि ते सर्वांत जुने अँग्लिकन चर्च समजले जाते. गावाचे मुख्य उद्यम कुक्कुट पालन, शेती, दुग्ध व्यवसाय नि इलेक्ट्रिक गुड्स् हे आहेत. लिव्हरपूल हे सैनिक केंद्र असून तेथे बारा हजार सैनिकांचा तळ आहे. बरीच घरे एक-मजली होती. गावात पायोनिअर मेमोरिअल आहे नि ते स्वाभाविक आहे.

लिव्हरपूलनंतर मैदाने लागली. त्यात झाडी विपुल होती. टेडच्या सांगण्याप्रमाणे ही 'कॅटल कंट्री' होती. परंतु अधूनमधून घोडे, बकऱ्या, मेंढ्या, कोंबड्या हे प्राणीही कुरणांतून दिसत होते. घरे अंतराअंतरावर दिसत होती. ऑस्ट्रेलियात पाण्याचा एकदम दुष्काळ पडतो. टेड म्हणाला की, पाण्याचा साठा सात-आठ वर्षांसाठी करावा लागतो. गेले काही दिवस सतत पाऊस झाल्याने रस्ते ओले होते, नि शेतांतूनही पाणी तुंबलेले दिसे. आणखी एक वैशिष्ट्यरूप गोष्ट दिसली, ती म्हणजे प्रत्येक कुरणात गुरांसाठी छोटा तलाव असे. तोही पाण्याने भरलेला होता. रस्त्याच्या बाजूने जाणारा लोहमार्ग अधूनमधून दिसत होता. बार्गो स्थानकाच्या बाजूने आमचा रस्ता गेला तेव्हा त्या लोहमार्गावरून एक मालगाडी गेली.

आता ढग जमून झिम झिम पाऊस पडू लागला. थंडी वाजण्याइतके वातावरण गार झाले. रस्ता लहान झाला. त्याच्या दोन्ही बाजूंना झाडी होती. जवळ जवळ अरण्याचाच हा प्रदेश होता. आता मिट्टागाँग गाव आले.

माउंट जिब्राल्टरच्या पायथ्याशी हे गाव असून त्याच्या भोवताली डोंगराची माळ होती. पर्यटन केंद्र म्हणूनही त्याची ख्याती आहे. १८६७मध्ये लोहमार्ग येथे पोहोचला. मद्यनिर्मिती हा या गावातला मोठा उद्योग. गाव टुमदार होते.

मिट्टागाँगनंतर झाडी अगदी हिरवीगर्द झाली. डोंगरावरही कुरणे केलेली होती. त्यामुळे प्रदेश हिरव्या शालूत लपेटलेला आहे असे वाटले. थोड्या समयाने बेरिमा गाव आले. येथील पहिली वस्ती १८२२मधली. 'बेरिमा' हा शब्द ॲबॉरिजिनल असून त्याचा अर्थ 'दक्षिण' असा आहे. त्याच नावाचे येथे एक हॉटेल आहे. आता वाटेत रेल्वे क्रॉसिंग लागले. यावेळी कुरणातून गुरांपेक्षा मेंढ्याच जास्त आढळल्या. यावेळी आकाश भरून आले. धुकेही खूप झाले. पाऊस जरा जोरात पडू लागला. भोवतालचा प्रदेश इंग्लिश कंट्रीसाईडची आठवण करून देत होता. वाटेत लागलेल्या वनात सुरूची झाडे खूपच होती. मात्र लोकवस्ती फारच विरळ वाटली. डोंगरातल्या पाषाणांचा रंग पिवळसर दिसला. आता मैलामैलांची हिरवीगार कुरणे सतत लागली आणि पाऊस पडत असूनही गलेलठ्ठ मेंढ्या चरताना दिसल्या. ऑस्ट्रेलियातली शेते नि कुरणे किती मोठी असतात याची कल्पना पुढील आकड्यांवरून येईल. काही कुरणे ८०,००० एकरांची आहेत आणि एक कुरण ११,२६२ चौरस मैलांचे आहे. जगातल्या मेंढ्यांच्या संख्येतील $\frac{1}{6}$ मेंढ्या ऑस्ट्रेलियात आहेत. यावरून येथील शिप फार्मिंगची कल्पना येऊ शकते. कॅप्टन जॉन मॅकआर्थरने गेल्या शतकाच्या प्रारंभी मॅरिनो जातीची मेंढी ऑस्ट्रेलियात आणली. ही मेंढी जास्तीत जास्त लोकर देते.

मार्गावरच्या एका चिंचोळ्या नदीवर पूल होता. पण त्यावरून जाण्या-पूर्वी एका स्थानकापाशी टेडला कोचचे वजन करावे लागले. आता डोंगरांची रांग पुन्हा जवळ आली. त्यातलाही खडक पिवळाच आढळला. थोड्या वेळाने गोलबर्न हे मोठे गाव आले वोलोनडिली नि मुलवारी या नद्यांच्या संगमावर हे गाव वसलेले आहे. ऑस्ट्रेलियातल्या मोठ्या गावात त्याची गणना होते. ते रेल्वेचे जंक्शन आहे. लोकर, फळे, बटाटे यांची ही बाजार-पेठ आहे. येथे 'स्टॉक एक्स्चेंज' आहे. यावरून त्याच्या भरभराटीची कल्पना येऊ शकते. गावाची स्थापना १८३३मध्ये झाली. त्याच्याकडे जाणारा रस्ता कैद्यांनीच बांधला. मुख्य रस्ताच्या बाजूला अनेक मोटेल्स होती. गावातली घरे इंग्लिश पद्धतीची वाटली. ती एक-मजली असून मोठी सुबक होती. गोलबर्न इव्हिनिंग पोस्टचे कार्यालय मुख्य रस्त्यावरच आहे. या

वृत्तपत्राची स्थापना १८७०मध्ये झाली असे बाहेरच्या पाटीवरून दिसले. टाउन हॉल जुन्या पद्धतीचा नि लाल विटांत बांधलेला होता. मात्र इन्शुरन्स कंपनीची इमारत अद्यतन होती.

दीडच्या सुमारास बरेच उघडले. आकाशाचा काही निळा भाग दिसू लागला. शेताच्या कडेला निळ्या फुलांचा विलक्षण बहर आलेला होता. यापूर्वी इतका दिसला नव्हता. या सुमारास रस्त्यावरची रहदारी बरीच कमी झाली होती. रस्ताही मोठा केला जात असून त्याच्यावर बुलडोझर्स व इतर यंत्रे होती. कामगारही काम करीत होते.

आता मार्ग टेकड्यांच्या प्रदेशातून गेला. टेकड्यांवर विलोची झाडे विपुल प्रमाणात दिसली. मग एक मोठे मैदान लागले. त्याच्या पलीकडे एक प्रचंड मोठा जलाशय दिसला. मग एक छोटी घाटी लागली. ती ओलांडली आणि काही वेळाने कोचने कॅन्बरात प्रवेश केला. यावेळी दुपारचे अडीच वाजले होते.

कॅन्बरा ही ऑस्ट्रेलियाची राजधानी असून मोठी रम्य नगरी आहे. कारखानदारी कमी असल्याने गावात घाईगर्दी दिसत नाही. शिवाय गावाला राजधानी करावयाची ठरवून त्याप्रमाणे आखणी केली असल्याने ते मनोज्ञ नगर झाले आहे. विशाल रस्ते, उद्याने, मोठे जलाशय, रस्त्यांच्या बाजूला उंच झाडे, छोटी घरे आणि सरकारी इमारती यांमुळे सर्व काही रेखीव दिसते. शिवाय छोटीमोठी हॉटेल्स, मोटेल्स आहेतच.

वॉर मेमोरिअल नि त्यातला म्युझियम ही अत्यंत प्रेक्षणीय आहेत. १९७१मध्ये मी हा म्युझिअम पाहिला होता. पण आता त्याचा बराच विस्तार झालेला दिसला. मेमोरिअलची वास्तू बिझंटाईन रचनेची असून शुभ्र प्रस्तरात बांधलेली आहे पार्श्वभूमीला डोंगर आहे नि भोवताली उंच युकिलिप्टस झाडांच्या रांगा आहेत.

म्युझिअमच्या एका विभागात जहाजांची नि लढाऊ जहाजांची मॉडेले आहेत. ॲम्ब्युलन्स ट्रान्सपोर्ट या जहाजाचे मॉडेल सुंदर वाटले. एस. एस. कॅथे हे जहाज टॉर्पेडो झाले. त्यावर २५ भारतीय नि २१ युरोपीय होते. त्यांतले आठ वाचले. त्यांनी छोट्या नावेतून पुढील प्रवास केला. वादळ, गोड पाण्याचा अभाव, खाद्य पदार्थांची कमतरता अशा अडचणींवर मात करून ही आठ माणसे अखेरीस किनाऱ्यास लागली. ही सर्व कथा मॉडेलच्या शेजारी लिहून ठेवलेली आहे.

दुसऱ्या विभागात निरनिराळ्या देशांतील सैनिकांचे पुतळे आहेत. जर्मन इटालिअन, ब्रिटिश. पण त्यांत भारतीय दिसला नाही, तिसऱ्या विभागात पदके ठेवलेली आहेत. शौर्य प्रदर्शनासाठी मिळणारी ही पदके आहेत. त्यात जर्मनीचा नाईट क्रॉस आहे, जपानचा ऑर्डर ऑफ द गोल्डन काइट आहे. आणखी एका मोठ्या विभागात युद्धभूमीची मॉडेले दाखविली आहेत. त्यांत व्हिएतनाम, कोरिया येथल्या युद्धभूमीची मॉडेल्स डोळ्यांत भरतात. याच्याच पलीकडे स्लाइडांच्या साह्याने चित्रे दाखविण्यात येतात. त्यात सिसिली, हॉलंड, ग्रीस, युगोस्लाव्हिया येथील रणभूमींची चित्रे दिसतात. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'जी फॉर जॉर्ज' हे लँकॅस्टर जातीचे बॉम फेकणारे विमान होय. ४६० क्रमांकाच्या ऑस्ट्रेलिअन स्क्वाड्रनला १९४२मध्ये ते देण्यात आले. या विमानाने सर्वांत अधिक विमानहल्ल्यांत भाग घेतला. १९४४मध्ये कलोनवरच्या हल्ल्यातून ते परत आल्यावर त्यास निवृत्त करण्यात आले. मात्र ऑस्ट्रेलिअन विमानदळातील ४०,००० वैमानिकांचे स्मारक म्हणून ते जतन करून ठेवण्यात आले आहे. स्मारकाच्या भिंतीच्या-वर स्टेनग्लासेस लावलेले आहेत. तेही सुंदर आहेत. स्मारकाच्या भिंतीवर पुढील गुणांचा निर्देश करण्यात आला आहे : रिसोर्स, कँडर, डिव्होशन, क्युरिऑसिटी, इंडिपडन्स.

कॅन्बराची उभारणी कशी झाली नि त्याचा विस्तार कसा होणार आहे ते दाखविणारे प्रदर्शन आहे. त्यात चित्रे आहेत, स्लाइडा आहेत, नि एक मोठे मॉडेल आहे. या मॉडेलविषयीची माहिती देणारी एक कॉमेंटरी सतत चालू असते. हे प्रदर्शन कॉमनवेल्थ पार्कमध्ये रेगाटा पॉइंटपाशी आहे. प्रदर्शनाच्या इमारतीच्या बाहेरच्या भिंतीवर 'कॅपिटल्स ऑफ द वर्ल्ड' अशी एक पाटी आहे. त्यात अॅथेन्स, लंडन, बॉन, वॉशिंग्टन, इत्यादींबरोबर चंदिगडचाही उल्लेख आहे.

रॉयल ऑस्ट्रेलिअन मिंट हे भेट देण्यायोग्य स्थान आहे. नाणी पाडण्याचे काम तळमजल्यावर होते नि वरच्या मजल्यावरच्या खिडक्यांच्या काचेतून ते आपल्याला पाहता येते. खिडक्या नऊ असून प्रत्येक खिडकीतून नाणेनिर्मितीची प्रक्रिया आपल्याला दिसते. तळमजल्यावर एक कक्ष आहे. त्यात ऑस्ट्रेलिअन नाण्यांचा इतिहास दाखविलेला आहे. शिवाय दुसऱ्या कपाटांतून निरनिराळ्या देशांची नाणी ठेवलेली आहेत. त्यात नेपाळचा रुपया, दक्षिण भारतातील प्राचीन सोन्याची नि रुप्यांची नाणी आहेत. भारताचे दहा

रुपयांचे नाणे आहे. त्यावर 'सबके लिये अन्न' हे वाक्य आहे. मुंबईच्या टाकसाळीत १९४३मध्ये ऑस्ट्रेलिअन ब्राँझ नाणी पाडण्यात आली होती. ती नाणी नि डाइज येथे आहेत. याविषयीची माहिती तिथल्या रक्षकाने दिली. हा मुळचा इंग्रज. मात्र त्याचा जन्म हिंदुस्थानात झाला होता. युद्धानंतर काही वर्षे त्याने आसाममधल्या चहाच्या मळयावर काम केले. पुढे तो ऑस्ट्रेलियात स्थायिक झाला.

कॅन्बराच्या दूतालयांचा विभागही फेरी मारण्यासारखा आहे. इथल्या काही राजदूतालयांचे वैशिष्टच म्हणजे त्यांच्या वास्तू स्वतःच्या परंपरांप्रमाणे बांधलेल्या आहेत. उदाहरणार्थ, थायलँडचे राजदूतालय जुन्या पद्धतीचे आहे. जपानी दूतालयात बोनसाई झाडे आहेत, इंडोनेशियन इमारतीपुढे द्वारपाल आहेत. दूतालयांच्या विभागात फेरी मारत असताना साहजिकच कोच भारतीय दूतालयासमोर थांबला. तेव्हा बरीच मंडळी आत गेली. मग तिथला एक अधिकारी भारतीय दूतालयाची नवीन वास्तू आम्हाला दाखविण्यासाठी आला. या वास्तूचे उद्‌घाटन श्रीमती गांधींनी नुकतेच केले होते. 'इंडिया दॅट इज भारत' यांच्या संमिश्र संस्कृतीचे एक अंग दाखविण्यासाठी भारतीय दूतालयाबाहेर काश्मिरमधल्या मोगल गार्डन्सची प्रतिकृती आहे.

ब्लॅक माउंटनवरचे टॉवर ही कॅन्बरातील आणखी एक प्रेक्षणीय वास्तू आहे. ते दोनशे मिटर उंच आहे. तिथे पोहोचण्यासाठी आपल्याला डोंगराच्या माथ्यावर जावे लागते. टॉवरच्या सज्जात जाण्यासाठी एक ऑस्ट्रेलिअन डॉलर शुल्क भरावे लागते. मग लिफ्टने वर जाता येते. रात्रीच्या वेळी सबंध कॅन्बराचे विहंगम रमणीय दृश्य आपणाला दिसते.

कॅन्बरापासून काही मैलांवर हिस्टॉरिक गोल्ड क्रिक होमस्टेड आहे. ऑस्ट्रेलियातील सहलीचा एक भाग म्हणून या ठिकाणी बार्बेक्यू लंच योजला होता. हे फार्मस्टेड फार मोठे आहे, नि त्यात उत्तम जातीच्या मेंढ्या होत्या. तिथल्या कर्मचाऱ्यांनी मेंढीच्या अंगावरची लोकर कशी कापतात याचे प्रात्यक्षिक दाखविले. काही वेळा मेंढीच्या अंगाला इजा होऊन रक्त येत असे. मांसाशन करणाऱ्या मंडळींना जेवण खूप पसंत पडले असे म्हणता येणार नाही. मग शाकाहारी पदार्थांविषयी काय बोलणार ? मात्र बीअर आणि स्वीट डिश असल्याने भोजनाचा समय अगदीच फुकट गेला नाही. जेवणानंतर तिथल्या एका माणसाने बुमरँग कसे फेकतात याचे प्रात्यक्षिक दाखविले. पण त्यापेक्षाही अधिक कौशल्याने हे शस्त्र हाताळले जाते याची

माहिती मी पूर्वी वाचली होती. जवळच जुन्या पद्धतीचे एक घर होते. आता त्याचा उपयोग लग्नसमारंभासाठी केला जातो. सूर्याच्या किरणांपासून उर्जा-निर्मितीचे जे नवीन तंत्र तयार झाले आहे त्याचा या घरात उपयोग केलेला दिसला. इथेच जवळच्या बागेत लहान कांगारू ठेवलेली होती. साहजिकच त्यांना खाण्यास देणे नि त्यांचे फोटो घेणे क्रमप्राप्त होते.

२३ ऑक्टोबरला आम्ही कॅन्बराहून ऑल्ब्युरीकडे जाण्यास निघालो. सकाळी लख्ख उन्ह होते. आकाश निळे असून त्यात पांढरे ढग तरंगत होते. हवा थंड होती. गेला आठवडाभर पाऊस पडल्याने हिरवी वनश्री अधिक सतेज दिसत होती. थोड्याच समयात मिचेलँगो – म्हणजे कॅन्बराचा दक्षिण विभाग – मागे पडला. हळूहळू रस्ता चढाचा झाला. मग एक घाटी आली. भोवताली थोड्या अंतरावर डोंगराळ प्रदेश होता. त्यावरची झाडी दाट नव्हती. मात्र युकिलिप्टसची झाडे विपुल होती. थोड्या वेळाने घाटी संपली. मग लहान ओढे लागले. जमिनीचा रंग पिवळसर होता. काही समयाने विलोच्या झाडांच्या रांगा लागल्या. मग उजव्या हाताला सरोवर आले. वाटेवर अधून मधून वस्ती दिसे. त्यात चारपाच घरे असत. काही समयाने डोंगरमाळ जवळ आली. रस्त्याला चढ लागला. आता दिसलेल्या वस्तीत जुनी तशीच अद्यतन घरे होती नि काही ठिकाणी पवनचक्क्याही दिसल्या. नंतर लागलेले मोठे मैदान हिरवेगार होते. त्यात मेंढ्या चरत होत्या. मैदानापलीकडे डोंगर होते. आणि रस्त्याच्या कडेला सुरूच्या झाडांची रांग होती. हे चित्र पुन्हा पुन्हा दिसले.

आता ब्रेडबो गाव लागले. गाव छोटे होते. त्यातल्या घरांची छपरे पत्र्यांची होती. एक हॉटेल होते नि रस्त्याला लागूनच पोस्ट ऑफीस होते. गाव पाठीमागे पडल्यावर रस्ता पुन्हा चढाचा झाला. मधेच एक छोटी नदी लागली. डाव्या हाताकडचे डोंगर बरेचसे बोडके होते, नि त्यांच्या पायथ्या-कडची मैदाने रूक्ष होती. एखाद दुसरे घर मधूनच दृष्टिपथात येई. असे घर पाहिल्यावर लोक एकलकोंडे जीवन कसे काय जगू शकतात असा प्रश्न मनात येतो. थोड्या समयाने हॅरी विल्सन क्रिक आली. ती मागे पडल्यावर न्यूएटा नावाची नदी ओलांडली. मग पुन्हा मोठे पठार आले. त्यात अधिक वस्ती होती नि ती पसरलेली होती. थोड्या वेळाने मोनॅरो काउंटी कॉन्सिलचे कार्यालय लागले. मग त्याच नावाचे रिसिव्हिंग स्टेशन दिसले. नंतर मार्लबरो मोटेल आले.

कुमा गावात आम्ही थोडा वेळ थांबलो. मोनॅरो प्रांतातले हे एक महत्त्वाचे गाव. इथली मॅरिनो लोकर फार प्रसिद्ध आहे. ऑस्ट्रेलियातला सर्वात उंच पर्वत म्हणजे कॉझिऑस्को. तो ७३१६ फूट उंच आहे. तिथे जाण्यासाठी कुमा हे जवळचे स्थानक आहे. येथून आम्ही परत वळलो नि नवीन हायवेने टुमुटकडे निघालो. थोड्या वेळाने दूरवर स्नोई माउंटनची रांग दिसू लागली. भोवतालचा प्रदेश डोंगराळ झाला नि रस्त्याला चढ लागला. भोवताली असंख्य झाडे वाळून पडलेली आढळली. पाण्याचा अभाव नि ड्राय रॉट यामुळे झाडे उन्मळून पडलेली आहेत अशी माहिती टेडने दिली. किती तरी वेळ हेच दृश्य दिसत होते.

सुमारे अर्ध्या तासाच्या प्रवासानंतर अॅडमिनबी गाव लागले. कुमापासून बत्तीस मैलांवर हे गाव आहे. येथे एक वेळ भूमीत सोन्याचे कण मिळाले. त्यामुळे काही काळ गावाला चलती आली. आता रस्त्याच्या बाजूंना मोडलेली लाकडाची गुरांची कुंपणे दिसली. मात्र माणसे नि गुरे त्यांच्या आसमंतातही नव्हती. आता पुन्हा घाट लागला. त्याच्या दोन्ही बाजूंना युकिलिप्टसच्या झाडांची दाट वने लागली. पण त्यातही वाळून पडलेली अनेक झाडे होती.

दूरवरच्या डोंगरांची शिखरे हिमाच्छादित होती. जवळच्या डोंगरांतही बर्फ पडलेला दिसत होता. डोंगरांच्या कपारीतून लहान लहान ओहोळ वेगाने वाहत होते. आता आम्ही घाटमाथ्यावर आलो. आणि डोंगरातून खाली जाणारा नागमोडी रस्ता दिसला. पलीकडे एक मोठी नदी वाहत होती. मग एक उद्ध्वस्त वस्ती लागली. तिथे किअँड्रा सब डेपोचे कार्यालय होते. येथे आठ दहा लोक राहतात नि हॉटेल चालवतात असे टेड म्हणाला. किअँड्रा हे खेडेगाव आहे. १८३४मध्ये येथे पहिली वस्ती झाली. पंधरा वर्षांनी पोलाक नावाच्या इसमाला येथे सोने सापडले. मग लोकांची रीघ लागली. जवळ जवळ पंधरा हजार लोक वस्तीला आले. पण काही काळाने सोने मिळण्याचे संपले. आणि वस्ती उठली. या डोंगरी प्रदेशात हिवाळ्यात हिमवर्षाव फार होतो. त्यामुळे स्की करण्याला लोक येतात येथे त्यांचा क्लब आहे.

आता रस्ता उताराचा झाला. आणि वळणावळणाला खोल दऱ्या दिसू लागल्या. त्यात गर्द झाडी होती. आणि तिच्यातून अधूनमधून नदीचे पात्र दिसत होते. थोड्याच समयात केल्व्हिंगो गाव दृष्टिपथात आले. त्याच्या

पलीकडे सरोवर होते. हे सर्व मागे टाकून आम्ही टालबिंगो धरणाकडे आलो. त्याची उंची ५३० फूट आहे. येथे मोठा जल-विद्युत प्रकल्प आहे. या भागात पाण्याचे मोठे दुर्भिक्ष्य असते. तेव्हा त्याचा प्रचंड साठा करणे नि त्याचा पुन्हा पुन्हा वापर करणे यावर इथे मोठा भर आहे. धरणाच्या कार्यालयात या प्रकल्पाची प्रतिकृती आहे. टालबिंगो धरणातले पाणी वीज निर्मितीसाठी वापरल्यावर ते खाली एका सरोवरात पकडले जाते आणि रात्री तीन टर्बाइन्सच्या सहाय्याने पंप करून ते टालबिंगो धरणात परत आणण्यात येते. हे काम कसे चालते ते या प्रतिकृतीमध्ये छोटया यंत्राच्या सहाय्याने दाखविले आहे. हा सगळा प्रदेश पूर्वी रूक्ष होता. या प्रकल्पामुळे येथे हरित क्रांती होत आहे.

आता भोवताली मैलीमैलांची हिरवी कुरणे लागली. डोंगरावरची झाडीही दाट होती. सगळा प्रदेश हिरव्यागार वृक्षराजीने नटलेला होता. हरित-तृणांच्या कुरणांतून काळया नि तपकिरी रंगाच्या गाई चरताना दिसल्या. थोडयाच समयाने टुमुट गाव आले. ते टुमुट नदीच्या काठावरच वसलेले आहे, आणि भोवतालच्या डोंगरमाळेला तेच नाव आहे. समुद्रसपाटीपासून नऊशे फूट उंच आहे. १८२४मध्ये ह्यूम येथून पुढे गेला. गावाची वस्ती सहा हजार आहे आणि ते टुमदार आहे. लोकर, मांस, तंबाखू, दूध, फळे, यांचा मोठा व्यापार येथे चालतो. पण सर्वांत मोठा उद्यम म्हणजे टिंबरचे कारखाने.

टुमुट गाव पाठीमागे पडल्यावर मागच्यापेक्षा झाडी दाट झाली. रस्ता मात्र बरा नव्हता. रहदारीही कमी होती. चारपाच मोटरी नि एक ट्रक जाताना दिसले. थोडया वेळाने एक चढ आला. तो ओलांडल्यावर एक दरी लागली. हिरवीचार होती. त्यात विखुरलेली गुरे चरत होती. हा प्रदेश कॅटल कंट्री आहे असे टेड म्हणाला. इथल्या कुरणांत नि त्यांच्या कडेलाही निळया छोटया फुलांचा बहर आलेला होता. ती वाऱ्याच्या झोतावर डुलत होती. हे चित्र बराच वेळ टिकले.

थोडया वेळाने टारकुटा हे छोटे गाव लागले. त्यानंतर प्रचंड मोठे मैदान आले. त्यातल्या कुरणातून पिवळया, लाल नि गुलाबी रंगांची फुले बहरलेली होती. मग एक छोटी नदी लागली. आणि विलोज झाडांच्या रांगा भेटल्या. आता होलब्रूक गाव आले. मुख्य रस्त्यात एक पाणबुडी ठेवलेली आहे. पहिल्या महायुद्धात लेफ्टनंट होलब्रुक याने पाणसुरूंग असतानाही आपली

पाणबुडी पाण्याखाली नेऊन डार्डानेल्समध्ये तुर्की नौका मेसेनडिये हिला टॉर्पेडो मारून बुडविली. त्याच्या सन्मानार्थ या गावाचे जर्मन टाऊन हे जुने नाव होते ते बदलून होलब्रूक ठेवण्यात आले.

आता रस्त्याच्या बाजूच्या कुंपणातून प्रथमच खूप संख्येत लाकडी गोठे दिसले. काही वेळाने थोड्या दूर अंतरावरची दोन तीन छोटी खेडी दृष्टि-पथात आली. पाच-पंचवीस घरांच्या वस्तीची असावीत. मग स्वीट वॉटर क्रीक या नावाचा ओढा लागला. यावेळी सूर्यप्रकाश लख्ख होता. हवा थंड होती. वातावरण विलक्षण निःशब्द होते. कुरणातून पुन्हा निळ्या फुलांची रेलचेल दिसली. डोळे सुखवणारे दृश्य होते. संध्याकाळचे साडेपाच वाजत असताना आम्ही ऑल्ब्युरीत शिरलो.

गाव रेल्वे जंक्शन आहे. मरे नदीच्या काठाशी ते वसलेले असून त्याची वस्ती वीस हजार असावी. येथून दहा मैलांवर मरे नदीवरचा ह्यूम डॅम आहे. ह्यूम नि हॉवेल भूमीमार्गे प्रवास करीत असताना या स्थळाकडून १८२४ मध्ये पुढे गेले. त्यांनी नदीचा प्रवाह जिथे प्रथम पाहिला तिथेच या गावाची पुढे स्थापना झाली. १८८१ मध्ये सिडनीहून लोहमार्ग येथे आला.

गाव मोठे आहे. आणि त्यातले रस्तेही विशाल आहेत. त्याच्यावरच्या इमारती नि त्या इमारतींवरच्या पाट्या पाहिल्या म्हणजे इथे कारखान-दारीचे युग उगवत आहे असे वाटते. टेडने सांगितले की, इथे लोकरीचा लिलाव होतो. शिवाय स्टॉक–एक्सचेंज आहेच. गावातील मुख्य रस्त्याने थोडे दूर गेले की, एक मोठी टेकडी येते. त्यावर वॉर मेमोरिअल आहे. येथून गावाचे मनोज्ञ चित्र दिसते.

न्यू साउथ वेल्सची सीमा ऑल्ब्युरीपाशी संपते. आणि शेजारच्या वोडोंगापाशी व्हिक्टोरिया प्रांताची सीमा सुरू होते. या दोन शहरांसाठी 'ट्वीन सिटी पोस्ट' हे दर बुधवारी निघणारे साप्ताहिक आहे. या दोन शहरांत ते मोफत वाटण्यात येते. त्याची एक प्रत आमच्या खोलीत होती. न्यू साउथ वेल्स नि व्हिक्टोरिया या दोन राज्यांतील लोहमार्गांचे गेज भिन्न आहेत.

आज सकाळी, म्हणजे २३ ऑक्टोबरला, आम्ही मेलबर्नकडे जाण्यास निघालो. मेलबर्न येथून १९१ मैलांवर आहे. कोचने थोडे अंतर कापल्यावर टेड म्हणाला की, व्हिक्टोरियात फळे वगैरे बाहेरून आणू देत नाहीत. तपासणी झाली तर त्या वस्तू जप्त होतात. तेव्हा हा प्रसंग केव्हा येणार

याची आम्ही वाट पाहिली. पण कोणीच आले नाही. उलट आम्ही वोडोंगा गावात मुक्तपणे फेरी मारली. 'वोडोंगा' या अॅबॉरिजिनल शब्दाचा अर्थ 'एडिबल नट' असावा असे म्हणतात. टिंबर, लोणी, दूध हे गावाचे प्रमुख उद्योग आहेत. येथेही वॉर मेमोरिअल आहे. गावातली घरे एकमजली नि लाल विटांची आहेत. घरांसमोरच्या वाटिकांमध्ये गुलाबाची फुले डवरलेली होती.

गावातून बाहेर पडल्यावर रस्त्याच्या दुतर्फा झाडी लागली. आज प्रथम घोडेस्वार पाहिला. नंतर शुष्क झाडे असलेला डोंगर दिसला. तो पाठीमागे पडल्यावर लहान घाट आला. तो पार केल्यावर एक सुंदर दरी आली. त्यात आखलेले रस्ते नि घरे सुबक होती. स्वित्झर्लंडमधल्या गावाची आठवण देणारे हे दृश्य होते. आता लाल शेंड्याचे गवत असलेले प्रचंड मोठे माळरान आले. रस्ता चांगला नव्हता नि डोंगरमाळेतून जात होता.

आजच्या प्रवासातले पहिले मोठे गाव बीचवर्थ होते. ते मेलबर्नच्या ईशान्येला येते. जवळच ओव्हेंन नदी आहे. तिच्या आसमंतात सोन्याच्या खाणी मिळाल्याने वस्ती एकदम वाढून गावाची भरभराट झाली. पण तो उद्योग काही काळाने मागे पडला. आता इथे टिंबरचे कारखाने आहेत. शिवाय रूबी, सफायर, हिरे, इत्यादी मौल्यवान खड्यांचा व्यापार हा इथला प्रमुख उद्योग आहे. तसेच तंबाखू, चामडे, सफरचंद, भुईमूग, बटाटे यांचेही येथे निर्मिती होते.

'वेलकम टू बीचवर्थ' अशी एक पताका गावात शिरताना दिसली. 'ड्रायव्हिंग इन बीचवर्थ इज ड्रायव्हिंग इन बॅक टाइम्स' असे म्हटले जाते. डोळ्यांना प्रथम भेटतात ती दगडांची जुनी घरे, जुना तुरूंग, ओटे नि सज्जे असलेली काही घरे, लाकडी झोपडी, छोटे बॅप्टिस्ट चर्च, इत्यादी. अर्थात नवीन घरे होत आहेत. पण त्या कामाला वेग नाही.

गावातून बाहेर पडल्यावर दूरवर डोंगरमाळ दिसली. डोंगरांची शिखरे काळसर निळी होती. रस्त्याच्या दुतर्फा झाडे होती, नि त्यांच्या पलीकडे विशाल मैदाने होती. अर्ध्या तासाच्या प्रवासानंतर वँगाराट्टा हे गाव आले. गावाचे नाव अॅबॉरिजिनल असून त्याचा अर्थ नद्यांचा संगम होणारी जागा असा आहे. इथल्या मेरिआवा पार्कच्या बाहेर एक दगडाचे स्मारक आहे. त्यावर लिहिले होते की, या जिल्ह्याच्या पहिल्या रहिवाश्यांबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी ही शिला उभारली आहे. गावाची शताब्दी १९३८मध्ये

साजरी करण्यात आली. टेडच्या सांगण्याप्रमाणे गावात वेगाने यंत्रउद्योग वाढत आहेत. वुलन मिल नि प्लास्टिकचे कारखाने हे या गावाचे वैशिष्टच. या शिवाय गहू, दूध, लोणी, वगैरे गोष्टींचा उद्यम आहेच.

आता विस्तीर्ण मैदाने दिसू लागली. आणि त्यांना कुंपणे होती. मग उजव्या हाताला सरोवर आले. रस्ते विशाल असून त्याच्या मध्यभागी झाडे होती. वाटेत बेनाला गाव लागले. या गावाचे वर्णन 'गुलाबाचे नगर' असे करतात, नि इथे गुलाबाचे प्रदर्शन भरते. गावातली कोर्ट हाऊसची छोटी इमारत आधुनिक रचनेची दिसली. भोवतालचा प्रदेश सपाट मैदानाचा दिसला. त्यात बरीच झाडी नि अधूनमधून डोंगर आढळले. आता सेवन क्रिक्स हे लहान गाव आले. ते पाठीमागे पडल्यावर कोचने मोठा रस्ता सोडला नि तो लहान रस्त्याने मिचेलटन वाईनयार्डकडे धावू लागला. वाटेत एक छोटी नदी लागली. तिच्यावरचा सेतू लहान नि जुना होता. अर्ध्या तासाने मिचेलटन आले.

मद्याच्या कारखान्याकडे जाण्यासाठी आपल्याला द्राक्षांच्या मोठ्या मळ्यांतून जावे लागते. हे मळे पाचशे एकरांत पसरलेले आहेत. कार्यालय खूप मोठे आहे. त्याच्या एका बाजूला मद्य विकण्याची सोय आहे. या कारखान्यातून फिरणाऱ्या लोकांनी व्यवस्थित कपड्यांत असले पाहिजे अशी तेथे सूचना होती. अनवाणी तसेच पोहण्याच्या कपड्यातल्या व्यक्तीला येथे प्रवेश बंद आहे. या सूचना-फलकाच्या पलीकडे दोन जुन्या घोड्यांच्या बग्या आहेत. त्यांना सोनेरी नि रुपेरी कडा आहेत.

कारखान्याची माहिती देण्यासाठी गाईड होती. कारखान्याची स्थापना १९६५ मधली. मार्च महिन्यात यंत्राच्या सहाय्याने द्राक्षांची कापणी होते. मग केमिकल यिस्टच्या सहाय्याने त्याला आंबवण्यात येते. लाल नि शुभ्र रंगांची दोन जातींची मद्ये तयार होतात. खाली भुयार असून त्यात पिंपे आहेत. त्यांच्यांत ही मद्ये ठेवण्यात येतात. मद्य चवदार व्हावे म्हणून दोन वर्षे किंवा अधिक काळ त्याला पिंपात ठेवण्यात येते. या मद्याच्या रोज हजार बाटल्या भरल्या जातात. इथले एक पिंप २०२४मध्ये उघडले जायचे आहे. त्यात ऑस्ट्रेलिअन जीवनाच्या कथा सांगणाऱ्या गोष्टी ठेवलेल्या आहेत. खाली एका भागात चॅपेल आहे. तेथे सर्व पंथांच्या लोकांना लग्न लावून घेण्याची परवानगी आहे. बाहेर अॅशटॉन टॉवर आहे. त्यावरून मातकट पाण्याची नदी, दूरवरचे डोंगर, काही ठिकाणची गर्द झाडी, द्राक्षाचे

दूरवर पसरलेले मळे, असे चित्र दिसते. शिवाय या बिंदूपासून कॅन्बरा, सिडनी, मेलबर्न, इत्यादी गावे किती दूर आहेत याचीही माहिती दिलेली आहे. दुसऱ्या बाजूला छोटे प्राणी संग्रहालय आहे. भोजनगृहही तळघरात आहे. पाचशे माणसे बसतील इतके ते मोठे आहे. खाद्यपदार्थ रुचकर होते. आणि ते स्वतःच्या हाताने घेण्याची सोय होती. फक्त मद्यासाठी ऑर्डर द्यावी लागे. लाल रंगाचे मद्य चवदार वाटले.

आता कोच मेलबर्नच्या दिशेला निघाला. प्रथम तो गोलबर्न व्हॅली हायवेने धावला. नंतर तो ह्यूम हायवेवर आला. सुमारे अर्ध्या तासाने सायमोर गाव आले. पहिल्या महायुद्धात येथे एक सैनिकतळ स्थापन करावा अशी लॉर्ड किचनेरची सूचना होती. हे गाव मागे पडल्यावर रस्त्याच्या दोन्ही बाजूंना मैलोमैल हिरवी मैदाने लागली. किती तरी वेळ हाच देखावा दिसत होता. मग दूरवर टुमदार घरे दिसू लागली. मेलबर्नच्या उपनगरातील ती घरे होती. आता फोर्ड कंपनीचा कारखाना लागला. थोड्याच समयात कोच मेलबर्नमध्ये शिरला नि आम्ही सदर्न क्रॉस हॉटेलपाशी येऊन उतरलो.

मेलबर्न व्हिक्टोरिया प्रांताची राजधानी असून ते आता मोठे औद्योगिक केंद्र झाले आहे. गावाची स्थापना दीडशे वर्षांपूर्वी झाली आणि ब्रिटनचे भूतपूर्व पंतप्रधान मेलबर्न यांचे नाव त्याला देण्यात आले. गावाची उभारणी पद्धतशीर केलेली असून रस्ते विशाल आहेत आणि ज्या स्थायिकांनी गावाच्या उभारणीत प्रारंभी भाग घेतला त्यांची नावे रस्त्याला देण्यात आली आहेत. फिट्झरॉय गार्डन्स, फ्लॅगस्टाफ गार्डन्स, ट्रेझरी गार्डन्स, कार्लटन्स गार्डन्स अशी अनेक रमणीय उद्याने येथे असल्याने ' सिटी ऑफ गार्डन्स ' असे त्याला म्हणतात. गावातली गर्द झाडीची अशी उद्याने पाहिल्याशिवाय त्यांचे महत्त्व लक्षात येत नाही. गावात अजूनही ट्रॅमगाड्या आहेत. त्यांतल्या काहींना चित्रविचित्र रंग दिलेले आहेत. या ट्रॅमगाड्यांतून प्रवास करण्यासाठी दोन डॉलरचे तिकिट काढले की, ते आपल्याला दिवसभर वापरता येते.

सेंट किल्डा हा मरीन ड्राइव्हसारखा भाग आहे. तिकडे ट्रॅमने जाता येते. स्पेन्सर स्ट्रीट, मिल स्ट्रीट, पॅटरसन स्ट्रीट यावरून पार्क स्ट्रीटकडे अखेरच्या थांब्यावर ट्रॅम आली. वाटेत रग्बी, क्रिकेट, या खेळांच्या स्मारकशिला, जुनी हॉटेले आपल्याला भेटतात. लिमेरिक आर्म्स हॉटेल हे १८६३ मधले आहे, तर गोल्डन गेट हॉटेल १८५३ मधले आहे. या रस्त्यावरून जाताना आपल्याला जुन्या लंडनमधून जात आहोत असा भास होतो. लाल विटांची

एकमजली नि दुमजली घरे रांगेने दिसतात. काही ठिकाणी विशेषतः कोपऱ्यांवर जुनी घरे पाडून तेथे दहा-वीस मजल्यांच्या इमारती उभ्या राहत आहेत. शहराचा हा भाग जुना असूनही अती स्वच्छ होता. समुद्राच्या काठाकडे जाताना दोन्ही महायुद्धांत कामास आलेल्या सैनिकांचे स्मारक भेटते. किनाऱ्याकडे आल्यावर आपल्याला मुंबईच्या हाजी अल्लीची थोडी आठवण येते. समुद्रात गेलेला एक रस्ता असून त्याच्या शेवटी एक छोटी इमारत आहे. पाणी इतके स्वच्छ होते की, खालचा तळ दिसत होता. अनेक लहान होड्या तरंगत होत्या, काही यांत्रिक नावा ये-जा करीत होत्या, आणि दूरवर अजस्र आगनावा नांगरलेल्या होत्या. मेलबर्नचे पोर्ट फिलिप हे दक्षिण किनाऱ्यावरचे अत्यंत गजबजलेले बंदर समजले जाते.

सिटी स्क्वेअर हे अत्यंत मनोज्ञ स्थळ आहे. त्याची नवीन आखणी करण्यात येऊन ते काम नुकतेच पुरे झाले होते. या चौकात टाऊन हॉलपासून ते सेंट पॉल कॅथिड्रलपर्यंतचा भाग अंतर्भूत होतो. येथे छोटा धबधबा, त्याच्या भोवताली लहान उद्यान, एक मोठा पडदा, गाण्यासाठी एक मंच, दुकाने नि उपाहारगृहे आहेत. शिवाय नवीन प्रदेशाच्या शोधात बळी पडलेले बर्क नि विल्स या दोघांचे पुतळे आहेत. सेंट पॉलज कॅथिड्रल हे फ्लिंडर लेनच्या तोंडाशीच आहे. त्याची रचना गोथिक असून त्याचा शिल्पकार विल्यम बटरफिल्ड होता. कॅथिड्रलमध्ये गेल्यावर माहिती देण्यासाठी एक गाईड होती आणि तिच्याजवळ सांप्रदायिक पुस्तके नि माहिती-पुस्तकेही होती. पण बरेच वेळा जे दिसते तेच इथेही दिसले. म्हणजे आमच्यासारखे हौशी प्रवासी सोडले तर चर्चमध्ये जवळजवळ कोणीच नव्हते.

सदर्न क्रॉस हॉटेलच्या पूर्वेकडे थोड्या अंतरावर पार्लमेंट हाऊस येते. दोन्ही सभागृहांत हिंडताना तेथील लाकडावरचे कोरीव काम, मखमलीच्या खुर्च्या वगैरे पाहिल्यावर ब्रिटिश पार्लमेंटची आठवण येते. पार्लमेंट हाऊसच्या बाजूने जाणारा मॅकऑर्थर स्ट्रीट पाठीमागे टाकून एक चौक ओलांडला की, फिट्झरॉय गार्डन्स येतात. त्यात दोन पाहण्यासारख्या गोष्टी आहेत. एक कॉन्झर्व्हेटरी. त्यात विभिन्न रंगांच्या फुलांची झाडे आहेत. या फुलांचे रंग किती मनोहारी होते याची कल्पना ही फुले डोळ्यांनी पाहिल्याशिवाय किंवा त्यांची कलरस्लाइड पाहिल्याशिवाय येणार नाही. दुसरी गोष्ट म्हणजे कॅ. कुकची झोपडी. कॅप्टन कुकने ऑस्ट्रेलिया खंडाचा शोध लावला. त्यामुळे ऑस्ट्रेलियन गौरकाय लोकांना त्याच्याविषयी कृतज्ञता वाटणे

स्वाभाविक आहे. १९४३मध्ये कुकचे यॉर्कशायरमधले घर इकडे आणून ते उभे करण्यात आले.

'कुक्ज् कॉटेज' हे दुमजली छोटे घर आहे. व्हरांड्यात बाक नि बाग करण्याची अवजारे आहेत. डाइनिंग रूममध्ये तीन खुर्च्या नि टेबल आहे. दोन मेणबत्त्या आहेत. पलीकडे उबेसाठी शेगडी आहे. एक कपाट आहे, भांडी आहेत आणि एक छोटी कात्री आहे. या खोलीला एकच खिडकी आहे. पलीकडे एक लहान खोली आहे. त्यात छोटा पलंग आहे, नि वरती दिवा आहे. वरच्या मजल्यावर डाव्या हाताला पलंग आहे. आतल्या खोलीत एक डबल बेडचा पलंग आहे. तसेच लहान टेबल नि खुर्च्या आहेत. शिवाय पाळणाही आहे. खोलीला छोटया खिडक्या आहेत. इतरही काही वस्तू मांडलेल्या आहेत. खोलीत कोणालाही प्रवेश करता येत नाही. आणि कोण काय करीत आहे यावर लक्ष ठेवण्यासाठी 'बाहेर क्लोज सर्किट टी. व्ही. आहे' अशी सूचना आहे.

खालच्या मजल्यावरच्या दुसऱ्या खोलीत कुकच्या जीवनाविषयी माहिती आहे. शिवाय अकरा चित्रे आहेत. त्यात कुकने केलेल्या जलपर्यटनांची माहिती आहे. एका चित्रात त्याचा मृत्यू दाखविला आहे. स्टेबलमध्ये एक दगडी स्तंभ आहे. मेट्रन – इन – क्लिव्हलँड या पॅरिश चर्चमध्ये कुकचा बाप्तिस्मा झाला. त्याची त्या स्तंभावर नोंद आहे. तो स्तंभ त्या पॅरिशने व्हिक्टोरिआ प्रांताला भेट दिला.

मेलबर्नमधून यारा नदी वाहते. ती गढूळ आहे. त्यामुळे तिचा तळ वरती आहे असा या नदीविषयी विनोद केला जातो. ही नदी ओलांडली की, किल्डा पथावरचे व्हिक्टोरिया गार्डन्स येते. या उद्यानात फ्लॉवर क्लॉक आहे. हे घड्याळ स्वित्झर्लंडच्या घड्याळ–निर्मात्यांनी मेलबर्न गावाला नोव्हेंबर १९६६मध्ये भेट दिले.

या उद्यानाच्या समोरच्या भागाकडे नॅशनल गॅलरी ऑफ व्हिक्टोरिया येते. तिच्या तळमजल्यावर अनेक विभाग आहेत. त्यात बुक शॉप, कॅफेटेरिआ, इत्यादी आहेतच. पण एक विभाग आशियाई कलेचा आहे. इथे प्रारंभी दिसतो तो बुद्धाचा पुतळा. त्याच्या पलीकडे सुंदर चिनी लँडस्केप्स आहेत. भारतीय विभागात राजस्थानमधली मिनिएचर पेंटिंग्ज आहेत. तसेच तिबेटमधली चित्रे आहेत. शिवाय गणपती, महाकाली, शिव यांच्या मूर्ती आहेत.

पहिल्या मजल्यावर प्रिहिस्टॉरिक आर्ट ऑफ मेक्सिको नि गुएटमाला या देशांतील कलावस्तूंचे प्रदर्शन आहे. शिवाय काचेच्या वस्तूंचे प्रदर्शनही मनोहर आहे. त्या हिरव्या, काळ्या नि लाल रंगांतल्या काचेच्या वस्तू आहेत.

दुसऱ्या मजल्यावर युरोपीय कलेचे प्रदर्शन आहे. त्यात टिशिअनचे 'फ्रॉन्सिस्कन फ्रिआर वुइथ बुक', 'लॅमेंटेशन ओव्हर डेड ख्राईस्ट', पोसिनचे 'क्रॉसिंग ऑफ द रेड सी', गेन्सबरोचे 'ऑफिसर ऑफ द रेजिमेंट', रेनॉल्डचे 'लेडी फ्रान्सिस फिच', टर्नरचे 'व्हयू अॅट द माऊथ ऑफ थेम्स', रोझाचे 'रोमँटिक लँडस्केप्स', सिसीचे 'द फाइंडिंग ऑफ द मोझेझ', डेव्हिड टेनिअरचे 'द स्किटल प्लेअर्स' नि रेंब्रॉचे 'सेल्फ पोर्ट्रेट'– ही चित्रे लक्षात राहतात.

ऑस्ट्रेलिअन कलेचे दोन विभाग आहेत. हिस्टॉरिकल नि मॉडर्न. त्यातली हिस्टॉरिकल विभागातली काही चित्रे प्रेक्षणीय आहेत. सर जॉन लाँगस्टाफचे लाल रंगातले जिपलँड– यात जंगलात आग लागली आहे, घोड्यावरून एक जण पळत आहे, मुले घेऊन बायका निघाल्या आहेत असे चित्र आहे– मॅक्समुलरचे 'फार्म हाऊस' 'अरायव्हल ऑफ बर्क', 'विल्स अॅट कुपर्ज क्रीक', टॉम मोबर्टचे 'शिप शिअरिंग', ही विशेष लक्षात राहतात.

तिसऱ्या मजल्यावर छायाचित्रांचे प्रदर्शन आहे. ली प्राइज लँडर याने ऑस्ट्रेलियातून प्रवास करताना जी चित्रे घेतली त्यांचे लांबलचक प्रदर्शन आहे. ब्रिस्बेन, सिडनी, मेलबर्न या गावांची चित्रे, नुसती झाडे, दूरवर गेलेला मनुष्य नि एक रस्ता अशी काही चित्रे विशेष लक्षात राहतात.

याच मजल्यावरची लक्षात राहणारी गोष्ट म्हणजे, टाकून दिलेल्या गोष्टींतून म्हणजे फेल्ट, लोकर, दोर वगैरेंच्या सहाय्याने एका बाईने तयार केलेली चित्रे. त्यासाठी शिवणयंत्र, कात्र्या वगैरे ज्या वस्तूंचा वापर केला होता त्याही येथे आहेत. ही चित्रे प्रेक्षणीय आहेत.

मेलबर्न आल्यावर तिथल्या क्रिकेटच्या मैदानावर गेले नाही असे कसे होईल ! सुदैवाने क्लबच्या एका सभासदाच्या सहाय्याने आम्हाला आत जाता आले. एके ठिकाणी मेलबर्न ऑलिंपिक्समध्ये ज्यांनी विजय मिळविले त्यांची यादी आहे. हिंदुस्थानचे नाव केवळ हॉकीमुळेच तिथे आहे. आत ऑनर्स लिस्ट आहे. गेल्या शंभर वर्षांत जे क्रिकेटचे सामने झाले त्यांची यादी आहे. जिन्यापाशी ऑस्ट्रेलिया नि वेस्ट इंडीज यांच्यात 'टाय' झाला

त्या सामन्याचे चित्र आहे. त्यात हॉल, सोबर्स, कन्हाय, वगैरे खेळाडूंनी हर्षाने उडी मारलेली दिसते.

इथल्या बोटॅनिकल गार्डन्सकडे जाताना वाटेत नदीच्या शेजारी इलेक्ट्रिकच्या शेगड्या दिसल्या. पैसे टाकले की, त्या पेटतात. त्यावर मांस भाजून किंवा तळून घेता येते. उद्यानातच ' ल ट्रोबर्ज कॉटेज ' आहे. ल ट्रोबर्ज या पहिल्या राज्यपालाने फर्ग्युसन नावाच्या जहाजातून ही कॉटेज इंग्लंडहून आणली आणि पुढे ती येथे उभी केली. १८३९ ते १८५४ या काळातले हे पहिले गव्हर्नमेंट हाऊस होते. या ऐतिहासिक माहात्म्यामुळे या वास्तूला नॅशनल ट्रस्टतर्फे जतन करण्यात येत आहे.

येथूनच थोड्या अंतरावर किल्डा स्ट्रीटच्या जवळ ' श्राइन ऑफ रिमेंब्रन्स ' आहे. पहिल्या महायुद्धात व्हिक्टोरिया प्रांतातले १ लाख १६ हजार लोक लढले. त्यातले १८ हजार सैनिक कामास आले. तेव्हा त्यांच्या स्मरणार्थ हा श्राइन बांधण्याचे १९२१मध्ये ठरले. पुढे आराखडा तयार होऊन वास्तू बांधण्यासाठी सार्वजनिक निधी गोळा करण्याचे ठरले. या निधीसाठी शाळेच्या मुलांनी १८ हजार पाउंड जमा केले. तेव्हा मुलांचे कौतुक म्हणून वास्तूच्या पूर्व नि पश्चिम भागांकडे बालकांचे पुतळे आहेत. १९३४मध्ये या श्राइनचे उद्घाटन झाले. पुढे दुसऱ्या महायुद्धातील सैनिकांसाठी त्यात भर घालण्यात आली.

श्राइन एका उंचवट्यावर बांधलेला आहे. आणि भोवतालच्या झाडीतून त्याच्याकडे जाणारे शुभ्र प्रस्तरातले पथ आहेत. त्याचा दर्शनीय भाग मुंबईच्या टाऊन हॉलसारखा आहे. शिखरासारखा भाग मंदिरासारखा दिसतो. या श्राइनचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक वर्षी ११ नोव्हेंबरला ठीक अकरा वाजता सूर्याची किरणे शिखराकडे ठेवलेल्या भोकातून श्राइनच्या मध्यभागी पडतात.

ऑस्ट्रेलियाची परंपरा जेमतेम दोनशे वर्षांची आहे. पण ती जपण्याचा एक स्तुत्य उपक्रम चालला आहे. त्याचा एक भाग म्हणजे मेलबर्नचा मेरीटाइम म्युझिअम. पोली वुडसाइड् हे तीन शिडांचे जहाज आहे. १८८५ मध्ये बेलफास्टच्या गोदीत ते बांधले गेले, आणि १९६२पर्यंत ते कोळसा वाहण्याचे काम करीत होते. आता या जातीची जहाजे कुठेही दिसत नाहीत. तसेच अशा जहाजांवर काम करणारी खलाश्यांची पिढीही संपत आली आहे. तेव्हा नॅशनल ट्रस्ट ऑफ ऑस्ट्रेलियाने (व्हिक्टोरिया) या जहाजाचे

जतन करावयाचे ठरविले. त्याचे कारण देताना असे म्हटले आहे की, ज्या जहाजांनी ऑस्ट्रेलियात वसाहती होण्यास सहाय्य केले त्यांना जपून ठेवणे आवश्यक आहे. पुढील पिढ्यांतील लोकांना त्यांच्या डेकवरून चालण्याची संधी मिळाली पाहिजे.

ओल्ड ड्यूक्ज् अँड ओर्स डॉकमध्ये पोली वुडसाइडला ठेवण्यात आले आहे. शेजारीच मेरीटाइम म्युझिअम आहे. ओरिएंटल लाइन्सची ओमरा, नेल्सनची व्हिक्टरी, गोल्डन हाइंड, अशा प्रसिद्ध जहाजांच्या प्रतिकृती येथे ठेवलेल्या आहेत. तसेच पी. अँड ओ. कंपनीच्या चुसान, हिमालया, इत्यादी ज्या नावाजलेल्या आगनावा होत्या त्यांची चित्रे येथे ठेवलेली आहेत जवळच्या खोलीत शिपराइट शॉप आहे. छोटी जहाजे बांधण्याचे काम कसे चालते याची त्यावरून कल्पना येते.

मेलबर्नच्या दक्षिणेला १२० कि. मिटर्सवर किनाऱ्याजवळ फिलिप आयलँड येते. या बेटाचा शोध १७९८मध्ये जॉर्ज बास या व्यक्तीने लावला. मेलबर्नहून तिथे पोहोचायला दोन तास लागतात. हे पर्यटन केंद्र आहे. गाइनिक कॉन्फरन्ससाठी आलेल्या डॉक्टरांसाठी या बेटाची सहल आयोजित करण्यात आली होती. आणि त्यासाठी उत्तम कोचेस आरक्षित केलेले होते. या कोचचे नवीन वैशिष्टय म्हणजे त्यात टॉयलेटची सोय होती. दुपारी दोनच्या सुमारास आम्ही तिकडे जाण्यास निघालो. हळूहळू गाव मागे पडले. मग कोच डांडेनाँग रस्त्याने धावू लागला. थोड्या वेळातच डांडेनाँग गाव आले. ते सुटल्यावर कोच जिप्सलँड हायवेने जाऊ लागला. आता क्रॅनबोर्न गाव आले. इथे घोड्यांच्या तसेच कुत्र्यांच्या शर्यती होतात. भोवतालचा प्रदेश सपाट होता. दूरवर डोंगर दिसत होते. अल्प समयातच टुराडिन गाव आले. इथली घरे टुमदार होती. आता मोठी कुरणे आली. त्यात काळ्या नि तपकिरी रंगांच्या गाई चरताना दिसल्या. झाडीही दाट झाली. आणि दूरवर समुद्र दिसू लागला. काही वेळाने कुविरूप गाव आले. हा प्रदेश दलदलीचा होता. पण तो भरून काढण्यात आला. येथे उत्तम दुग्ध व्यवसाय चालतो. आता कोच बास हायवेने जात होता. समुद्र किनाऱ्याने हा हायवे जातो. थोड्या वेळाने कोचने हायवे सोडला नि लहान रस्त्याने तो जाऊ लागला. पाहता पाहता कोच फिलिप आयलँडमध्ये शिरला.

प्रारंभी कोच कोआला रिझर्व या स्थानापाशी थांबला. कोआला प्राण्याच्या रक्षणासाठी ही दाट झाडीची विस्तीर्ण जागा मुक्रर केलेली आहे. येथे

निलगिरीच्या झाडांच्या वरच्या भागात कोआला बसलेले असतात. ते फक्त रात्री खाली उतरतात. इथे ते खूप संख्येत आहेत. आम्ही त्यांना पाहण्यासाठी थोडी वणवण केली. पण आम्हाला फोटो घेण्यापुरता एकच दृष्टीस पडला.

बेरी बीच या रस्त्यावर 'द वुल सेंटर' नावाचे एक मोठे दुकान, खानावळ, नि कुरण आहे. दुकानात लोकरीच्या नि चामड्याच्या वस्तू मिळतात. कुरणामध्ये मेरिनो, लिंकन वगैरे जातींच्या मेंढ्यांचे प्रदर्शन आहे. तिथेच लोकर कापण्याचे नि विणण्याचे काम कसे होते तेही पाह्यला मिळते. खानावळीत – वुलशेड ग्रीलमध्ये – शाकाहारी नि मांसाहारी पदार्थांचे भोजन मिळते. इथले घरी बनवलेले पाव आणि सूप विशेष चवदार वाटले.

फिलिप बेटाच्या टोकाला गेले की, तेथून पॅसिफिक महासागराचे अथांग चित्र दिसते. इथला समुद्रकिनारा नागमोडी नि कापलेला आढळला. पाण्याचा रंग निळसर होता. गार वारा सुटलेला होता. सीगल पक्ष्यांचे थवे उडून समुद्राकडे जात होते नि पुन्हा किनाऱ्याकडे परत येत होते. येथे समुद्रातल्या खडकांवर सील येऊन बसतात. पण यावेळी ते नव्हते. हळूहळू सूर्य कलू लागला. आणि त्याचे बिंब क्षितिजापाशी समुद्राला चिकटले. मग आम्हीही परतीचा मार्ग धरला.

परतीच्या रस्त्यावर सर्फ बीच असे स्थळ आहे. तिथे जाण्याचा रस्ता आखलेला असून त्याला दोन्ही बाजूंना कुंपण आहे. किनाऱ्याकडे एक उंच-वट्याचा भाग आहे. तो मंचासारखा तयार केला आहे. आणि तिथेही कठडे केलेले आहेत. इथे येईपर्यंत सूर्यास्त झाला होता. हजार-दीड हजार पर्यटक तरी इथे जमले होते. आम्ही त्यांच्यांत जाऊन मिसळलो. थोड्या वेळातच मायक्रोफोनवरून सूचना आली : काही समयानंतर छोटे पेंग्विन्स समुद्रातून किनाऱ्याकडे परत येऊ लागतील. मोठे प्रकाशझोत लावलेले आहेत. तरी कृपा करून कॅमेऱ्याचा फ्लॅश लाइट वापरू नका. ती कृती दंडनीय आहे.

आता सगळे जण उत्सुकतेने किनाऱ्याकडे लक्ष लावून बसले. सूर्यास्त होऊन अंधार होऊ लागला होता. कोठेही हालचाल दिसत नव्हती. इतक्यात दोन-चार पेंग्विन्स दूर अंतरावर पाण्यातून बाहेर येताना दिसले पण ते तिथेच थांबले. पाच-एक मिनिटांनी आणखी काही आले. नंतर ते सगळे किनाऱ्याकडे चालू लागले. मग त्या पसरलेल्या किनाऱ्यावर चार-पाच जागी गटागटांनी पेंग्विन पाण्याबाहेर आलेले दिसले. साहजिकच मनात प्रश्न आला, इतक्या कमी संख्येच्या पेंग्विन्सना पाहण्यासाठी इतकी दगदग इतक्या

मोठ्या संख्येच्या लोकांनी करावी काय ? पण हा प्रश्न मनात आला नि तिथेच जिरला. कारण एकाएकी आवाज सुरू झाला नि शेकडो पेंग्विन्स गर्दीने पाण्याबाहेर आले नि किनाऱ्याकडे लगबगीने चालू लागले.

जेमतेम दोन फूट उंचीचा हा प्राणी असावा. पण त्याच्या शरीराच्या रचनेमुळे त्याचे चालणे थोडे डौलदार होते. आता एका छोट्या लाटेसारखेच ते किनाऱ्याकडे येऊ लागले. येताना ते आवाज करीत होते. किनाऱ्याकडे झाडीतल्या बिळांच्या तोंडाशी त्यांची पिले त्यांच्या आगमनाची वाट पाहत होती. हे पेंग्विन्स जसे झाडीच्या जवळ आले तसे त्यांच्या चित्कारांनी भोवतालचे वातावरण भरले. यात जास्त आवाज पेंग्विन्सचा होता का पिलांचा होता हे सांगणे कठिण. या चित्काराला फक्त लाटांच्या नि फ्लॅश बल्बच्या आवाजाचे पार्श्वसंगीत होते. हे प्राणी झाडीत शिरताच 'पेंग्विन्स परेड'चा खेळ संपला नि भिन्न देशांतले शेकडो पर्यटक आपापल्या कोचांमध्ये बसून मेलबर्नच्या दिशेला निघाले.

ऑस्ट्रेलियाच्या शासनामध्ये सहा राज्यांचा अंतर्भाव होतो. न्यू साउथ वेल्स, व्हिक्टोरिआ, क्विन्सलँड, साउथ ऑस्ट्रेलिया, वेस्टर्न ऑस्ट्रेलिया नि टासमेनिआ. यांपैकी टासमेनिआ हे मोठे बेट आहे. आणि ते मेलबर्नच्या दक्षिणेला येते. ऑस्ट्रेलिया खंड नि टासमेनिआ यामध्ये बास स्ट्राइट आहे. टासमेनिआचा शोध १६४२मध्ये डच दर्यावर्दी अॅबेल टासमन याने लावला, नि हॉलंडच्या नावाने त्या बेटाचा ताबा घेतला. पण १८०२मध्ये ब्रिटिशांचे वर्चस्व त्यावर बसले. मग तिथे गोऱ्या लोकांच्या वस्तीला प्रारंभ झाला. गोऱ्या लोकांच्या वसाहतीच्या बाबतीत न्यू साउथ वेल्सनंतर टासमेनियाचा क्रमांक लागतो. टासमेनिआला 'अॅपल आइल' म्हणजे सफरचंदाचे बेट हेही नाव आहे. कारण ऑस्ट्रेलियातील सफरचंद निर्मितीचा बराच मोठा वाटा टासमेनिआकडे जातो. हा प्रदेश डोंगराळ आहे. शिवाय त्यात खनिज धातू बरेच आहेत. या बेटातली होबार्ट नि लॉन्सेसटन ही दोन महत्त्वाची गावे आहेत. त्यांतले होबार्ट ही राजधानी आहे.

१९५२मध्ये स्पेनचा प्रवास करताना मिसेस फेथ लेटनचा परिचय झाला होता. १९७१मध्ये आम्ही ऑस्ट्रेलियात आलो होतो. पण फेथ लॉन्सेस्टनला रहात असल्याने तिची भेट झाली नव्हती. या वेळी 'मेलबर्नपर्यंत तू येत आहेस तर पुढे लॉन्सेस्टनला आमच्याकडे ये,' असे तिचे पत्र आल्याने दोन दिवसांसाठी तिकडे जाण्याचे आम्ही ठरवले. दिनांक २९ला संध्याकाळी

तिकडे जाण्यास निघालो. सातच्या सुमारास विमान धावू लागले. काही क्षणात त्याने उंची गाठली. मग खाली विस्तृत पसरलेले मेलबर्न दिसले. थोडे धुके होते. तरीही मेलबर्नचे क्रिकेटचे मैदान, सरोवरे दिसली. परंतु थोडेच समयात हे चित्र अदृश्य होऊन खाली समुद्र दिसू लागला. नंतर पांढरे ढग आले. त्यामुळे खालचे चित्र अस्पष्ट झाले. तसेच धुसर वातावरणामुळे पूर्व क्षितिजाकडचे दृश्यही अस्पष्ट झाले होते.

साडेसात वाजता समुद्र किनारा दिसला. मग समुद्र मागे पडला. आता सूर्यप्रकाश लख्ख झाला. खाली शेते नि हिरवीगर्द झाडी दिसू लागली. मग कुरणे, छोटे छोटे जलाशय, कालवे दृष्टिपथात आले. पूर्वेकडचे डोंगर काळसर झाले होते. सूर्यास्त होत असल्याने त्याची किरणे पिवळसर केशरी झाली होती. पावणेआठला लॉन्सेस्टन आले. फेथ नि तिचा नवरा टॉम दोघेही विमानतळावर उपस्थित होती. हस्तांदोलन करताना फेथ मला म्हणाली, 'इट्स् गुड टू सी यू, ज्यो', आमची शेवटची भेट होऊन अठ्ठावीस वर्षे झाली होती. मी तिला म्हणालो, 'मधली अठ्ठावीस वर्षे या क्षणी गळून पडली आहेत.'

लॉन्सेस्टनमधल्या वसाहतीसाठी योग्य असणाऱ्या जागेचा शोध १८०४-मध्ये विल्यम कॉलिन्सने घेतला. ऑस्ट्रेलियात विजेचे दिवे या गावात प्रथम लागले. गावातली लहान घरे, त्यांच्या समोरच्या छोटया फुलबागा, आखीव स्वच्छ रस्ते, शांत वातावरण यावरून हे गाव इंग्लंडमधल्या उपनगराची प्रतिकृती आहे असे वाटते. गाव लहान असूनही त्यात तीनचार मोठी उद्याने आहेत. एल्फिन रोडवर चेरीच्या झाडांची रांगच्या रांग होती नि त्यांच्यावर अजूनही फुलांचा बहर होता. गावातले काही रस्ते एकमार्गी आहेत. गावाचा मध्यवर्ती भाग कॅमेरॉन स्ट्रीट आणि यॉर्क स्ट्रीट यांच्यामध्ये असून पांढऱ्या रंगाचा टाऊन हॉल, मॅक्वायर हाऊस, म्युझिअम, ग्रंथालये, ॲन्सेट या विमान कंपनीचे कार्यालय, तसेच मुख्य रस्ता मॉल त्यात येतात. मॉलवर उत्तमोत्तम दुकाने असून मध्यभागी झाडे आहेत आणि झाडाखाली विश्रांतीसाठी बसण्यासाठी बाके ठेवलेली आहेत. जॉर्ज स्ट्रीटवर ओल्ड अंब्रेला हाऊस असून त्यात गेल्या शंभर वर्षांतल्या छत्र्या विकत मिळतात.

३० ऑक्टोबरला सकाळी फेथने आम्हाला मोटरीने इकडच्या निसर्गरम्य प्रदेशातून हिंडण्यास नेले. गावातून बाहेर पडल्यावर कॅटरॅक्ट गॉर्ज हा छोटा धबधबा पाठीमागे टाकून आम्ही डोंगरमाथ्यावर आलो. खाली दरीत

वसलेले लॉन्सेस्टन गाव, टमार नदी यांचे मनोहर दृश्य येथून दिसते. या डोंगरावरून खाली उतरून आम्ही वेस्ट टमार हायवेने टमार नदीच्या किनाऱ्याने उत्तरेकडे निघालो. काही समय रस्ता डोंगरातून गेला. त्यात एके ठिकाणी ब्रॅडीज लूकआऊट नावाचे स्थान आहे. येथून भोवतालच्या प्रदेशाचे विहंगावलोकन करता येते. ब्रॅडी हा वाटमाऱ्या होता. अशा लोकांना येथे बूशरेंजर म्हणतात.

ब्रॅडीज लूकआउटनंतर आम्ही थांबलो ते ग्रॅन्व्हली बीचपाशी. इथे नदीचे पात्र बरेच मोठे होते. किनाऱ्यापाशी लहान लहान घरे होती आणि नदी प्रवाहात जलविहारासाठी होड्या होत्या. येथून सुमारे पंधरा मिनिटे प्रवास केल्यावर आम्ही बॅटमन ब्रीजपाशी आलो. हा झुलता पूल आहे. येथे वनभोजनासाठी बाके वगैरे ठेवलेली होती. समोर डोंगर असून त्यावर दाट झाडी होती. भोवताली युकॅलिप्टस झाडांचे रान होते. पुलाच्या पलीकडे एक छोटे चर्च होते. निसर्गचित्र काढायला योग्य असेच हे स्थान होते.

बॅटमन ब्रीज पाठीमागे टाकून आम्ही वेस्ट टमार हायवेने बेकन्सफिल्डकडे आलो. या गावात पूर्वी सोन्याच्या खाणी होत्या. येथील सोन्याचा शोध १८७०मध्ये लागला. मग सोने खाणीतून काढण्यासाठी एक कंपनी स्थापन झाली. १९१४मध्ये सोने संपल्याने खाण बंद झाली. पण त्या कंपनीच्या वस्तू अजून तशाच पडलेल्या आहेत. त्यात १९०४मधला मोठा शाफ्ट आहे. एंजीन आहे. रूळ आहेत. आता 'हेरिटेज' म्हणून त्याचे जतन करण्यात येते, तसेच 'मायनर्स हट' नि 'वन टिचर स्कूल' ही छोटी घरेही 'हेरिटेज' म्हणून जपून ठेवण्यात येत आहेत. झोपडीत टब, टेबल, दुधाची हंडी, डबल बेड, पर्स, बायबल, चष्मा, अशा अनेक गोष्टी ठेवलेल्या आहेत. त्या आपल्याला खिडकीतून दिसतात. तीच गोष्ट शाळेची आहे. त्यातली मेजे १८८१ सालची आहेत. त्याच्यावर पुस्तके आहेत, भिंतीवर व्हिक्टोरिया राणीचे चित्र आहे. एके ठिकाणी शिक्षकाविरुद्धची एका मुलाची तक्रार ठेवलेली दिसते.

बेकन्सफिल्डकडून आम्ही नदीच्या काठावरच्या ब्युटी पॉइंटपर्यंत आलो. येथून नदी पलीकडचे जॉर्ज टाऊन नि बेल बे ही गावे दिसतात. बेल बे येथे आता मोठा अल्युमिनिअमचा कारखाना झाला आहे. त्यातून निघणारा धूर आपल्याला दिसतो. येथून बास सामुद्रधुनी फार लांब नाही. परंतु बरेच लांब आलेलो असल्याने परत वळलो.

त्याच रात्री फेथने एक पार्टी आयोजित केली होती. सुमारे आठ-दहा जोडपी आली होती. गप्पांत अनेक गोष्टी निघाल्या. पण या लोकांच्या बोलण्यावरून काही सामाजिक व्यथा दिसल्या. लग्न संस्थेचे पावित्र्य कमी होत असल्याने कुटुंबसंस्था कोसळत आहे. सततच्या संपांमुळे सामाजिक सामंजस्य विघडत आहे. ख्रिश्चन संप्रदायाचे आकर्षण कमी होत आहे. एका डॉक्टराच्या म्हणण्याप्रमाणे त्याच्या गावापासून जवळच बुद्ध संप्रदायी लोकांची एक कॉलनी स्थापन झाली आहे आणि त्यांच्या त्यागी जीवनाचे कौतुक केले जाते. आणखी एक विशेष गोष्ट म्हणजे बाळंतपण घरी व्हावे यासाठी काही बायका हल्ली आग्रह धरतात ही होय.

दुसऱ्या दिवशी अधिक दूरच्या भागाकडे सहलीसाठी आम्ही गेलो. आज मोटर हाकण्याचे काम टॉमने केले. गावातून बाहेर पडल्यावर आदल्या दिवशीच्याच मार्गाने निघालो. प्रथम कॅटॅरक्ट गॉर्ज ओलांडला नि एका मोठ्या उद्यानात आलो. त्यात चित्रविचित्र रंगांच्या फुलांची खूपच रेलचेल होती. समोरच्या मैदानात मोर पिसारा काढून नाचत होता. येथे डोंगराच्या माथ्यावर जाण्यासाठी कारलिफ्ट आहे.

आता गाव पाठीमागे टाकून उत्तरेकडे सुमारे पावणे दोनशे मैलांवर असणाऱ्या क्विनयार्ड गावाकडे आम्ही वास हायवेने निघालो. सपाट मैदानाचा हा प्रदेश होता. डोंगर खूप दूरवर दिसत होते. आणि त्यांची शिखरे हिमाच्छादित होती. या पर्वतराजीचे नाव ग्रेट वेस्टर्न टिअर्स असल्याचे टॉम म्हणाला. डेलारेन गावापाशी आम्ही प्रथम थांबलो. पण तिथे पोहोचण्यापूर्वी वाटेत हॅडस्पेन, हॅग्ली, वेस्टब्युरी ही खेडी लागली. त्यातील 'कलोनिअल हौसेस' डागडुजी करून प्रदर्शनीय वास्तू म्हणून जपून ठेवण्यात येत आहेत. हॅडस्पेनच्या आसमंतात 'एंटली हाऊस' येते. १८२०मध्ये ते बांधण्यात आले. त्यात प्रवेश करण्यासाठी शुल्क द्यावे लागते. तिथे सकाळी नि संध्याकाळी चहा मिळण्याची व्यवस्था आहे.

डेलोरेनकडे जाणाऱ्या रस्त्यावर बऱ्याच ठिकाणी हिरवीगर्द झाडी होती. पण दूरचा प्रदेश थोडा रूक्ष वाटला. १८७०मध्ये या गावाकडे लोहमार्ग पोहोचला. मिअँडर नदीच्या काठावर गाव वसलेले असून लॉन्सेस्टनपासून सुमारे ४८ कि. मिटरवर आहे. १८२५मध्ये येथे पहिली वस्ती झाली. गाव शेतीप्रधान आहे. आज येथे कॉटेज इंडस्ट्रीचे एक्झिबिशन भरले होते. त्याची माहिती देणारे पत्रक प्रवेशद्वारीच मिळाले. चिनी मातीची भांडी, रंगीत

चित्रे, टॅपेस्ट्री, खेळणी, लोकर, लोकरीच्या वस्तू अशा अनेक गोष्टी विक्री-साठी ठेवलेल्या होत्या.

आता डेलोरेनकडून पन्नास किलोमिटर्सवर असणाऱ्या डेव्हेनपोर्टकडे आम्ही निघालो. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना कुरणे होती, नि गाई, मेंढ्या चरत होत्या. हेच चित्र मैलोमैल दिसले. १८२९मध्ये डेव्हेनपोर्टची स्थापना झाली. हे उत्तरेकडचे उत्तम बंदर समजण्यात येते. ते मर्सी नदीच्या मुखाशी आहे. सिमेंट, चुना नि धान्ये यांची निर्यात या बंदरातून होते. येथे एका उंचवट्यावर उभे असताना दूरवर समुद्र दिसत होता. पाणी अगदी निळे होते, आणि त्यात बारीक लहरी उठत होत्या. बंदरात 'एंप्रेस ऑफ ऑस्ट्रेलिया' ही छोटी आगनाव नांगरलेली होती.

या गावातून बाहेर पडल्यावर पॉपी फिल्ड्स् लागली. मातीचा रंग लाल होता. त्यामुळे महाबळेश्वरची आठवण झाली. रस्ताही डोंगरातून जात होता, आणि पुन्हा पुन्हा सुंदर दऱ्या नि त्यांतील टुमदार घरे नजरेत येत होती. ब्रॅडॉन लुकआउटपाशी उभे राहिले की समोरची फोर्थची खोल दरी, त्यातले सुबक घरांचे खेडे, हिरवीगार शेती, त्यातून वाहणारे ओहोळ, दूरवरची नदी, निळे आकाश, असे रम्य चित्र दिसते. आता वाटेत लेव्हन ही छोटी नदी लागली. तिचे पाणी स्फटिकासारखे होते. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वृक्षराजी होती.

फोर्थहून उल्व्हर्स्टनमार्गे आम्ही बर्नी या गावी आलो. गाव एमू बेच्या तोंडाशी आहे, आणि लॉन्सेस्टनपासून सुमारे दीडशे किलोमिटर्स आहे. १८२६मध्ये ते वसले. १८७१मध्ये माउंट बिसचॉफमध्ये कथिलाचा शोध लागला नि गावाची भरभराट होऊन बर्नी मोठे बंदर झाले. पण बर्नीचे स्मरण राहणार ते तिथल्या 'द पायोनिअर व्हिलेज म्युझिअम'मुळे. १९४२ मध्ये 'पेट फॉल्स म्युझिअम' म्हणून त्याची स्थापना झाली. त्यावेळी तो खाजगी होता. १९७०मध्ये बर्नी म्युन्सिपल कॉन्सिलने तो विकत घेतला. गेल्या शतकात वायव्येच्या किनाऱ्याकडे जे सामाजिक जीवन होते त्याचे यथार्थ चित्र दाखविण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

म्युझिअम दुमजली आहे. आणि त्यात बारा विभाग आहेत. पहिल्यात १८४७मध्ये स्थापन झालेली एमू बे इन, दुसऱ्यात दातांचा दवाखाना, तिसऱ्यात दिवाणखाना, चौथ्यात स्वयंपाकगृह, पाचव्यात धोबीघाट, सहाव्यात कार्पेंटर शॉप, सातव्यात एमू बे बटर फॅक्टरी, आठव्यात वेलिंग्टन टाइम्सचा

छापखाना, नवव्यात स्टोअर नि पोस्ट ऑफिस, दहाव्यात चांभाराचे दुकान, अकराव्यात लोहाराचे दुकान नि बाराव्यात स्टेज कोच डेपो अशा गोष्टी आहेत. वृत्तपत्रे, बायकांचे कपडे, पिस्तुले, रंगीत चित्रे, बँकेच्या पावत्या, शिवण्याचे यंत्र, पिॲनो या वस्तूही इथे आहेत. साबणाच्या जाहिरातीचे विनोदी चित्र आहे. कपडे धुण्याचा दिवस जवळ आला आहे. नाजूक स्त्री चिंताक्रांत होऊन बसली आहे. पण तिची चिंता मार्सेल सोप दूर करीत आहे असे चित्रात दाखविले आहे.

आता बर्नीहून समुद्राच्या बाजूने विनयार्ड गावाकडे निघालो. रस्ता सुंदर होता. डाव्या हाताला हिरवी कुरणे होती. त्यात बऱ्याच वेळाने एखाद दुसरे घर दिसे. उजव्या हाताला पाण्याला हिरवा रंग असलेला समुद्र होता. त्याच्या पलीकडे आगगाडीचा रस्ता होता. इटलीत खाली दक्षिणेकडे सोरेंटोकडे जाताना जे निसर्गचित्र दिसले त्याची आठवण देणारे हे दृश्य होते. काही समयाने रस्ता डोंगरातून गेला, नि मग डोंगरमाथ्यावर आलो. पलीकडे दीपगृह होते. समोर अफाट समुद्र होता. उतरणीवरून थोडे खाली आल्यावर कठडा घातलेली जागा होती. तिथे उभे राहिले की, खाली किनाऱ्याकडे येणाऱ्या मंद लाटा दिसत होत्या. येथून आम्ही परत वळलो. जाताना विनयार्ड गावातून गेलो. गाव रेखीव नि सुंदर आहे. मोटरी बऱ्याच दिसल्या. जातानाचा रस्ता उलव्हर्स्टनपर्यंत तोच होता. या गावापाशी रस्ता वदलला.

यापुढे सुमारे दोन तास आम्ही दाट जंगलातील डोंगराळ रस्त्यावरून प्रवास केला. मधून एखाद्या कोपऱ्यात दोन-चार घरांची वस्ती दिसे. एखाद-दुसरीच मोटर वाटेत भेटली. रस्ता नागमोडी होता. त्यात सतत घाटांची चढउतार करावी लागत होती. दोन्ही बाजूंना उंच झाडांची जंगले होती. काही वेळाने थोडा सपाट प्रदेश आला. दूरवर बॅरिंग्टन लेक दिसले. नंतर पुन्हा घाट सुरू झाला. दोन्ही बाजूंना उंचच उंच डोंगर होते. नि त्यावर गर्द झाडी होती. हा घाट ओलांडल्यावर सेथना लेक आले. जवळच विलमॉट पॉवर स्टेशन होते. तिथे जाणाऱ्याने आपल्या जबाबदारीवर जावे अशी सूचना लावलेली होती. हे पॉवर स्टेशन मागे टाकल्यावर युकिलिप्टसच्या झाडांचे अरण्य आले. त्याच्या पानांचा वास बराच वेळ येत होता. मग फोर्थ नावाची नदी लागली. तिच्यावरचा पूल ओलांडला नि घाट पुन्हा सुरू झाला.

आता गोरी पार्क आले. मग थोड्याच समयात पठार आले. इथे लुक आउट पॉइंट होता. भोवतालच्या निरनिराळ्या डोंगरांच्या शिखरांची नावे, त्यांची उंची, वगैरे माहिती देणारा आलेख तिथे होतो. येथेच समोर माउंट रोलँड दिसला. तो उंच सरळसोट असून त्यावर झाडी नाहीच असे म्हटले तरी चालेल. सहाच्या सुमारास हा घाट उतरून एका दरीत आलो. तिचे नाव 'एको व्हॅली' होते. आता मोटर मोल क्रीककडे धावत होती. रस्ता डोंगरातून असल्याने सतत लहान लहान घाटी येत होत्या. भोवताली स्टेट फॉरेस्ट होते. हे अगदी घनदाट अरण्यच होते. मोल क्रीक मागे टाकली नि रस्ता हळूहळू मैदानातून जाऊ लागला. थोड्याच समयात डोलोरेन आले, नि मोटर सकाळच्याच रस्त्याने लॉन्सेस्टनकडे निघाली. हा परतीचा काही प्रवास घनदाट अरण्यातून निःशब्द वातावरणातून झाला. फारसे पक्षी किंवा जनावरे दिसली नाहीत. वस्तीही विरळच होती. हा निराळाच अनुभव होता.

१ नोव्हेंबरला सकाळी फेथ नि टॉम यांचा विमानतळावर निरोप घेतला. पावणेआठला विमानाने आकाशाकडे झेप घेतली. सूर्य ढगाबाहेर आला नव्हता. खाली कुरणात चरणाऱ्या मेंढ्या, गाई काळ्या ठिपक्यासारख्या दिसू लागल्या. थोड्या समयाने सूर्य तळपू लागला. प्रथम शुभ्र मेघांचे विरळ आवरण होते. ते पुढे दाट झाले. त्यामुळे खालचा प्रदेश अदृश्य झाला. ही स्थिती पंधरा मिनिटे राहिली. नंतर ढग विरळ झाले. समुद्र दिसला. थोड्या समयात किनारा येऊन विमान उतरू लागले. मेलबर्नचा विमानतळ आला होता.

मेलबर्नहून आम्ही सिंगापूरला जाणार होतो. ते उड्डाण दुपारी होते. चार-पाच तास विमानतळावर बसून काढणे हे बरेच वेळा कंटाळवाणे होते. विशेषतः सहल संपण्याच्या सुमारास तो कंटाळा अधिक जाणवतो. पण शेवटी वेळ जातोच. आज तसाच गेला. दुपारी बारानंतर आमचा डॉक्टरांचा गट आला. मग सामान रवाना झाले. विमानाने उड्डाण केले तेव्हा दुपारचे अडीच वाजले होते. विमान सिडनीकडे जात होते. आम्ही सिडनीहून मेलबर्नला भूमीमार्गे आलो. आता आकाशमार्गाने परत जात होतो.

दूरवर शुभ्र मेघ तरंगत होते. खाली अधून मधून हिरवी कुरणे नि शेते दिसत होती. मधूनच विशाल अरण्ये लागत, नि पर्वतराजी दिसे. बाहेर सूर्य तळपत होता. सिडनीपासून विमान तीस मैलांवर असताना पांढऱ्या ढगांची

गर्दी झाली. विमान हलू लागले. मग काहीच दिसेनासे झाले. शेवटी विमान ढगांतून बाहेर आले नि उतरू लागले. खाली विस्तृत पसरलेले सिडनी शहर दिसत होते. साडेचारला विमान जमिनीला टेकले.

थोड्याच वेळात सूचना आली की, विमानात बिघाड झालेला असल्याने ते वेळेवर सुटणार नाही. मग प्रवाश्यांना लाउंजमध्ये जाण्यास परवानगी मिळाली. प्रथम विमान तासाभराने सुटेल अशी सूचना फळ्यावरच्या घड्याळावर लागली. पण ते काटे फिरत राहिले. अखेरीस दुरुस्ती पूर्ण झाली. सव्वासातला विमानाने आकाशमार्ग धरला. प्रारंभी थोडा समय खाली समुद्र, त्यातली जहाजे, लहान होड्या दिसल्या. पण मग ते ढगांनी आच्छादून टाकले. सूर्य अस्ताला चालला होता. पश्चिमेकडच्या आकाशात केशरी, पिवळसर, हिरवट अशा छटा आलेल्या होत्या. शुभ्र मेघांवरतीही भिन्न रंगांच्या छटा उमटत होत्या.

पावणेआठच्या सुमारास खाली जमीन दिसली. त्यात एक मोठा जलाशय होता. त्याच्यावर सूर्यप्रभा पडून त्याच्या पाण्यावर लाल छटा दिसत होती. खालचा प्रदेश अरण्यमयच वाटला. पण त्यात घनदाट झाडी मात्र नव्हती. आता पश्चिमेकडे क्षितिज निळे, पिवळे,, केशरी, लाल अशा विभिन्न रंगांनी काही समय रंगले. मग सूर्य खाली गेला. मावळती लाल रंगाने उजाळली. नंतर अंधार होऊ लागला. आता फक्त निळे आकाश नि त्यात निस्तेज तारे दिसू लागले. थोड्या वेळाने अंधारातून प्रवास सुरू झाला. जेवणानंतर दिवे मालवण्यात आले. रात्री दोन वाजता विमान उतरू लागले. सिंगापूर आले होते.

●

# ४. सिंगापूर

सिंगापूर हे पूर्वीचे सिंहपूर. तेराव्या नि चौदाव्या शतकांतील विजय साम्राज्याचे ते एक महत्त्वाचे नगर होते. आज सिंगापूर हे छोटे प्रजासत्ताक राज्य आहे. या राज्यात सिंगापूर नि इतर पन्नास बेटांचा अंतर्भाव होतो. या पन्नास छोटया बेटांपैकी अर्ध्या बेटांत वस्ती नाही. सिंगापूर आग्नेय आशियातील सर्वांत मोठे बंदर असून जगातले व्यापारी उलाढालीच्या दृष्टीने दुसऱ्या क्रमांकाचे बंदर आहे. मलाया द्विपकल्पातून ब्रिटिशांनी पाय काढल्यावर तेथे मलेशियाच्या संयुक्त राज्याची स्थापना झाली. त्यात १९६३मध्ये सिंगापूर दाखल झाले. परंतु मलायी नि चिनी यांच्यांत तीव्र मतभेद झाल्याने सिंगापूरने १९६५मध्ये या संयुक्त राज्यातून अंग काढून घेतले.

आता सिंगापूरची विलक्षण भरभराट झाली आहे. या भरभराटीला त्या राज्याचे पंतप्रधान ली कुआन यू यांचा सर्वांत मोठा हातभार लागला आहे. ली यांच्यामध्ये प्रथम श्रेणीचे नेतृत्वाचे गुण आहेत. त्यांच्या राजवटी-पासून बऱ्याच गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. २५ जानेवारी १९८२च्या 'टाइम' मॅगझिनमध्ये सिंगापूरवर प्रदीर्घ लेख आहे. शिवाय त्यांची त्यात लहानशी मुलाखतही आहे. ते स्वत:बद्दल म्हणाले की जेव्हा तरुणपणी मी सोशालिस्ट होतो तेव्हा मी निष्पाप होतो नि माझा चमत्कारावर विश्वास होता. अर्थात आता तो नाही हे उघड आहे. त्यांची अशी महत्त्वाकांक्षा आहे की, १९९०मध्ये तांत्रिक उत्पादनाच्या क्षेत्रात सिंगापूर जपानच्या तोडीचे झाले पाहिजे. १९८८मध्ये त्यांचे वय ६५ होईल. या वेळी पंतप्रधान म्हणून निवृत्त होण्याची त्यांची मनीषा आहे. १९७१मध्ये मी येथे आलो असताना त्यांनी झोपडपट्टी नष्ट करण्याची प्रतिज्ञा केल्याचे ऐकले होते आणि हिंदुस्थानातल्या माणसाला आश्चर्य वाटण्यासारखी ही गोष्ट आहे की त्यांनी केलेली प्रतिज्ञा पाळली आहे. झोपडपट्ट्यांच्या जागी मोठमोठ्या उत्तुंग इमारती बांधण्यात आल्या आहेत. आमचे मित्र श्री. आनंद यांच्या घरी आम्ही गेलो असता ही घरे कशी बांधली गेली आहेत याची कल्पना आली.

सिंगापूरमध्ये इंग्रजी, चिनी, तमिळ नि मलायी या भाषा चालतात. प्रत्येक मुलाला कोणत्याही एका भाषेतून प्राथमिक शिक्षण घेता येते. फक्त त्याला दुसरी एक भाषा शिकावी लागते. मात्र एक गोष्ट लक्षात येते की, इंग्रजीचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. वैद्यकीय सोयी मुबलक असून त्यांचा दर्जा वरच्या श्रेणीचा आहे. काही समयापुरती सैनिक नोकरी येथे सक्तीची आहे. सिंगापूर स्वच्छ असून ते तसे राहावे यावर मोठा भर आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोकसंख्या नियंत्रित करण्याच्या कामाला येथे यश आले आहे.

पूर्वी मी सिंगापूरला आलेलो असल्याने गावाविषयी कुतूहल नव्हते. तेव्हा नगर सहलीला जाण्याची इच्छा नव्हती. अर्थात सिंगापूरला लोक प्रामुख्याने येतात ते भारतात सहज उपलब्ध नसणाऱ्या वस्तूंच्या खरेदीसाठी. आता येथे टोलेजंग स्टोअर्स उभे राहात आहेत. आणि त्यांत सर्व प्रकारच्या वस्तूंची दुकाने असतात. योहान हा तशा प्रकारचा स्टोअर आहे. त्याची इमारत पाच-मजली असून खाली दोन तळमजले होते. आणि या सर्व भागांत निरनिराळ्या प्रकारची दुकाने होती नि वरच्या मजल्यावर जाण्यासाठी फिरते जिने–एस्कॅलेटर्स–होते. अर्थात गावात छोटी दुकाने आहेतच. त्यांतील काही तमिळ, सिंधी, शिख लोकांची आहेत. पण लहान दुकानात वस्तू नेहमीच स्वस्त मिळेल असे नाही.

आमच्या प्रेसिडेंट मर्लिन या हॉटेलकडून योहान स्टोअर्सकडे जाणाऱ्या रस्त्यावरच प्रामुख्याने तमिळ लोकांची वस्ती नि त्यांची उपाहारगृहे होती. चार आठवड्यांत भारतीय भोजन पदार्थ न मिळाल्याने आम्ही इथल्या पदार्थांचा आस्वाद घेतला यात काय आश्चर्य ! आमचा सिंगापूरचा मुक्काम दोन दिवसांचा होता. हा वेळ केव्हा नि कसा संपला हे समजले नाही. ३ नोव्हेंबरला आम्ही सिंगापूरहून भारताकडे येण्यास निघालो. आणि विमानात एक डुलकी लागते आहे तोच मुंबई आली.

पूर्व काळात भारतीय लोक इंडोनेशिया, इंडोचायना, मलाया, इत्यादी प्रदेशांत व्यापार, धर्म, नि संस्कृती यांच्या प्रसाराला जात असत. यांतल्या इंडोनेशियाच्या भूमीवर काही काळ आपण उभे होतो याच्या समाधानाची जाणीव मुंबईच्या कस्टमच्या विभागात तिष्ठत उभा असताना एकाएकी मला झाली.

●

६२०

REFBK-0023622

REFBK-0023622